
म. ग्रं. सं. ठाणे

# उगवती पूर्व

लेखक : सुधीर घनवटकर



REFBK-0027357

संदर्भ
ग्रू-प्रकाश
७६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 JUN 1994
6 JUL 1994
20 JUL 1994
23 JUL 1994
17 AUG 1994
28 SEP 1994
8 OCT 1994
1 OC 1994

(कृ. मा. पहा)
१००००–११–८९

# उगवती पूर्व

सुधीर घनवटकर

REFBK-0027357

दिपाली प्रकाशन

प्रकाशक
सौ मदा अ देशपाडे
दिपाली प्रकाशन
पाटेवाडा, टिळक चौक
कल्याण ४२१ ३०१

लेखक
सुधीर घनवटकर
२९, ब्राम्हण आळी,
भिवडी, जिल्हा ठाणे

© प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९३

मुखपृष्ठ जयत खरे

अक्षरजुळणी
अभिषेक टाइपसेटर्स
१२४३, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

मुद्रक
प्रमोद वि बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

किंमत रु ४० /- फक्त

प्रिय मित्र

**अम्ब्रोज लोक (मलेशिया)**


व

पूज्य

**ती. भाऊ व सौ  आई**

याना

**सुधीर –**



नॅशनल म्युझियम

# स्वागत

श्री सुधीर घनवटकर याच्या 'उगवती पूर्व' या छोटेखानी प्रवासवर्णनाचे स्वागत करताना मला आनद होत आहे. त्याच्या या पुस्तकाने मराठी साहित्यात एका चागल्या प्रवासवर्णनाची भर पडली आहे ज्या प्रदेशाविषयी मराठी वाचकांना फारशी माहिती नाही, त्याची पुष्कळच माहिती या पुस्तकातून त्यांना मिळेल असा विश्वास मला वाटतो

प्रवासवर्णन हे सामान्यत· खूप दूरच्या देशाविषयी असले पाहिजे, असा एक सार्वत्रिक समज रूढ झालेला आहे. त्यामुळे अधिकाश प्रवासवर्णने इंग्लड, अमेरिका, जपान, रशिया या देशाशी संबधित असल्याचे आढळते. परिणामत. त्याच त्याच गोष्टींची वर्णने वाचकांना वाचावी लागतात शिवाय ही प्रवासवर्णने लिहिणाऱ्यांचा मुख्य हेतू वाचकाना माहिती पुरवणे हा नसून स्वत चा मोठेपणा सागणे आणि वाचकाचे मनोरंजन करणे हाच असतो. त्यामुळे त्यामध्ये विशेष नावीन्य किंवा चितन असत नाही मराठी वाचकाना हलकेफुलके, टिंगलटवाळी करणारे, डोक्याला फारसा त्रास न देणारे लिखाण विशेष प्रिय असते. त्यामुळे तशा प्रकारचे लेखन करण्याकडे नवोदित किंवा उदीयमान लेखकाचा अधिक कल असतो श्री. सुधीर घनवटकर यानी तो मोह टाळून वाचकांना मलेशिया व सिंगापूर या देशांची चागली माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे त्याबद्दल वाचक त्याना निश्चितच धन्यवाद देतील.

तसे पाहिले तर आत्मचरित्र व प्रवासवर्णन हे साहित्याचे दोन प्रकार तुलनात्मक दृष्ट्या अधिक सोपे आहेत. कारण त्यात स्वत:ला आलेले अनुभव, स्वत भोगलेली सुख-दु.खे व त्यावरून बनलेली आपली मते यांचेच कथन करायचे असते उत्तुग प्रतिभा, सखोल अध्ययन, भाषेचा फुलोरा वगैरे ललित साहित्याला आवश्यक असणाऱ्या गोष्टींचा अभाव असला तरी चालते. मात्र अनुभव सच्चा असावा व तो प्रामाणिकपणे माडला जावा, एवढी अपेक्षा नक्कीच असते यापैकी आत्मकथा

हा प्रकार अधिक परिपक्व अनुभवानंतर, प्रौढ वयात हाताळावा, असा संकेत आहे. कारण त्यात आयुष्यभरातील भल्या-बुऱ्या अनुभवांचे कथन व चिंतन असावे लागते त्यामुळे आतापर्यंत आत्मचरित्राची सख्या कमी असे. परतु आजकाल आत्मचरित्राचा महापूर आलेला दिसतो त्यांपैकी बहुसख्य आत्मचरित्राचे लेखक आत्मकथनाने प्रारभ करतात आणि तेथेच त्यांच्या साहित्यिक जीवनाला पूर्णविराम मिळतो. ही अनैसर्गिक स्थिती फार काळ टिकणार नाही, अशी आशा करण्याव्यतिरिक्त आपल्या हातात काय आहे ?

प्रवासवर्णनाचे तसे नाही. प्रवासाची आवड ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती असल्यामुळे लहानपणापासूनच आपण प्रवासाचा आनद अनुभवू लागतो, आणि ज्यांना लिहिण्याची आवड असते ते आपला हा आनद इतराना मिळवून देण्यासाठी प्रवासवर्णने लिहितात पूर्वी शाळांच्या नियतकालिकांमधून अशा प्रवासवर्णनाना आवर्जून स्थान दिले जाई (हल्ली काय स्थिती आहे याची मला कल्पना नाही!) माझा स्वतःचा पहिला लेख 'माझी विजापूरची सफर' हा १९३६ साली पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयाच्या नियतकालिकात प्रकाशित झाला होता. त्यानतर गेली सतत पन्नास - साठ वर्षे मी लेखन करीत आलो आहे प्रसगानुसार वेगवेगळे वाङ्मय-प्रकार मी हाताळले. त्यात प्रवासवर्णनांची संख्याच सर्वांत अधिक राहिली

परदेशी जाण्यापूर्वी आपल्याला खुद्द आपल्या देशाची चांगली माहिती असली पाहिजे, अशी माझी भूमिका असल्यामुळे मी भारतातील प्रवासावर अधिक भर दिला, आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या अनेक प्रांतांत मी अनेकदा जाऊन आलो यापैकी बहुतेक सर्व प्रवासासबधी मी लेख व पुस्तके लिहिली. या भारत भ्रमणाचा मला जपानात व अरबस्तानातील पाच देशांत फिरताना चांगला उपयोग झाला. कारण जसे आपल्याला त्या त्या देशातील लोकजीवनासबंधी कुतूहल असते तसे तेथील लोकानाही भारतीयांविषयी कुतूहल असते आपल्यालाच आपल्या देशाची पुरेशी माहिती नसेल तर आपण परकीयांची जिज्ञासा कशी पूर्ण करणार ?

यातूनच माझी प्रवास व प्रवासवर्णन याच्या बाबतीतील भूमिका स्पष्ट होते निसर्गाचे किंवा उद्योगधंदे, व्यापार वगैरे गोष्टींतील भपक्याचे आकर्षण मला कधीच वाटले नाही. म्हणूनच युरोप-अमेरिकेची सफर करण्याची इच्छा मला कधी झाली नाही माणूस हा माझ्या आवडीचा विषय आहे. त्याचा शोध घेण्यात माझे मन रमते. त्यामुळे देशात अथवा परदेशात तेथील लोक, त्याचे जीवन, त्यांची सुख -

दु:खे समजून घेण्याचाच मी सदैव प्रयत्न केला. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की आपल्याप्रमाणेच इतर लोकानाही 'माणूस' या विषयात खूप स्वारस्य असते मग त्यातून घनिष्ठ स्नेहसबध निर्माण होतात.

हे सारे माझ्या प्रवासवर्णनांची महती सागण्यासाठी मी लिहिलेले नाही. श्री. सुधीर घनवटकर याची 'उगवती पूर्व' वाचल्यानतर त्याची भूमिका अशीच असावी, आणि म्हणूनच माझ्यासारख्या विशेष लोकप्रिय नसणाऱ्या लेखकाकडून त्यानी प्रस्तावनेची अपेक्षा बाळगली असावी, असे मला वाटले म्हणून मी हा खुलासा केला आहे.

श्री सुधीर घनवटकर यांच्या आणि माझ्या प्रवासपद्धतीत आणखी एक साम्य आढळले आर्थिक दृष्ट्या मध्यम वर्गात मोडणाऱ्या लोकांना सपूर्ण खर्च स्वतः सोसून प्रवास करणे नेहमीच अवघड असते त्यामुळे ज्या देशात किंवा प्रदेशात आपण जातो तेथे स्थानिक खर्चाचा मोठा वाटा उचलणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था असतील तरच आपल्याला असा प्रवास करता येतो मी भारतात इतका प्रवास केला, पण कोठेही मला हॉटेलात अथवा धर्मशाळेत उतरावे लागले नाही. सर्वत्र मित्रांच्या घरी किंवा गांधी आश्रमातच मी राहिलो अरबस्तानचा प्रवास मी सरकारी खर्चाने केला आणि जपानमधील प्रवासाची सारी जबाबदारी जपान- भारत सर्वोदय मित्रता सघाने उचलली होती त्यामुळेच हे प्रवास करणे मला शक्य झाले. श्री घनवटकर याचा हा मलेशिया-सिंगापूरचा प्रवास त्याचा चिनी - ख्रिश्चन मलेशियन मित्र श्री ॲम्ब्रोज लोक याच्या प्रेमळ आतिथ्यामुळे इतका यशस्वी होऊ शकला. त्याच्यामुळे स्थानिक लोकजीवनाचीही सजीव ओळख त्याना होऊ शकली. जे लोक हॉटेलात राहून नुसती प्रेक्षणीय स्थळे पाहून येतात, त्याच्या प्रवासात असा जिवंतपणा पाहायला मिळत नाही. ते जणू चित्रपटांत घडलेले त्या त्या प्रदेशाचे दर्शन बनते. श्री घनवटकर यांना जागजागी माणुसकीचा जो अनुभव आला त्याची प्रत्ययकारी वर्णने त्यानी केली आहेत तो या पुस्तकाचा प्राणच होय.

लेखकाच्या नवखेपणामुळे विषयाची माडणी व भाषा यात काहीसा कच्चेपणा राहिला आहे, हे खरे, परतु प्रत्येक लेखकाच्या प्रारभिक लिखाणात असा कच्चेपणा असतोच त्याने नाउमेद न होता सातत्याने लिखाण करीत राहणे, हाच त्यावरील उपाय असतो श्री सुधीर घनवटकरानी या प्रवासवर्णनावर न थाबता अशाच प्रकारचे आणखी प्रवास करावेत आणि त्यांची वर्णने लिहावीत असे करताना इतरानी हाताळलेले विषय न घेता, न मळलेल्या वाटावरून वाटचाल करावी

आणि आपल्या वाचकाना अज्ञात असलेल्या प्रदेशांचा शोध घ्यावा तसे पाहिल्यास श्रीलंका, म्यानमार (ब्रह्मदेश), नेपाळ, पाकिस्तान, अफगाणिस्तान, बागलादेश, तिबेट, मालदीव बेटे या आपल्या शेजारी देशांसंबधी आपल्याला फारच थोडी माहिती असते. त्यांच्यापेक्षा इंग्लड-अमेरिकेचीच माहिती आपल्याला जास्त असते. ही काही फारशी भूषणावह गोष्ट नाही. तरुण लेखकांनी आपल्या या शेजारी देशांशी सबंध वाढविले तर ते त्याच्याच नव्हे तर एकूण देशाच्याही हिताचे ठरेल. 'उगवती पूर्व' वाचून उदीयमान लेखकांना तसे करण्याची प्रेरणा मिळो !

'श्रीरघुवंश'
डॉ. केतकर मार्ग,
पुणे :- ४११ ००४
६ डिसेंबर १९९३

श्रीपाद जोशी

# प्रवासास निघण्यापूर्वी

प्रवासाची आवड तरुणपणीच निर्माण झाली. प्रवास करताना लोकजीवन पाहावे, त्याच भावविश्व जाणून घ्याव, तेथील इतिहास, परंपरा, प्रदेश वैशिष्ट्यं समजून घ्यावी, ही भूमिकाही तयार झाली. याच भूमिकेतून फारशी ओळख नसलेल्या अम्ब्रोज लोक या मलेशियन गृहस्थाच्या आमत्रणावरून मलेशिया येथे गेलो व त्या अनुषंगानं थायलड, सिंगापूर हे देशही पाहिले.

पूर्वेकडील हे देश कसे आहेत ? त्यांचा विकास कोणत्या गतीनं होत आहे ? हे पाहण्याची सधी मिळाली. परदेशी वस्तूंच्या खरेदीसाठी सिगापूरला जाणं, एवढंच आपल्याला त्या देशाबद्दल माहिती आहे; परंतु त्याच्या शेजारचे मलेशिया, इडोनेशिया, थायलंड हे देश माहिती नसतात कारण या देशाना कोणत्याही प्रकारचं वलय नाही त्यामुळे या देशावर आपण सहसा नजरही टाकत नाही

माझ्या या लहानशा प्रवासात तेथील लोकाशी मैत्री साधण्याचा प्रयत्न केला त्यांचं अंतरंग जाणून घेण्याचाही प्रयत्न केला. तेथे काहीही चांगली मैत्रीही जमली व त्यांची अजूनही पत्रं येतात

प्रवासवर्णनाच्या रूपान माझं हे पहिलंच पुस्तक प्रसिद्ध होत आहे

हे पुस्तक प्रसिद्ध होण्यासाठी माझे सर्व कुटुब, कल्याणचे आतेभाऊ श्री. अरुण पुराणिक, मुबईच्या आत्याबाई सौ स्वाती गोडबोले, नागपूरची मावशी श्रीमती सुनंदा जोग, भिवंडीचे गुरुवर्य श्री दादा कर्वे, मित्रवर्य श्री रवींद्र भागवत व जयत पळसुले या सर्वांनी बहुमोल प्रोत्साहन दिल. त्याबद्दल या सर्वांचा मी अतिशय ऋणी आहे.

पुण्याचे प्रसिद्ध चित्रकार श्री. जयंत खरे यांनी अल्पावधीत अत्यत देखणं मुखपृष्ठ तयार करून दिल, त्याबद्दल त्याचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच होतील

असीम कृतज्ञता व्यक्त करायला हवी ती आमचे गुरुवर्य, कविवर्य श्री धु

शं तथा राजाभाऊ दीक्षित (भिवंडी) याचेबद्दल. या पुस्तक प्रवासात त्यानी अगदी पहिल्यापासून ते शेवटपर्यंत साथ केली. हस्तलिखित तपासून देणं, आवश्यक त्या दुरुस्त्या करण, इतर मार्गदर्शन करणे, हे काम त्यानी अगदी जिव्हाळ्यान केलं त्यांच्याशिवाय पुस्तक इतक्या लवकर तयार झाल असतं की नाही, ही शंकाच आहे. त्याचे चिरजीव श्री. श्रीनिवास दीक्षित यांनी मुद्रित तपासून देण्याच काम आनंदानं व सत्वरतेन करून दिल; त्याबद्दल मी उभयताचा अत्यत ऋणी आहे

प्रख्यात लेखक व विचारवंत श्री श्रीपाद जोशी यांनीही मोठ्या आनंदान व विनाविलब प्रस्तावना देण्याच कबूल केल. त्याच्यासारख्या समर्थ लेखकाने प्रस्तावना देण, हाच एक मोठा आनंद आहे मी त्यांचाही ऋणी आहे.

'दिपाली' प्रकाशनाच्या सौ. मदा देशपाडे यानी माझ्यासारख्या नवीन लेखकाच प्रवासवर्णन छापण्याची तयारी दाखविली व अतिशय आकर्षक रूपात ते प्रसिद्ध केलं, त्याबद्दल मी त्यांचे अगदी मन.पूर्वक आभार मानतो. तसेच उत्तम अक्षरजुळणी व छपाई लवकर करून दिल्याबद्दल अभिषेक टाइपसेटर व स्मिता प्रिंटर्स याचाही अत्यत आभारी आहे

१ ऑगस्ट १९९३ सुधीर घनवटकर
भिवंडी

दा. क्र.

# उपक्ती पूर्व

**प्रवासो नयनोत्सव· ॥**

शाळेत असल्यापासूनच मलेशिया हा देश व त्या देशाचे त्या वेळचे पंतप्रधान टुंकू अब्दुल रहमान याच नाव ऐकत होतो या पतप्रधानानी भारताबरोबर चागले राजकीय संबंध निर्माण केले होते.

तस पाहिल तर मलेशिया या देशाचं नाव बऱ्याच लोकाना फारस ओळखीच नाही रबर, साबुदाणा, कथील यासाठी प्रसिद्ध असलेल मलायाच जास्त स्मरणात आहे बरेच लोक मलेशिया व मॉरिशस या देशांच्या नावाचा बराच घोळ घालतात जस इतिहास माहीत नसलेले काही लोक रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा ही व्यक्ती एकच असूनही, दोन वेगवेगळ्या व्यक्ती समजतात, आणि याच्या उलट म्हणजे मॉरिशस व मलेशिया हे दोन देश वेगवेगळे असून आणि त्याची भौगोलिक स्थान भिन्न असूनही तो एकच देश समजतात कारण शाळेनतर भूगोलाशी संबंध तुटलेला असतो त्यामुळ परिचित नसलेले देशही परग्रहांइतके अनोळखी वाटतात परदेशी जायचं म्हणजे विमानानं, समुद्रावरून उडत जायचं, अशीच अनेकाची धारणा असते

मलेशिया हा देश काही अमेरिका व इतर काही युरोपियन राष्ट्रासारखा प्रसिद्ध नाही. आपल्याप्रमाणेच तो एक विकसनशील देश आहे.

या मलेशियाला भेट द्यायला मी नोव्हेंबर १९८९ मध्ये सज्ज झालो. १९८७ सालापर्यंत स्वप्नातही वाटलं नव्हतं की मी परदेशप्रवास करू शकेन ! याचं सर्व श्रेय मी माझा मलेशियन मित्र श्री ॲम्ब्रोज लोक या चिनी ख्रिश्चन माणसाला देतो

मुंबईच्या वर्ल्ड हॉलिडेज या सस्थेकडून पासपोर्ट, व्हिसा आदी बाबी तयार करवून घेतल्या मलेशियाबरोबरच थायलंड, सिगापूर या देशाचाही व्हिसा घेतला. विमानतिकीट हाती पडायला मात्र फारच विलब लागला १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता सहार विमानतळावरून फ्लाइट होती, तर आदल्या दिवशी म्हणजे १३ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ ३० वाजता विमानतिकीट व २७०/- अमेरिकन डॉलर्स हाती पडले. मलेशिया हे शेजारी राष्ट्र समजलं जात असल्यामुळ तेवढेच डॉलर्स नियमानुसार मिळतील, असं सांगण्यात आल तीन हजार कि मी.अंतरापलीकडील देशाना जाण्यासाठी ५०० / - डॉलर्स मिळतात, असंही समजल.

तिकीट व डॉलर्स उशिरा मिळाले. ते घेऊन मला परत भिवडीला येऊन, सामानाची आवराआवर करून, दुसऱ्या दिवशी सकाळी ८ ३० च्या आत सहार विमानतळावर रिपोर्टिंग करावयाच होतं फारच धावपळ उडाली. भिवडीला आल्यावर काही किरकोळ खरेदी केली व सामान आवराआवरीस लागलो

पहिलाच विमान व परदेशप्रवास असल्यामुळे मनावर एक प्रकारच दडपण आल होतं बॅगामध्ये कपडे व इतर वस्तू व्यवस्थित लावून देण्याच काम माझ्या पत्नीन केलं.

दुसऱ्या दिवशी पहाटे घरच्याचा भावपूर्ण निरोप घेऊन बाहेर पडलो एस टी., लोकलचा प्रवास करीत सहारला पोहचेपर्यंत सकाळचे पावणे नऊ झाले होते

त्या महाकाय सहार विमानतळाच्या प्रवेशद्वारातून आत गेलो समोरच फ्लाइट क्र ४११ ची निऑन लाइटमधील लाल पाटी दिसली शोधाशोध करायला लागली नाही म्हणून बरं वाटलं काहीच गर्दी नव्हती. तिथ विमानतिकीट, पासपार्ट दाखविला. सामानाच वजन करून, टॅग लावून घेतला व नंतर ३५०/- रु इतका विमानतळ अधिभार भरला व पुढे जाऊन कस्टम तपासणीच्या अलीकडे खुर्च्यांवर ताटकळत बसलो. विमान - उड्डाण जरी ११ वाजता होत तरी त्याची तशी सूचना मिळत नव्हती माझ्या बाजूलाच दादर - मुबईचे श्री. माधव गोखले बसले होते त्याच्याशी ओळख झाली ते मलेशियातील नेगारी सेंबिलान या ठिकाणी एका टेक्सटाइल मिलमध्ये कामाला होते. ते भेटल्यामुळे बराच धीर आला व त्यांच्याशी गप्पागोष्टी करीत बसलो जरा वेळान कस्टम तपासणी झाली पासपोर्टवर कॅमेरा

नोंदवून घेतला व आम्ही आत गेटच्या दिशेन सरकलो विमान दीड तास उशिरा सुटणार अस समजल. नुसताच आराम करीत व देशीविदेशी पर्यटक न्याहाळत बसलो सहार विमानतळ प्रथमदर्शनी तरी आवडला थंडगार पेय दिल गेलं. कोणाला चहा, कॉफी दिली; कारण विमान उशिरा सुटणार होत ना! शेवटी दुपारी ११.४५ ला विमानात जाऊन बसण्याची सूचना मिळाली एअर इडियाच्या बसन आम्हाला विमानापाशी नेऊन सोडलं. त्या विमानाच नाव मोठ छान होत - सरस्वती! सरकार विमानं आणि आगबोटी याना नाव मात्र छान व भारदस्त देत. विमानात शिडीनं चढून आत गेलो. तेथील हवाईसुंदरीन माफक पण गोड हसून, हात जोडून स्वागत केलं

आत गेल्यावर आसनक्रमाक शोधताना जरा धादल उडाली एस टी.च्या सवयीमुळे मी आसनक्रमाक सीट्स्वर बघत होतो. तेवढ्यात एका प्रवाशानं आसनक्रमाक वरती सामान ठेवण्याची जागी आहेत असं सागितल मला माझ्याच अज्ञानाच हसू आलं. स्थानापन्न झालो विमान कधी सुरू होणार याची धाकधूक व हुरहूर लागून राहिली

पट्टे बाधण्याची सूचना मिळाली स्क्रीनवरती धोक्याच्या वेळी अमलात आणावयाच्या गोष्टी व इतर सूचना दिल्या गेल्या. विमान सुरू होऊन धावपट्टीवरून सथ धावू लागल नतर विमानानं चाक पोटात घेतली व अधिकाधिक वरती जाऊन पुढे सुसाट झेपावू लागल. अर्थात विमानात बसल्यावर आपण जागच्या जागी उभे आहोत असं वाटत ते अलाहिदा!

विमानात बरेच मद्रासी व परदेशी लोक होते. एअर इंडियाने प्रवास करण स्वस्त पडत म्हणून बरेच परदेशी प्रवासी एअर इडिया पसत करतात; अस तेथील लोकाच्या एकदर बोलण्यावरून समजल माझ्या बाजूला एक खुराणा नावाचा पजाबी मनुष्य बसला होता तो मुबईस राहणारा असून त्याची ठाण्याला कसलीशी फॅक्टरी होती तो बराच तरुण होता. आमचं नावगाव विचारणं झाल गप्पागोष्टी सुरू झाल्या

विमानात बसल्यावर इग्रजीतच बोलल पाहिजे, असा बहुधा त्याचा कटाक्ष असावा, कारण उत्तम हिंदी येत असूनही, तो इग्रजीतच बोलत होता. आध्यात्मिक प्रवृत्तीच्या लोकाच्या डोळयांसमोर ज्याप्रमाण कायम त्यांच्या इष्टदेवता किंवा

महाराज येतात; तसच की काय; माझ्यासमोर साक्षात लॉर्ड मेकॉलेच उभा राहिला आमच्या राष्ट्रीय अस्मितेन जे एक शेवटच स्मित करून मेकॉले साहेबांच्या पायावर जे लोटांगण दीडशे वर्षांपूर्वी घातल ती तर अद्यापही मान वर करून पाहायलाही तयार नाही. आमचा एक मराठी भाषेचा शिवाजी एकाकी झुजला तेवढाच !

विमान वरवर जाताना व थोडे हादरे बसले की पोटात धस्स व्हायच असं वाटायच की रामराम म्हणायची वेळ येते की काय ?

सुरुवातीला हवाईसुदरीने गार, आबट अस सत्र्याचं सरबत दिल. घसा तेव्हाच घरघर करू लागला पुन्हा विमानात सरबत प्यायच नाही, ही प्रतिज्ञा करूनच ग्लास खाली ठेवला जरा वेळानं काही चॉकलेटस् व लवग, वेलदोडा दिला गेला

इकड तिकड बघत जरा वेळ स्वस्थ बसलो व मनाशीच विचार करू लागलो हा प्रवास करायला आपण का व कसे तयार झालो ? तो सगळा वृत्तात आठवू लागलो

मद्रास इलाख्यात थिरूचेंदूर गावी कार्तिकस्वामी मंदिराच्या आवारात माझी त्या मलेशियन माणसाशी पहिली ओळख झाली १९८५ च्या नोव्हेंबरअखेर मी व वाचनालयातील माझे काही सहकारी दक्षिणेच्या सहलीस गेलो होतो. थिरूचेंदूर येथे प्रसिद्ध कार्तिकस्वामी मदिरात सकाळीच आम्ही सर्वजण गेलो समुद्रकिनारी असलेल हे प्राचीन देऊळ भव्य आहे. माझे इतर सहकारी आरतीच्यावेळी आत दर्शनाला गेले मी बाहेरच सौभाग्यवती व लहान मुलगी चि कल्याणीसोबत खेळण्याच्या दुकानाशी खेळणी बघत होतो देवळाकड जाणारी जी दगडी पायवाट असते तिथंच उभा होतो खेळणी घेऊन झाल्यावर मी सहज बाजूला बघितलं तर हा पौर्वात्यदेशीय भासणारा इसम उभा होता आम्ही एकमेकांकड पाहिल्याबरोबर थोडं हसलो व हॅलो केल तो हिंदू नसल्यान त्याला मंदिरात प्रवेश नव्हता त्याच्याबरोबरचे त्याचे इतर तामीळ मित्र आत गेले होते

मग आम्ही एकमेकाची चौकशी करू लागलो. देश, समाज व त्याची वैशिष्ट्य यांवर चर्चा झाली सुमारे १५ मिनिटं आम्ही बोलत होतो हे बोलण एकमेकाशी जवळीक साधणार होत नंतर त्यानं मोठ्या प्रेमान माझा निरोप घेतला. आम्ही एकमेकाचे पत्ते घेतले व पुढच्या प्रवासास निघून गेलो त्याचा चेहरा व बोलणं

सारखं माझ्या डोळ्यांसमोर येत होतं.

१९८६ साली मी त्याला नव वर्षारंभाच शुभेच्छा कार्ड पाठवलं त्यावर त्यानं मला एक छानशी डायरी पत्रासोबत पाठवून दिली व त्या पत्रातच त्यान मला मलेशिया भेटीच आग्रहाच आमंत्रण दिल तेव्हापासून आमचा सतत पत्रव्यवहार सुरू होऊन आम्ही एकमेकाच्या अधिक जवळ आलो आमचे विचार व स्वभाव एकमेकाना कळत होते

नंतर डिसेंबर १९८७ मध्ये तो स्वत: काश्मीर व उत्तरप्रदेश पर्यटनासाठी आला होता तेव्हा मुद्दाम भिवडीला येऊन गेला एक दिवस घरी राहिला शाकाहारी जेवण घेतलं. माझ्या आजीशी मी त्याची ओळख करून दिली तर त्यान चक्क खाली वाकून नमस्कार केला ! गावातील काही यत्रमाग पाहिले आमच्या भिवडी गावाचं भूषण असलेल सव्वाशे वर्षांपूर्वीचं सार्वजनिक ग्रंथालय पाहिलं. चिक्कार बोलत होता. यावेळेस मला पुन पुन्हा मलेशियाला येण्याविषयी सांगत होता त्यान माझी मलेशिया सहल उत्तम होईल अशी हमी घेतली

शेवटी मी त्याला नोव्हेंबर १९८९ मध्ये मलेशियाला येतो असं कळविलं. त्यान फार आनद झाल्याच कळविल आणि लगेच भराभर मलेशियाबद्दल माहितीपत्रक पाठवायला सुरुवात केली. वारवार पत्र लिहून तो माझा उत्साह वाढवीत होता. कारण माझा पहिलाच विमानप्रवास व तोही परदेशप्रवास असल्यानं मनावर बरच दडपण आलं होत. त्याच्या पत्रांमुळे ते बरच कमी झालं. विमानतिकीट पक्कं झाल्यावर मी त्याला तार केली होती तो त्याची टोयोटा गाडी घेऊन कौलालंपूर विमानतळावर येणार होता

एवढा सगळा मागील विचार करीत असतानाच मद्रास जवळ येत असल्याची सूचना दिली गेली मुबई – मद्रास हा जवळजवळ दोन तासांचा प्रवास आहे दुपारी २॥ वाजण्याच्या सुमारास विमान मद्रास विमानतळावर स्थिरावल.

बरेच लोक उतरले तर बरेच आत आले बव्हशी भरणा तामीळ लोकाचा होता बरेच आपल्या पारपरिक वेषात होते मुडू परिधान केलेली, भाळी भस्म लावलेली पुरुषमंडळी व गोल पातळ नेसलेल्या आणि नाकात सुंकल घातलेल्या अम्मा विमानात विराजमान झाल्या. विमानातलं हे भारतीय वातावरण फारच सुखद वाटल. आपण कौलालंपूरला उतरेपर्यंत ह्याच वातावरणातून जाणार आहोत,

ही भावना मनाला आल्हाद देत होती मलेशियात तामीळ लोकांची वस्ती भरपूर आहे.

इथं जेवण दिलं गेल. जेवण चांगलं व भरपूर होत पण मसाल्याचा व त्यातील इतर काही घटकाचा फार उग्र वास येत होता. जेवणात दिल्या गेलेल्या पुऱ्या मात्र रेल्वेतील जेवणाप्रमाणेच जाडजूड होत्या इतर पदार्थ मात्र चागले होते.

हवाईसुंदरींना मात्र खूपच काम पडतं पण त्या हसतमुख व गोड स्वभावाच्या आणि चटपटीत दिसल्या एक हवाईसुंदरी तर एका तान्ह्या मुलाला खेळवीत होती

सायकाळी विमानानं पुन्हा झेप घेतली ती कौलालंपूरच्या रोखानच मद्रास ते कौलालपूर हे अंतर २८७५ कि.मी. इतकं आहे ताशी ९०० कि मी इतक्या वेगानं विमान उडत होतं एक हिंदी सिनेमा दाखविला गेला पण तो अगदी सामान्य असल्यान मी बघत नव्हतो कानाला इअरफोन लावून जुनी हिंदी सिनेमातील गाणी ऐकत बसलो. मध्येच एकदा चहा, कॉफी, ब्रेडचा हल्ला झाला परदेशी प्रवासीही मिळालेला बनपाव व चीजचा तुकडा जपून ठेवीत विमानातून प्रवास करणाऱ्यानी एवढी काटकसर का करावी, हे समजत नाही मध्येच विमानास हादरे बसले की पोटात ढवळून निघे

प्रसिद्ध मलाक्का सामुद्रधुनीवरून विमान जाऊ लागलं तोपर्यंत अधार पडला होता मलेशियाची वेळ भारतीय वेळेपेक्षा २॥ तासानी पुढे आहे कौलालपूर जवळ येत असल्याची सूचना मिळाली. तिथले दिवे चकाकू लागले तेव्हा हायसं वाटलं. तिथल्या वेळेप्रमाण रात्री ९ वाजता कौलालंपूरच्या 'सुबग' या विमानतळावर उतरलो बाहेर पडण्याची सर्वांनाच घाई झाली होती विमानात बसून तसा कटाळाच येतो बाहेर हवा कुद व ढगाळ होती पावसाची रिपरिप चालूच होती विमानतळावर आणखी चार ते पाच विमानं खाली मान घालून मकाट उभी होती हा विमानतळ सहारएवढा भव्य वाटला नाही कदाचित रात्रीमुळे तस भासलं असेल. विमानतळाच्या इमारतीत शिरलो इमारत सुरेखच होती. उजव्या हाताला अनेक प्रकारची दुकान होती. ॲम्ब्रोज विमानतळावर न्यायला आला आहे की नाही ही उत्सुकता होती श्री गोखले यानी मला तस सांगितल होत की, "तुझा मित्र नाही आला तर तू माझ्याकडे ये" पण हे गोखले नतर कुठ नाहीसे झाले ते

कळलं नाही.

बाहेर येताना अगोदर पासपोर्ट, व्हिसा तपासला गेला. पट्ट्यावरून सामान घेतल व काचेच्या तावदानाबाहेर नजर टाकली, तर ॲम्ब्रोज समोर उभा होता मला फार आनंद झाला त्यानं लगेच मला ओळखलं नाही पण हात उंचावून हलविल्यावर ओळख पटली व तो आनदान धावत आला परंतु त्याला आत येऊ दिल नाही. कारण अजून कस्टम तपासणी व्हायची होती मी ज्या मार्गामधून बाहेर पडलो तो स्थानिक लोकासाठी होता तेथील अधिकाऱ्यान अडवून मला असं विचारलं की, "तुम्ही पहिल्यादाच मलेशियाला येत आहात काय?" मी "होय" म्हटल त्यावर त्यान काहीही न बोलता मला बाहेर जाऊ दिल बॅगांची तपासणी केलीच नाही बॅगेत तस काहीच नव्हतं. एकूण दोन हजार रुपये किमतीच्या दोन साड्या, काही गाधी, नेहरूची पुस्तक, विनोबाची गीतेवरील पुस्तकं, काही कनोजच्या केळकरी अत्तराच्या बाटल्या व चॉकोलेटस् एवढच बाकीच सामान होतं मात्र साड्यावर ड्युटी भरावी लागते हे मला नतर समजल या साड्या ॲम्ब्रोजच्या एका तामीळ मित्राला हव्या होत्या त्याबदल्यात मला तो मलेशियन डॉलर्स देणार होता

बाहेर आल्यावर ॲम्ब्रोजनं माझ स्वागत केल त्याच्याबरोबर त्याचा एक मलेशियन मित्र होता त्याच नाव होतं कमरुद्दिन बिन युसुफ त्याचा चेहरा तसा कुरूपच होता व उचीनही कमीच होता मात्र त्याच्या चेहऱ्याची ठेवण भारतीयच भासत होती त्याला पाहिल्यावर व्यंकटेश माडगूळकराच्या बनगरवाडीतील आयबू मुलाण्याची आठवण झाली बरेच भारतीय पूर्वेकडील देशामध्ये खिस्तपूर्वकालातच स्थलांतरित व स्थायिक झाले आहेत ॲम्ब्रोज त्याची आलिशान टोयोटा मोटार घेऊन आला होता सामान डिकीत टाकलं मी पुढे बसलो पट्टा अगावर ओढून घेतला व गाडी कौलांलपूरकडे धावू लागली राहण्याच ठिकाण विमानतळापासून ११ कि मी दूर होतं

मलेशियात गाडी चालविणारा व त्याच्या शेजारी बसणारा - दोघांनाही कायद्याप्रमाणे पट्टा लावावाच लागतो. न लावल्यास २५० ते ३०० मलेशियन डॉलर्स इतका दड होतो बव्हंशी लोक नियम पाळतात व पोलीसही कडक अमलबजावणी करतात असं समजलं. मात्र प्रत्येक वेळी मोटारीत बसल्यावर व उतरताना हे पट्ट्याच सव्यापसव्य करावं लागतच. अपघातापासून सुरक्षा म्हणून

ही भावना मनाला आल्हाद देत होती मलेशियात तामीळ लोकांची वस्ती भरपूर आहे

इथ जेवण दिलं गेलं जेवण चागलं व भरपूर होतं पण मसाल्याचा व त्यातील इतर काही घटकांचा फार उग्र वास येत होता. जेवणात दिल्या गेलेल्या पुऱ्या मात्र रेल्वेतील जेवणाप्रमाणेच जाडजूड होत्या इतर पदार्थ मात्र चागले होते

हवाईसुंदरींना मात्र खूपच काम पडतं. पण त्या हसतमुख व गोड स्वभावाच्या आणि चटपटीत दिसल्या एक हवाईसुदरी तर एका तान्हुचा मुलाला खेळवीत होती.

सायंकाळी विमानान पुन्हा झेप घेतली ती कौलालपूरच्या रोखानच. मद्रास ते कौलालंपूर हे अंतर २८७५ कि मी. इतक आहे ताशी ९०० कि मी इतक्या वेगानं विमान उडत होतं एक हिंदी सिनेमा दाखविला गेला पण तो अगदी सामान्य असल्यान मी बघत नव्हतो कानाला इअरफोन लावून जुनी हिंदी सिनेमातील गाणी ऐकत बसलो मध्येच एकदा चहा, कॉफी, ब्रेडचा हप्ता झाला परदेशी प्रवासीही मिळालेला बनपाव व चीजचा तुकडा जपून ठेवीत विमानातून प्रवास करणाऱ्यांनी एवढी काटकसर का करावी, हे समजत नाही मध्येच विमानास हादरे बसले की पोटात ढवळून निघे

प्रसिद्ध मलाक्का सामुद्रधुनीवरून विमान जाऊ लागलं तोपर्यंत अंधार पडला होता मलेशियाची वेळ भारतीय वेळेपेक्षा २॥ तासानी पुढे आहे कौलालपूर जवळ येत असल्याची सूचना मिळाली तिथले दिवे चकाकू लागले तेव्हा हायस वाटलं. तिथल्या वेळेप्रमाण रात्री ९ वाजता कौलालपूरच्या 'सुबंग' या विमानतळावर उतरलो बाहेर पडण्याची सर्वांनाच घाई झाली होती विमानात बसून तसा कंटाळाच येतो बाहेर हवा कुंद व ढगाळ होती पावसाची रिपरिप चालूच होती विमानतळावर आणखी चार ते पाच विमान खाली मान घालून मुकाट उभी होती हा विमानतळ सहारएवढा भव्य वाटला नाही कदाचित रात्रीमुळे तस भासल असेल विमानतळाच्या इमारतीत शिरलो इमारत सुरेखच होती उजव्या हाताला अनेक प्रकारची दुकान होती. ॲम्ब्रोज विमानतळावर न्यायला आला आहे की नाही ही उत्सुकता होती श्री. गोखले यानी मला तस सागितल होतं की, ''तुझा मित्र नाही आला तर तू माझ्याकडे ये.'' पण हे गोखले नतर कुठ नाहीसे झाले ते

कळल नाही

बाहेर येताना अगोदर पासपोर्ट, व्हिसा तपासला गेला. पट्ट्यावरून सामान घेतल व काचेच्या तावदानाबाहेर नजर टाकली; तर ॲम्ब्रोज समोर उभा होता. मला फार आनंद झाला त्यान लगेच मला ओळखल नाही पण हात उंचावून हलविल्यावर ओळख पटली व तो आनंदान धावत आला. परंतु त्याला आत येऊ दिलं नाही कारण अजून कस्टम तपासणी व्हायची होती मी ज्या मार्गामधून बाहेर पडलो तो स्थानिक लोकासाठी होता. तेथील अधिकाऱ्यान अडवून मला असं विचारल की, ''तुम्ही पहिल्यादाच मलेशियाला येत आहात काय?'' मी ''होय'' म्हटल त्यावर त्यान काहीही न बोलता मला बाहेर जाऊ दिल बॅगांची तपासणी केलीच नाही बॅगेत तस काहीच नव्हतं एकूण दोन हजार रुपये किमतीच्या दोन साड्या, काही गाधी, नेहरूची पुस्तकं, विनोबाची गीतेवरील पुस्तक, काही कनोजच्या केळकरी अत्तरांच्या बाटल्या व चॉकोलेटस् एवढंच बाकीच सामान होत मात्र साड्यावर ड्युटी भरावी लागते हे मला नतर समजल. या साड्या ॲम्ब्रोजच्या एका तामीळ मित्राला हव्या होत्या त्याबदल्यात मला तो मलेशियन डालस देणार होता

बाहेर आल्यावर ॲम्ब्रोजन माझ स्वागत केल त्याच्याबरोबर त्याचा एक मलेशियन मित्र होता त्याच नाव होतं कमरुद्दिन बिन युसुफ त्याचा चेहरा तसा कुरूपच होता व उंचीनही कमीच होता मात्र त्याच्या चेहऱ्याची ठेवण भारतीयच भासत होती त्याला पाहिल्यावर व्यकटेश माडगूळकराच्या बनगरवाडीतील आयबू मुलाण्याची आठवण झाली बरेच भारतीय पूर्वेकडील देशांमध्ये ख्रिस्तपूर्वकालातच स्थलांतरित व स्थायिक झाले आहेत. ॲम्ब्रोज त्याची आलिशान टोयोटा मोटार घेऊन आला होता सामान डिकीत टाकल. मी पुढे बसलो. पट्टा अगावर ओढून घेतला व गाडी कौलांलपूरकडे धावू लागली राहण्याच ठिकाण विमानतळापासून ११ कि मी दूर होत.

मलेशियात गाडी चालविणारा व त्याच्या शेजारी बसणारा - दोघानाही कायद्याप्रमाणे पट्टा लावावाच लागतो. न लावल्यास २५० ते ३०० मलेशियन डॉलर्स इतका दड होतो. बव्हशी लोक नियम पाळतात व पोलीसही कडक अंमलबजावणी करतात असं समजलं. मात्र प्रत्येक वेळी मोटारीत बसल्यावर व उतरताना हे पट्ट्याच सव्यापसव्य कराव लागतंच अपघातापासून सुरक्षा म्हणून

हा पट्टा घालावा लागतो तो खादा, छाती यावरून उजव्या बाजूला कमरेशी घेऊन तेथे असलेल्या सॉकेटमध्ये अडकवावा लागतो.

गाडी सथपण मार्ग आक्रमीत होती. पावसाची भुरभूर चालूच होती गाडीचे वायपर्स जोरात फिरत होते रस्त्यावरील निऑन लाइटस्‌चा प्रकाश उगाच अस्वस्थ करीत होता. आपला देश सोडून कशासाठी आलो अस क्षणभर मनात येऊन गेल एखाद्यावेळेस नवीन वातावरण, पहिलाच परदेशप्रवास, अनोळखी चेहरे याचाही तो परिणाम असू शकेल

मात्र कौलालपूरचे आखीव, भव्य, स्वच्छ व पाढरे पट्टे ल्यालेले रस्ते आणि उत्तुंग व उत्तम प्रकारच्या इमारती डोळ्याना सुखावीत होत्या ॲम्ब्रोज शहराच्या एखाद्या भागाची, चौकाची किंवा रस्त्याची माहिती ओझरती सागत होता व माझी मान काटकोनात बराच वेळ फिरत होती कारण चोहोकडे सुदरता व भव्यता होती रस्त्यावर फक्त मोटारींची तुरळक वाहतूक होती आपल्या विनतीवरून एक परदेशी मित्र इतक्या लांब प्रवासासाठी आला आहे याच ॲम्ब्रोजला फारच अप्रूप वाटत होत व तस त्यान अनेकदा बोलूनही दाखविल

ॲम्ब्रोज चायनीज ख्रिशन आहे, वयानंही माझ्यापेक्षा ५/६ वर्षांनी मोठा आहे वेगळ्या क्षेत्रातला असून वेगळी सस्कृती, सस्कारातला आहे माझ इग्रजीच ज्ञान कामचलाऊ आहे. अस असूनही, आमच्या मैत्रीमध्ये कशाचीही आडकाठी आली नाही आपणच काही कृत्रिम भिती उभ्या करीत असतो

सुमारे १५/२० मिनिटानी आम्ही कमरुद्दिनच्या म्हणजे कमाच्या ब्लॉकवर पोहचलो तिथं सामान ठेवलं व जेवणासाठी एका चिन्याच्या हॉटेलात गेलो काही चटपटीत व गोड चिनी मुली या हॉटेलात सर्व काम करीत होत्या. पापलेट, मटण व भात असे पदार्थ ॲम्ब्रोजनं मागविले कसलंस सूपही पिऊन घेतल त्यात एक बारीक अड होतं ते म्हणे कबुतराच होत तेही खाल्ल! चिनी जेवणात सुपाला फारच महत्त्व आहे बुवा! मी क्वचित मासाहार करतो परतु इथ आल्यावर पहिल जेवण बघूनच अशी खात्री झाली की आपल्याला रोज मांसाहार करावा लागणार. जेवण झाल्यावर आइस्क्रीम खाल्ल विमानातील आंबट पेय, आइस्क्रीम व बदललेली हवा, याचा परिणाम व्हायचा तोच झाला माझा घसा घरघरू लागला आवाज बसला व खोकला सुरू झाला. नतर सुमारे एक आठवडा याने त्रास

दिला. प्रवासात शिणल्यामुळे झोप चागली लागली

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता न्याहारी करून, कौलालंपूर पाहण्यास सज्ज झालो. ॲम्ब्रोजन त्याची करड्या रगाची टोयोटा बाहेर काढली प्रथम एअर इंडियाच्या कार्यालयात जाऊन परतीच आरक्षण नक्की केल जाताना कौलालपूर शहर न्याहाळत चाललो होतो कौलालपूर हे मलेशियाच सुंदर असं राजधानीच ठिकाण आहे

**थोडा इतिहास:** मलेशियाचे मूळ नाव मलाया आहे आग्नेय आशियातील हा एक ऐतिहासिक व भौगोलिक प्रदेश मलेशियाच्या तेरा राज्यापैकी मलेशियन द्वीपकल्पातील ( पश्चिम मलेशिया ) दक्षिणेकडील अकरा राज्याचा प्रदेश 'मलाया' या नावानं ओळखला जातो. मलेशियन द्वीपकल्पाचा सुमारे ७५% भाग मलायाने व्यापला असून, लोकसख्या दीड कोटीच्या आसपास आहे मलायाच्या उत्तरेस थायलंड, पश्चिमेस प्रसिद्ध मलाक्का सामुद्रधुनी, दक्षिणेस सिंगापूर व पूर्वेस दक्षिण चिनी समुद्र आहे. या प्रदेशात जोहोर, केडाह, केलातान, मलाक्का, नेग्री साबिलान, पाहांग, पिनांग, पेराक, पेर्लीस, सेलांगूर, ट्रेंनागू या मलेशियाच्या अकरा राज्याचा समावेश होतो. ही अकरा राज्य म्हणजेच पूर्वीच मलाया सघराज्य ( फेडरेशन ) होय.

या संघराज्यात सिंगापूर वगळता मलेशियन द्वीपकल्पाचा पूर्वीचा ब्रिटिश अमलाखालील सर्व प्रदेश होता दि ३१ ऑगस्ट, १९५७ पासून या भागाला स्वतत्र संविधानीय राजसत्ता व राष्ट्रकुल देशांचं सभासदत्व होत

मलाया हा प्राचीन काळापासूनच मसाल्याच्या जिनसासाठी प्रख्यात आहे. इ स च्या १६ व्या शतकात मूळच्या हिंदू व मुसलमान व्यापाऱ्यांना मागे टाकून युरोपिअन वसाहतवाल्यानी आपला प्रभाव वाढविला. इ स १५११ मध्ये पोर्तुगीजांनी मलाक्का ताब्यात घेतल. नंतर मलाक्का डचाच्या हाती पडलं. पत्पश्चात् ग्रेट ब्रिटननं १७८६ मध्ये पिनाग बेट जिकून घेतलं. १९०० पर्यंत त्यानी आपल्या सत्तेचा विस्तार करून पूर्व मलाया काबीज केला. १९५७ मध्ये मलाया स्वतत्र झाला. १६ सप्टेंबर, '१९६३ रोजी मलाया सघराज्यातील अकरा सदस्य राज्यांना पूर्वीच्या उत्तर बोर्नियाचे साबा व सारावाक हे भाग जोडून, मलेशियाची निर्मिती करण्यात आली १९६५ मध्ये एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून सिंगापूर हे

मलेशियापासून विभक्त झालं त्यामुळे एकूण १३ राज्यांचा मिळून मलेशिया हा देश बनला. या देशाचे सध्याचे पतप्रधान डॉ. महाथीर मोहम्मद अतिशय लोकप्रिय नेते आहेत

इथ मलेशियन ही प्रमुख भाषा असून, ती रोमन लिपीमध्ये लिहिली जाते इथला प्रमुख धर्म 'इस्लाम' हा आहे 'मले' म्हणजे फक्त मुसलमानच, हे लक्षात ठेवल पाहिजे. इतरधर्मीयांचा समावेश 'मले' या नावात होत नाही या 'मले' म्हणजे मुसलमानाची संख्या ६०% च्या वर आहे उरलेल्या लोकांत ख्रिश्चन, बौद्ध, हिंदू आहेत चिनी खूप सख्येने आहेत ते मले, ख्रिश्चन, बौद्ध या तीनही धर्मांत विखुरलेले आहेत. हिंदूंमध्ये तामिळींचा भरणा फारच मोठ्या प्रमाणावर आहे तामिळींची एकदर लोकसंख्या येथे १५% तरी असावी मुसलमान व तामीळ लोक मलेशियात बहुसख्येनं असल्याने आपण भारताबाहेर आहोत, अस विशेषत्वान जाणवत नाही बर, हवा म्हणाल तर तीही मुबई, गोव्यासारखीच आहे

**मनमोहक कौलालंपूर** - कौलालपूर हे नैऋत्येस साडेतीनशे कि मी अंतरावरील सिगापूर, वायव्येस तितक्याच अंतरावरील पिनाग ह्या मोठ्या बदराशी रस्त्यान जोडल गेल आहे; तसंच आग्नेयेकडील ४३ कि मी अतरावरील स्टेटनम ह्या बदराशी व पाच कि मी अतरावरील विमानतळामुळे हे सर्व जगाशी जोडलं गेल आहे कथील व रबर याशिवाय इथ अनेक छोटे - मोठे उद्योगधदे निघाले आज कौलालंपूर ही पूर्व अशियातील महत्त्वाची बाजारपेठ बनली आहे.

एअर इडियाच्या कार्यालयातून आम्ही माझ परतीच तिकीट निश्चित करून आलो ३ डिसेंबर, १९८९ रोजी मी भिवडीला मुबईमार्गे परत येणार होतो. मोटार जिथं पार्क केली होती, तिथ आलो ही पार्किंगची जागा जमिनीच्या आत बरीच खोल होती व प्रशस्तही होती शेकडो मोठ्या गाड्या सुस्तावल्यागत तिथ पहुडल्या होत्या. इथ गाड्याही सामान्य नाहीत टोयोटा, मर्सिडीझ, डट्सन अशा लांबलचक गाड्या होत्या पूर्वेकड या लाबलचक गाड्याच बरच आकर्षण आहे. नुसत्या मोटारी पाहत बसलो, तरी वेळ चांगला जाईल. प्रत्येक गाडी नवीनच खरेदी केली आहे, अस वाटाव. चिन्यांच्या कांतीप्रमाणे, त्याच्या मोटारीही नितळच वाटल्या.

कौलालपूर रेल्वे स्थानकाच्या दिशेन गाडी वळविली कारण १९ नोव्हेंबर रोजी आम्ही पिनागहून बँकॉकला रेल्वेनं जाणार होतो पिनागजवळील बटरवर्थ

रेल्वे स्थानकावरून बँकॉकला जाणारी गाडी सुटते. आरक्षणासाठी थोडी गर्दी होती. सुमारे १५ मिनिटानी आरक्षण हाती पडल १९ तारखेला दुपारी दोन वाजता बॅकॉकला जाणारी आलिशान थाय रेल्वेची गाडी होती अर्थात मीटरगेज लाइन आहे मलेशियाचा बराच भूभाग डोंगराळ व दाट झाडींचा असल्यामुळे इथ रेल्वेच जाळ अजिबात नाही एखाददुसराच रेल्वेमार्ग असल्याच समजल स्टेशनही बेताचंच होतं, तरी आखीव, रेखीव, सुंदर, स्वच्छ अशी कितीतरी विशेषण दिली तरी ती कमीच पडतील कागदाचा एखादा कपटा वा सिगारेटच एकही थोटूक तिथ नव्हत फेरीवाले, पदार्थ विकणारे याचा मागमूसही नव्हता. सारं कसं शांत व सयत मुसलमानी वास्तुशिल्पाचा उत्तम नमुना म्हणून या रेल्वेस्थानकाकडे पाहिलं जात इथ थंड पेयंही पैसे यत्रात टाकले की मिळतात स्टेशनच्या आवारात लाल डगलेवाल्या हमालाऐवजी व भिकाऱ्यांऐवजी, सुरेख फुलझाड लावलेली दिसली. तेथे एक फोटो घेतला

नतर मोर्चा वळविला तो प्रचड अशा डिपार्टमेंटल स्टोअरकडं. याच नाव आहे 'सेंट्रल मार्केट.' दुकानातील खचाखच भरलेला माल पाहूनच डोळे विस्फारतात अमुक एक वस्तू तिथं नाही, अस होत नाही रंगीत खड्यापासून ते जडजवाहिऱ्यापर्यंत, मुलाच्या खेळण्यापासून ते फोटोग्राफीच्या सर्व सामानापर्यंत, तर वस्त्रप्रावरणांपासून ते अगदी काचसामान, चिनी मातीच्या विविध गोष्टींपर्यंत भरपूर माल ठेवला होता. फुलझाड, ऑर्किडसचेही काही प्रकार होते आकर्षक माडणीमुळे तिथल वातावरण मन भारून टाकणार होत

आयुष्यात पहिल्यादाच डिपार्टमेंटल स्टोअर पाहत होतो. तिथ मी एक स्लाइड्स रोल विकत घेतला. अर्थात याचे पैसे ॲम्ब्रोजने दिले. एक पैचादेखील खर्च मला ॲम्ब्रोज करू देत नव्हता आमच्याबरोबर ॲम्ब्रोजचा मित्र कमा होता. आम्ही तिघेही भिन्न-धर्मीय त्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये होतो डिपार्टमेंटल स्टोअर्सचे एक आणखी वैशिष्ट्य असे की, तिथ ठिकठिकाणी मलेशियाविषयी प्रवाशाना मार्गदर्शक ठरतील अशी पत्रके, विनामूल्य व हवी तेवढी मिळत. मलेशियात कॅमेरे व तत्सबधी वस्तू तशा स्वस्तात मिळत होत्या. फोटो काढण, हा एक ॲम्ब्रोजचा छदच आहे. या मार्केटमधील छोट्या छोट्या म्हणजे तारुण्याकडे नुकत्याच झुकलेल्या मुली येथील निरनिराळे स्टॉल्स अतिशय सराइतपणे साभाळीत होत्या

कौलालंपूरच्या रस्त्यातून बराच वेळ हिंडत होतो तिथल्या जालन (रस्ता)

तुनपेराक, जालन हाग कस्तुरी, मेबँक टॉवर्स, जालन दमनसरा या ठिकाणी अनेक उत्तुग व सुरेख इमारती उभ्या आहेत. वास्तुशिल्प एकदम देखण आहे. विशेषत इथल्या बँका, कमर्शिअल सेंटर्सच्या इमारती मुद्दाम पाहण्यासारख्या आहेत डोळ्याच पारण फिटतं. आम्ही मुद्दाम अशा इमारती पाहावयास जात होतो सर्वच इमारतींमध्ये सरकते जिने असायचे. सवय नसल्यामुळे सुरुवातीला खूपच तारांबळ होत होती विशेषत: उतरताना व्हायची. पाय टाकायला जावे, तर ते पट्टे आपले पुढेच सरकताहेत म्हटलं, जरा चुकलो तर सरळ खाली गडगडत जाणार की काय ! इथले राजे सुलतान अब्दुल समद याचा राजवाडाही पाहण्यासारखा आहे. अर्थात बाहेरूनच बघावा लागला राजवाडा महाकाय असून देखणा आहे त्याचे खांबच त्या राजवाड्याच्या बेलागपणाची साक्ष देतात. महिरपी गवाक्ष, तशाच कमानी व तीन तुर्की पद्धतीचे गोल मनोरे त्यात आणखी सौंदर्याची भर घालत होते. उत्तम गुळगुळीत रस्ते व फ्लायओव्हर्स हेही कौलालंपूरचे एक वैशिष्ट्य आहे

दुपारी आम्ही जेवायला गेलो त्या हॉटेलात मालक ते वाढप्यापर्यंत सर्व स्त्रियाच होत्या प्रथम सोयाबीन सरबत घेतल थड असल्यानं बर वाटलं इथली हवा कुद व उष्ण, दमट असल्याने सारखी तहान लागायची इथले चिनी लोक तहान लागली की सोयाबीन वा बार्लीपासून बनविलेलं सरबत किंवा कोरा चहा पितात. पाणी पिताना एकही चिनी आढळत नव्हता जेवणात सोयाबीनपासून बनविलेले काही पदार्थ, मच्छीफ्राय व भात असे पदार्थ होते. मी बव्हशी शाकाहारी असून, मांसाहार पचापत जरता, अस अम्ब्राजला अगादरच पत्रातून कळावल हात, परतु चिनी लोकांच्या डोक्यात शाकाहार ही संकल्पनाच नाही. मुसलमानांच्यात जस म्हणतात की 'जो रोझा नहीं रखता वो मुसलमिन काहे का?' तसं चिन्यामध्ये 'जो मांसाहार करीत नाही, तो चिनी कसला?' अस समजतात की काय न कळे ! मासाहार व चिनी याचं हे असं अतूट नात आहे मी शाकाहारी आहे, असं सागितल्यावर त्याला थोडा प्रश्नच पडला होता, परतु चिकन वा मासे खायला मला आवडतील; अस सांगितल्यानं त्याला बरं वाटलं इथल्या आहारात हिरव्या भाज्यानाही फारसं महत्त्व नाही. अर्थात आपण ज्या ठिकाणी जाऊ, तिथं तिथल्या परिस्थितीप्रमाण राहायच, ह माझ धारण असल्यान त्रास झाला नाही

जेवण झाल्यावर कौलालंपूरमधील काही सुंदर इमारतींचे फोटो घेतले व तिथून मलेशियाचं संसद भवन पाहावयास गेलो दाट झाडी, आजूबाजूला हिरवीगार

मैदाने व बगीचे याच्या पार्श्वभूमीवर प्रचंड पाढऱ्या पत्थराची १८ मजली वास्तू डोळ्याना फारच सुख देते राज्यसभा, लोकसभा व इतर खात्यांची कार्यालयं, ग्रंथालय, सभा -समेलन कार्यालय, बकेट हॉल, कमिटी रूम्स अशी अनेक दालन आत आहेत इथल्या ससद भवनात प्रवेश करतानाही इतरानासुद्धा तिथला पारपरिक वेष धारण करावा लागतो स्त्रिया जरी पाश्चात्य पोशाखातील असल्या तरी त्याचा झगा वा फ्रॉक गुडघ्याच्याही खाली येईल, असा असावा व तसा नियमही आहे

तिथून कौलालपूरचे भूषण समजल जाणाऱ्या प्रसिद्ध नॅशनल म्युझियमला भेट दिली हे म्युझियम इथल्या राष्ट्रीय स्मारकासारखच आहे या म्युझियमची इमारत मोठी प्रशस्त व छान असून, तो मलेशियन स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना म्हणावा लागेल उतरत्या कौलांच्या दोन उतरण्या एकावर एक ठेवलेल्या आहेत इमारतीच्या दर्शनी व आडव्या भिंतीवरील इटालियन ग्लास मोझेइकमधील दोन भित्तिचित्रे लक्ष वेधून घेतात लाबी ३५ मीटर व उची ५ मीटर आहे काही ऐतिहासिक व सास्कृतिक देखावे त्यावर चित्रित केले आहेत

आत गेल्यावर पर्यटकाची बरीच गर्दी दिसली म्युझियमच्या आत पण दिवाणखान्यात दिव्यांचा झगमगाट, मद सगीत, उंची झुबर, सर्वत्र चकचकीत टाइल्स व स्वच्छता या गोष्टींकडे मन आकर्षित होऊन न कळत आपल्या देशातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वास्तूबरोबर तुलना करीत होते आपल्याकडील ऐतिहासिक व सास्कृतिक वास्तू नि:संशय वादातीत आहेत, पण ! हा पण, नेहमीच त्रास देतो स्वच्छता, शिस्त, वास्तूपालन व त्यासबधी आपली कोती दृष्टी बघून आपण फारच तोकडे पडतो, याची जाणीव होते

या म्युझियममध्ये अनेक दालन आहेत मलेशियाचा इतिहास दाखविणाऱ्या काही वस्तू आहेत. जुनी शस्त्रास्त्र आहेत खास 'मले' पद्धतीच्या कलात्मक व हस्तकलेच्या विविध वस्तू, नाणी, कापड अशा अनेक बाबी आहेत मलेशियन जीवन पद्धती दाखविणारे काही प्रसग उभे केले आहेत. एका चिनी राजपुत्राच्या विवाहप्रसगाचे चित्रण तर फारच मनोवेधक झाले आहे गणपती उत्सवात जशी आपण मातीची विविध चित्रे उभी करून काही प्रसंग तयार करतो तर तो विवाहाचा प्रसगही अगदी हुबेहुब तयार केला आहे कलाकारानी मातीलाच जिवतपणा दिला आहे. तो विवाहसोहळा मी अजूनही विसरू शकत नाही, इतका टवटवीत आहे काही दालनांमध्ये मलेशियात सापडणारे पशुपक्षी पेंढा भरून उभे केले आहेत त्याची साराशरूपान माहिती त्या कलाकृतीजवळ लिहिलेली असते मलेशियाचा

आर्थिक वेग दाखविणारे काही प्रसंगही त्यात आहेत रबर व खाण या प्रमुख उद्योगाचीही सचित्र माहिती दिलेली आहे. आणखी एक महत्त्वाच म्हणजे साबा व सरावाक प्रातात सापडलेल्या आदिमानवाचे सागाडे व काही भाडी, इतर काही वस्तू ठेवल्या आहेत

म्युझियममधून बाहेर पडलो. पाऊस अधूनमधून पडतच होता. हवेत उष्मा जबरदस्त होता एका उंच टेकडीवर गेलो, तिथून कौलालपूर शहर फारच मनोहर दिसत होत. जवळच 'ला सल्ले' या शाळेच एक केंद्र कौलालंपुरात होत. तिथ गेलो. 'ला सल्ले' ही एक फ्रेंच शिक्षणसस्था आहे. जगात तिच्या बऱ्याच ठिकाणी शाखा आहेत. ॲम्ब्रोज तिथ काही काळ काम करीत होता त्या शाळेचे मुख्य संचालक इथं राहतात. राहण्याची जागाही टुमदार होती. लागूनच दोन टेनिस कोर्टस् होती प्रथम स्वागत एका पामेरियन कुत्र्याने केले. लोक कुत्रा का पाळतात, हेच समजत नाही. कुत्रा म्हटला की एकदम १४ इजेक्शन्सची मूर्तिमंत भीती पोटात खड्डा पाडून जाते हल्ली हे पाळीव कुत्रे म्हणजे एक शो -पीस समजला जातो, अशी काही शहरी बायकाची समजूत आहे म्हणे ! आतमधील दिवाणखाना उंची फर्निचराने युक्त व प्रशस्त होता मोठ्या लाकडी कपाटामध्ये बरीच पुस्तके व्यवस्थित लावून ठेवली होती बरीच वर्तमानपत्रे टी -पॉयवर पडलेली होती एक मोठा पियानोही होता ॲम्ब्रोज आत गेला व फळे खायला घेऊन आला. त्यान मला काही फळाची नाव सागितली व ती चिनी नावं असल्यान ती लक्षात ठेवण्याचा मी अजिबात प्रयत्न केला नाही एका कोचावर आरामात बसलो होतो चहा झाला जरा वेळान एक म्हातारा चिनी मनुष्य आला. तोही खिश्चन होता तो उंच होता व चेहरा गभीर होता माझी व त्याची ॲम्ब्रोजन ओळख करून दिली हाच मनुष्य या शाळेचा प्रमुख होता ॲम्ब्रोज खिश्चन व त्यात पुन्हा ब्रदर असल्याने, त्याच्याबरोबर आलेला मनुष्य खिश्चन असावा, अशी त्याची भाबडी समजूत झाली असावी ह्या प्रकाराने मला सतत १५ / १६ दिवस छळल अर्थात माझा धर्म कोणता, हे कोणी विचारायचे नाही, पण मी खिश्चन आहे, हेच सर्वजण गृहीत धरून चालायचे त्या म्हाताऱ्या गृहस्थाने मला मुबईच्या रेव्हरडाची चार -पाच नावे सांगून, तुला ते माहीत आहेत काय ? असा प्रश्न केला त्यावर मी अज्ञानी बालकाप्रमाणे त्याच्याकडे नुसताच बघू लागलो. "अहो, मुंबईची वस्ती करोडोच्या आसपास आहे व त्यामुळे फारशा ओळखी होत नाहीत !" असं सागून ॲम्ब्रोजनं माझी सुटका केली नंतर तो मनुष्य निघून गेला जाताना हस्तादोलन करून Welcome

to Malaysia हे म्हणायला तो विसरला नाही.

'पेटालिंग जाया' नावाचे एक नवीन शहर कौलालंपूरजवळ वसविण्यात आल आहे सायंकाळी पेटालिंग जाया येथे गेलो शहर अत्यत आखीव आहे. रस्ते विस्तारान मोठे व आरशासारखे स्वच्छ आहेत. ऑफिसेस् सुटल्यानं रस्त्यावर बरीच गर्दी होती मोटारी व मोटारसायकलींची वेगाने धावपळ होत होती मोटारी व मोटारसायकली सर्व जपानी बनावटीच्या होत्या जपाननं मलेशियात व इतर पूर्वेकडील देशांमध्ये बरीच मोठी बाजारपेठ काबीज केली आहे. मोटारवाल्याना जसं पट्टे लावणं सक्तीच, तसंच फटफटीवाल्यांना व त्यांच्या मागे बसणाऱ्यांना शिरस्त्राण (हेल्मेट) वापरण सक्तीचं आहे. त्यामुळं ते कस वापरायचं, ऑफिसला किंवा बाजाराला जाताना ते ओझं, अडगळ कशी साभाळायची, असा प्रश्न तिथं कोणी विचारीत नाही, आणि निवडणुका होईपर्यंत हेल्मेटची सक्ती करू नये, असं तिथल सरकारही कधीच म्हणत नाही माणसाची सुरक्षितता ही तिथ महत्त्वाची मानली गेली आहे.

'पेटालिग जाया' शहरात ॲम्ब्रोजची एक बहीण राहते तिच्या घरी सुमारे तासभर गप्पा मारून व कॉफीचा आस्वाद घेऊन, तिथून बाहेर पडलो रात्र झाली होती. दिवसभराच्या धावपळीन दमलो होतो व भूकही लागली होती एका चिनी हॉटेलात जेवण घेतल. कमाही वाटेत भेटला तोही आमच्याबरोबर जेवायला आला. मलेशियाचा धर्म जरी मुसलमान असला; तरी तिथल्या जीवनावर चिनी प्रभाव बराच आहे. हॉटेलांत काही तामीळ तरुण बसले होते. चिनी हॉटेलात पदार्थ स्वस्त मिळतात मलेशियात दारू व अन्य मादक पदार्थांवर बरीच बंधन आहेत. व्हिस्की, रम याचा वापर हॉटेलातून फारसा होत नाही मात्र बिअर तिथ भरपूर मिळते. बिअर हे पेय तिथ सॉफ्ट ड्रिंक म्हणून समजलं जातं. इथ बिअर बारला 'पब' म्हणतात. मलेशियात टिन बिअर लोकप्रिय आहे

जेवण झाल्यावर कमाच्या ब्लॉकवर परत आलो दुसऱ्या दिवशी पिनांगच्या रोखानं कूच करावयाच होत. ॲम्ब्रोजचे घर पिनागला असून, त्याची आई व भाऊ तिथ राहतात.

रात्री गप्पागोष्टी चालू असताना, कमाने मला विचारले की, "तुझा आवडता चित्रपट नट कोण?" मी म्हटल, "अर्थातच राजकपूर!" तेव्हा तो सावरून बसला व त्यान हळूच मुकेशच्या लोकप्रिय गाण्यांच्या दोन कॅसेटस कपाटातून काढून दिल्या, आणि म्हणाला, ऐक आर के ची गाणी! कमा मुसलमान असल्यान

त्याला उर्दू थोड समजत होतं, व तसंच काही महिन्यापूर्वी उत्तर प्रदेश व पाकिस्तान या ठिकाणी तो येऊन गेला होता. त्यामुळ अगदी मोडकंतोडक हिंदी बोलू शकत होता. खाना खाऊँ - गाना गाऊँ अस चेष्टेत विचारीत असे कोकणातला किंवा दक्षिणेकडचा मनुष्य हिंदी बोलतो, तसाच तो प्रकार वाटला मलेशियात राजकपूरचे सिनेमे लोकाना फार आवडतात, अस कमान सागितल आवारा, श्री ४२०, सगम, जोकर हे खास आर के चे चित्रपट १०० दिवसपर्यंत येथील थिएटरात चालतात

पिनागला जायच म्हणून सकाळी लवकर उठलो सामान आवरून गाडीत टाकल आमच्या इमारतीच्या खाली मुबईप्रमाणच खाद्यपदार्थांच्या काही हातगाड्या चिन्यांनी लावल्या होत्या तिथ एका ठिकाणी दाल फ्राय व परोठा खाऊन पिनागच्या दिशेने गाडी निघाली. परोठा छान होता. पेट्रोल भरून घेतलं मलेशियात पेट्रोल स्वस्त व मुबलक मिळत वाटेत एका ठिकाणी एका वृद्धाला आमच्या गाडीत घेतलं, कारण तो ॲम्ब्रोजच्या ओळखीचा होता व त्यालाही पिनागला जायच होतं

याच रस्त्यावर सुमारे १२ कि.मी अतरावर जगप्रसिद्ध 'बाटू केव्हज' आहेत तिथं अगोदर गेलो हवा ढगाळ असल्यान उकाडा असह्य होत होता या 'बाटू केव्हज' म्हणजे एक नैसर्गिक चमत्कार आहे लाव्हाच्या उद्रेकामुळ प्रचड डोंगर तयार होऊन झुंबर लटकावीत, तसे लाव्हाचे खडक वरून खाली आत सोडलेले दिसतात ही गुहा अजस्र आहे अशी अनेक झुबर लटकत आहेत अस दिसून येतं. फारच प्रेक्षणीय स्थान आहे आतमध्ये दिव्यांची व पाण्याची सोय केली आहे. या गुहेतच तामीळ लोकाच कार्तिक स्वामींच एक मदिर आहे. काही पुजारी तिथ काहीबाही करीत होते ॲम्ब्रोज या पुजाऱ्यानाच 'प्रीस्ट' समजत असे त्याला मग पुजारी व विद्वान ब्राह्मण यातील फरक समजावून द्यावा लागला मी अश्रद्ध असल्याने देवळाच्या आत जाऊन दर्शन घेण, तीर्थ घेण या भानगडीत पडलो नाही मात्र पुजारी दक्षिणेसाठी मागे लागत नाहीत बाटू केव्हज तशा पर्वतीएवढ्या उंचीच्या टेकडीवर आहेत १५० पायऱ्या चढून वर जावे लागते इथ माकड व कबुतर खूप असून, सर्व टेकड्या व आजूबाजूचा परिसर हिरवागार आहे. नतर जरा वेळानं खाली आलो व एका लहानशा बगीच्यातून, काही घर व त्यावरील लाकडी साकव ओलांडून आणखी एका गुहेत गेलो आतमध्ये आणखी एक प्रशस्त जागा असून तेथे अनेक हिंदू देवदेवता मूर्तींच्या स्वरूपात ठेवलेल्या होत्या.

त्या रंगविलेल्या असून त्यांच्यावर रंगीत दिव्यांचे झोत सोडले होते. काही पौराणिक कथाही मूर्तिरूपान सादर केल्या होत्या तिथून खाली आल्यावर त्याच परिसरातील एक तामीळ शैक्षणिक संस्था पाहिली व पुन्हा आमची गाडी पिनांगच्या दिशेन धावू लागली. वाटेत एक मोठी औद्योगिक वसाहत लागली

माझा आवाज साफ बसल्यानं मी गप्पच होतो ॲम्ब्रोज गाडी चालविताना त्या वृद्धाशी काहीतरी बोलत होता पाम, नारळ, केळी याची मोठी बागायत दिसत होती. मलेशियात पाम, नारळ, केळी, कथिल, रबर यांच मोठ उत्पन्न आहे एका बाजूला रबर व एका बाजूला पामच्या झाडांच्या बागायती, प्रवासात सोबत करीत होत्या रबराचे मळे पूर्वी केरळमध्ये कोट्टायम जिल्ह्यात पाहिले होते विषुववृत्तीय प्रदेश असल्यान तिथ बारा महिने पाऊस भरपूर पडतो त्यामुळ जगलं व शेती नेहमीच सदाहरित दिसते. मलेशियात माझा जितके दिवस मुक्काम होता तितके दिवस रोज एकदा तरी पाऊस पडायचाच जातानाच एके ठिकाणी कथिलाच्या खाणी दिसल्या. कथिल मोठ्या प्रमाणावर काढले जाते हाच एक पाढरट व करडा ढब्बा या हिरव्यागार वनश्रीवर दिसतो. मलेशियातही जगलतोड मोठ्या प्रमाणावर होत असून, त्याबद्दल बरीच चिता येथील निसर्गप्रेमींना वाटत आहे कथिलाच्या खाणींमध्ये प्रामुख्याने इडोनेशियन व चिनी मजूरवर्ग आहे शेती व बागायतींमध्येही हाच वर्ग मोठा आहे पण फक्त मजूर म्हणूनच ! मालकवर्ग हा फक्त 'मले' आहे. कारण मले लोकांना जमीन, सपत्ती याबाबत विशेष सवलती आहेत रेल्वे, चहा व रबर मळ्यात काम करणाऱ्यांत, भारतीय मजुराचा भरणा अधिक आहे. 'मले' लोकांना इतरांपेक्षा अधिक सवलती आहेत 'मले' म्हणजे केवळ मुसलमान हे लक्षात ठेवायला हवे


पिनागच्या वाटेवर एका चिन्याच्या हॉटेलात जेवण घेतलं जेवणात भात, प्रॉन्स, चिकन असे पदार्थ होते. चिनी लोकांच्या हॉटेलात गेल्यावर हे लोक किती प्रचड प्रमाणात मासाहार करतात याची कल्पना येते. आपल्याकडील ब्राह्मण लोक जसे ताव मारून गोड खातात, तसे हे चिनी तिन्हीत्रिकाळ मासाहार करतात. मला मोठ नवल वाटायच. माझ्या जेवणात चिकनच्या वाडग्यात चिकनच्या पायाचा एक अख्खा पंजा आला. तो प्रतिक्षिप्त क्रियेमुळे तत्परतेने बाजूला ठेवला हे ॲम्ब्रोजच्या लक्षात येऊन, तो थोडा ओशाळलाच. मी भारतीय असल्यान; माझ्या जेवणात गाय किंवा डुक्कर याचं मास येणार नाही, याची तो खबरदारी घेत होता. या हॉटेलच एक वैशिष्ट्य म्हणजे एक वृद्ध स्त्री हे हॉटेल सांभाळीत होती.

बारीक मिचमिचे डोळे व निर्विकार मुद्रा हे तिचंच काय; पण सर्व चिन्यांचं वैशिष्ट्य होत चिन्याच्या चेहऱ्यावर एवढे गूढ का, याच गूढ अद्याप उलगडलेलं नाही. हॉटेलात काम करणारी लहान मुलं व मुली हे सर्व एकाच कुटुंबातील होते सुट्टीच्या दिवसात ही मुल हॉटेलातून काम करतात या अनुभवाचा फायदा त्यांना मोठेपणी दुकान किंवा हॉटेल साभाळण्यासाठी होतो आपण जसे वेफर्स, बटाटा चिप्ससारखे पदार्थ खातो, तसे इथ मासाहारी पदार्थ सुकवून व त्याचे निरनिराळे प्रकार बनवून लहान लहान पाकिटांतून विक्रीस ठेवले जातात हॉटेलात सर्रास बिनदुधाचा व साखरेचा चहा मिळणार दूध हवे असल्यास मिल्कमेड घालून चहा देणार कॉफी हा प्रकार इथ चहापेक्षा कमी लोकप्रिय आहे. दूध, दही, ताक, लोणी असे पदार्थ इथ नाहीत. कारण मलेशियात पशुधनाची कमतरता आहे जगलं खूप असूनही इथ दुभती जनावर खूप कमी दिसली त्याचच आश्चर्य वाटल चिनी व खिश्चन हे लोक डुकर खूप पाळतात त्याच मास इथ बरच लोकप्रिय आहे जाताजातानाच दोन सायकलस्वार नुकतेच सोलून आणलेले डुक्कर सायकलवरून वाहून नेताना बघितले होते ग्रामीण भागातील घरं जमिनीपासून चार -पाच फूट उंचीवर व सपूर्ण लाकडी आहेत काही घराच्या लाकडावर बारीक नक्षीकाम केलेल दिसलं रस्त्याच्या कडेला काही फळविके बसले होते, परतु भाव फार सागायचे टोयोटा मोटारींतून हिंडणाऱ्या लोकाना थोडाच ते वाजवी भाव सागणार आहेत ! माणस रस्त्यान पायी हिंडताहेत, हे दृश्य एकूण दुर्मिळच.

कौलालपूर ते पिनाग या महामार्गावर मोटारींची वर्दळ प्रचड आहे रस्ता मोकळा आहे, असं क्वचितच होत. परतु सर्वच गाड्या ८० / ९० कि.मी. वेगाने चालल्या होत्या गाडी लाबलचक व उत्तम स्थितीत असण, हे बहुधा तिथ प्रतिष्ठेच लक्षण असाव. भारतात जराजर्जर गाड्या चालताना पावलागणिक आढळतात तस इथ दिसलं नाही. आपली बायको जास्तीत जास्त चागली दिसावी, अस ज्याप्रमाण प्रत्येक नवऱ्याला वाटत तसं इथल्या प्रत्येक मोटारमालकाला आपली गाडी उत्तम स्थितीत असावी, अस वाटत. मोटारी रस्त्यावरून धावताना शिस्तीत धावणार वृथा ओव्हरटेकिंग नाही. सहसा हॉर्नही वाजवीत नाहीत भारतात ओव्हरटेकिंगच्या स्पर्धेमुळे जास्तीत जास्त अपघात होतात समोरचा रस्ता मोकळा दिसला तरच गाडी पुढे हाकायची

वाटेत 'इपोह' नावाच एक मोठं शहर लागलं. या शहराची आधुनिक रचना पाहूनच मी खूश झालो.

पिनांग जवळ येत होतं उन्हामुळे खूप उकाडा होत होता एअर कॉन चालू असूनही काही उपयोग होत नव्हता. शेवटी गाडीच्या बंद काचा उघडल्यावर वारा येऊ लागला व त्यानं बरं वाटलं मलेशियातील रस्ते ही पण एक सुखद संवेदना आहे. कौलालंपूर ते पिनांग हे अंतर ३८० कि मी चं आहे हे अंतर कापताना पोटातील पाणीही हललं नाही. भारतात जसं खड्ड्यातून रस्ता दिसतो, त्याउलट मलेशियात रस्त्यांमधून मलेशियाच्या विकासाचा खरा मार्ग दिसतो. रस्ते स्वच्छ व नितळ! आणि त्याची डागडुजी वेळेवर होते. अनेक नवीन रस्ते ६० / ८० फुटी व शिवाय अनेक ठिकाणी दुपदरी आहेत रस्त्याच्या रचनेतही कौशल्य वापरलं होत. मात्र टोलची भानगड बरीच आहे. ठिकठिकाणी या गावाहून; त्या गावात जाण्यासाठी 'टोल' भरावा लागतो. सर्वच नवीन रस्त्यावर एकेक ठिकाणी ४ ते ५ टोल बूथ्स उभे केले आहेत त्यामुळ वाहनांची रांग लागत नाही काही ठिकाणी टोल घेण्यासाठी स्वयंचलित यंत्रे आहेत लोक पैसे टाकूनच पावती घेऊन पुढे जातात प्रवासी बसेसही बऱ्याचशा वातानुकूलित आहेत. गाडीवाल्यांची आपापसात भांडण नाहीत, की गाड्या एकमेकावर आपटणं नाही अर्थात एक मात्र नक्की की इथ ट्रक वाहतूक खूपच कमी आहे या मलेशियन लोकाना मुबई-आग्रा व मुबई-पुणे मार्गावरील ट्रक वाहतूक एकदा दाखवायला पाहिजे, असं मनात येऊनही गेलं हळूहळू पिनाग बदर दिसू लागलं.



संसद भवन, कौलालंपूर

# प्रेक्षणीय पिनांग

पिनांग हे ब्रिटिशानी वसविलेलं सुरेख व मोठ बंदर आहे. हे बदर मलेशियाच्या वायव्य भागाकड आहे १७८६ साली पिनाग बेट ब्रिटिशांच्या ताब्यात आल पिनागला जाताना मध्येच एक मोठी खाडी आहे. पिनांग हे मोठं शहर, आंतरराष्ट्रीय बंदर व विमानतळ आहे पिनांगला सुदरतेने नटलेले अनेक बीचेस आहेत, तशीच काही प्रेक्षणीय स्थळं आहेत रेल्वेचा थायलडला जाणारा फाटा पिनागजवळील बटरवर्थला आहे. पिनांगला बटरवर्थहून फेरीन जाव लागत. तेथील फेरीबोटी ह्या अगडबंब असतात मोटारींसह अनेक माणस त्यातून प्रवास करतात. या फेरींची सतत ये-जा सुरू असते माणशी ४० सेन्स असे तिकीट होते व मोटारींना ३ मलेशियन डॉलर्स इतके पैसे पडत फेरीत बसायला लाकडी आसनं आहेत फेऱ्या भरून वाहत असतात कारण पिनांग हे पर्यटकाच फार प्रिय ठिकाण आहे पलीकडे जायला या फेरीने सुमारे १५ मिनिटं लागतात. फेरीत एक लहानस रेस्टॉरटही होत. वरती माळ्यासारखी जागा होती काही माणस तिथंही बसली होती

आम्ही बंदरावर येऊन पोहोचलो, परतु पुढं पिनागला जाण्यासाठी गाड्यांची लांबलचक राग होती. सुमारे २०मिनिटानतर आम्ही मोटारीसह फेरीत प्रवेश केला समोरच पिनागच्या उत्तुंग इमारती दिसत होत्या. काही छायाचित्र घेतली समुद्र शात व निळाशार होता इथल्या इमारतींवर प्रथमपासून ब्रिटिशांचा ठसा दिसत होता जसजस पिनांग जवळ येऊ लागल, तसतशा अनेक मनमोहक इमारती दिसू लागल्या १५ मिनिटानी पिनागला पोहोचलो पूर्वीचे सुलतान, ब्रिटिश अधिकारी, राज्यपाल यांच्याही महालवजा इमारती दृष्टीस पडत होत्या. रस्ते विस्तीर्ण व स्वच्छ होते. काही सायकल-रिक्षाही दिसल्या त्या रिक्षात दोन माणसे पुढे बसतात व रिक्षावाला मागे बसून ही रिक्षा हाकीत असतो. ही रिक्षा उघडी व ठेंगणी असते

पिनांगला बहुसंख्येनं चिनी लोक राहतात युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, द कोरिया इथून बरेच पर्यटक पिनागला भेट द्यायला येतात आशियाई

पर्यटक मात्र फारच कमी दिसतात

ॲम्ब्रोजचे स्नेही वाटेत एका ठिकाणी उतरून निघून गेले आम्ही सायकाळी ५ वाजण्याच्या सुमारास पिनांगमध्ये ॲम्ब्रोजच्या घरी पोहोचलो जुन्या पद्धतीचा तो बगला आहे. फाटक उघडून, गाडी बाहेरील मोकळ्या जागेत उभी केली. चागल लॉन तयार केलं होत प्रथम स्वागत केल ते दोन मस्तवाल अल्सेशियन कुत्र्यांनी त्याचे चेहरे बघून पोटात गोळा उठला. शोभेच्या पामेरियन कुत्र्यानाही घाबरायला होत. ॲम्ब्रोजची ओळख पटल्यावर ते निघून गेले व मी ते कुत्रे गेल्यावरच गाडीतून खाली उतरलो.

सामान घेऊन आत गेलो, तो समोर ॲम्ब्रोजची आई उभी होती. अगदी बारीक डोळे व लहानसर अशी मूर्ती होती आयुष्यात बरंच काही सोसल आहे, याच्या स्पष्ट खुणा तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर दिसत होत्या ॲम्ब्रोजने नंतर सांगितले, की घरात लहान मुल खूप असल्याने व मिळकत बेताची असल्याने बरीच वर्षे गरीबीशी झगडाव लागल त्याच्या आईने मला जवळ घेतल, मी तिला खाली वाकून नमस्कार केला तिन माझी सर्व चौकशी केली एक मजली व बरंच लाकूडकाम केलेल ॲम्ब्रोजच घर होत फर्निचर व्यवस्थित लावलेल होतं घरात कूलर, फ्रीज, टेलिफोन, टी व्ही अशा अत्याधुनिक वस्तू होत्या माडीवरची एक खोली ॲम्ब्रोजने मला दिली होती सामान तिथ टाकल व गार पाण्यानं मनसोक्त आंघोळ केली. नंतर चहा, केक व सोयाबीनपासून बनविलेल्या पदार्थांचा आस्वाद घेतला दोन दिवसाचे कपडे धुवायचे होते ते धुतले.

जरा वेळ दिवाणखान्यात आराम करीत बसलो. एकेक गोष्ट उगाच बसल्याबसल्या बघू लागलो. आणि या वेळेसच ॲम्ब्रोज हा किरिस्ताव आहे, असं समजल ठिकठिकाणी भिंतींवर बायबलमधील वचनं फ्रेम करून ठेवली होती, कुठ क्रूस, तर कुठे मेरी किंवा जीझसचे पुतळे दिसू लागले प्रसिद्ध धर्मगुरूंच्या छोट्या छोट्या मूर्तीही शोकेसमध्ये दिसू लागल्या कॅथलिक चर्चने काही प्रशस्तिपत्रक त्याच्या घराण्याला दिली होती तीही फ्रेम करून भिंतीला लटकावलेली होती ॲम्ब्रोजला मी आत्तापर्यंत चिनी वशाचा व पूर्वेकडील देशांमधील म्हणून बुद्ध समजत होतो या पूर्वेकडील देशात कॅथलिक ख्रिस्त्यामध्ये मूर्तिपूजा कशी अस्तित्वात आली, ते समजत नाही याला कारण तामीळ संस्कृतीचा व पर्यायान वैदिक संस्कृतीचा प्रभाव असावा. कारण इ स पूर्वीपासून या पूर्वेकडील देशात तामिळी लोकाच बरंच जाणं-येण आहे. बरीच वर्षं चोल राजे या ठिकाणी राज्य

करीत होते. त्यांच्यानंतर इथं मुसलमान, पोर्तुगीज, इग्रज व डच हे लोक आले प्राचीन काळी लकाशुक व शैलेंद्रसारखे राजे इथ राज्य करून गेले

रात्री जेवण झाली प्रॉन्स, चिकन, सूप हे पदार्थ होते प्रॉन्स, फिश, चिकन असे पदार्थ मला पुढील पधरा दिवसात रोजच सकाळ - सध्याकाळ खावे लागले जेवण झाल्यावर काही फळं ॲम्ब्रोज घेऊन आला व सक्तीनं खायला लावलं हे चिनी लोक दिवसभर काही ना काही तरी चरत असतात. त्याच्यापर्यंत अजून तरी भारतीय आहारतज्ज्ञाची पुस्तक व मासिक पोहोचली नाहीत दोन दोन तासांनी ही मंडळी थोडं थोड खात असतात रात्री टी.व्ही वर एक सिनेमा बघून झोपून गेलो मलेशियाची हवा उष्ण व दमट आणि जगलही खूप आहे त्यामुळे डास काही प्रमाणात आहेत मात्र डोंबिवली, ठाण्यासारखे अदमानी नाहीत. सर्वत्र भरपूर स्वच्छता व बंद गटार आहेत

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच उठलो. चहा, न्याहारी झाली न्याहारीलाही सामिष पदार्थ बघून मी [illegible] झालो माझी समजत की चिन्यांची फक्त जेवणातच सामिषता असते आपण न्याहारीला सांजा, शिरा, पोहे, फोडणी भात, वडे व फार तर ब्रेड, बटर व एखादं अंड घेतो पण हे सर्व आपले पदार्थ विनाकारण त्या सामिष पदार्थांसमोर केविलवाणे भासायला लागले. चिन्याना चहाची चाह फारच आहे मोठा मगा भरून चहा भरायचा उकळलेल्या पाण्याचा एक थर्मास कायम तयार असतो त्यात चहाची पूड टाकली की लगेच चहा तयार होतो बरं इथ साखर, दूध याची जरुरी नाही उकाळा प्यायचा दूध हा पदार्थ इथल्या लोकांनी पाहिला आहे की नाही याची शका येते इथल्या चहाची चव सौम्य असते. आपल्याकडील अस्सल चहाबाजांची तिथल्या चहाशी सोयरीक जमणे अत्यत कठीण आहे आघोळ करून भिवडीला सौ.ला पत्र लिहिले व नंतर पिनाग शहर बघायला बाहेर पडलो

**पिनांग मोहिनी** – प्रथम पिनागची प्रसिद्ध बोटॅनिकल गार्डन पाहावयास गेलो जास्तीत जास्त शहर पाहून व्हावे, म्हणून ॲम्ब्रोजन गाडी जरा लाबच्या रस्त्यान नेली गार्डन आल्यावर गाडी तिथ उभी केली पार्किंग कूपन घेतल इथ वाटेल तिथं गाडी उभी करता येत नाही ठरवून दिलेल्या जागीच पार्क करावी लागते व त्यासाठी १० ते २० सेन्स मोजावे लागतात. समजा, तुम्ही तिथ नसाल किंवा कूपनवाला मनुष्य नसेल तर नतर तो कूपनवाला ते कूपन तुमच्या गाडीच्या काचेवर चिकटवून जातो

ऊन मात्र खूपच चटका देणारं होत सूर्य भगवान खरोखरच हातात चाबूक घेऊन बसले आहेत की काय अस वाटायच.

ही गार्डन पाहायला बरेच परदेशी पर्यटक आले होते काही शाळाच्या सहलीही आल्या होत्या. सुंदर, प्रशस्त, हिरवळीची लॉन्स, लहान लहान झरे व त्यावरील इवलेसे नाजुक साकव, उच डेरेदार वृक्ष मनाला वेगळीच टवटवी आणीत होते दाट व शात झाडींमध्ये, तेवढाच शात व सात्विक भासणारा सुदर कमळानी बहरलेला तलाव वातावरण अधिक रम्य करीत होता. उच, डेरेदार वृक्षांबरोबर तिथ बरेच विविध असे प्रादेशिक वृक्ष व वनस्पती आहेत काही वैशिष्ट्यपूर्ण पक्षीही बागेला शोभा आणीत होते प्रसिद्ध अशा पिनाग ब्रिजचीही प्रतिकृती एका लहानशा झऱ्यावर उभी केली आहे सर्वत्रच प्रसन्नता व उत्साह ओसंडून वाहत होता आइस्क्रीमवाले, भेळवाले, भजी व शेंगा विकणारे या वाल्याचा तिथ पत्ताच नव्हता भारतात कुठही हिंडताना फेरीवाले व भिकारी याची फार भीती वाटते. इथ तर सर्व भयापासून मुक्त होतो. या गार्डनमध्ये माकडे खूप आहेत या माकडाबरोबर फोटो काढायला मुलामुलींची अहमहमिका लागते १४ / १५ वर्षांची मुलं -मुली सहजपणे कॅमेरे वापरीत होती या बोटॅनिकल गार्डनमध्ये काही फोटो घेऊन आम्ही पिनांगचे टेकडीवरील प्रसिद्ध बुद्धमंदिर पाहावयास गेलो मदिराचे नाव आहे केक लोकसी टेम्पल इथही पर्यटकाची बरीच गर्दी होती गाडी पार्क करायला फार प्रयास पडले.

मदिरात वरपर्यंत जायला सुमारे एखाद कि मी चालतच जाव लागल या रस्त्यात दुतर्फा अनेक प्रकारच्या मालानी भरलेली असख्य दुकानं आहेत. विक्रेते बव्हशी चिनी आहेत त्यातही ७०% स्त्रियाच होत्या. चिनी मातीची भाडी व लाकडी खेळणी, अनेक प्रकारच्या बाहुल्या, शो पीसेस, बाटीक चादरी, कल्चर्ड दागिने, कॅमेरासाहित्य, मणी, माळा, हॅट्स, बाबूपासून बनविलेल्या पिशव्या, अनेकरगी कापड, टी -शर्टस व विजारी असा हर - प्रकारचा माल ठेवला होता चिनी बायका व मुली या उत्तम सेल्समनी म्हणून ओळखल्या जातात विक्रेत्याच बोलण लाघवी व हसतमुख असायच मात्र किंमती अव्वाच्या सव्वा सागतात बरीच घासाघीस करावी लागते ॲम्ब्रोजन माझ्या मुलींसाठी 'थाय' पद्धतीच्या दोन बाहुल्या घेतल्या त्यांची किंमत हो -ना करता करता शेवटी १८ मलेशियन डॉलर पडली. टी -शर्टस एकूण तीन खरेदी केले त्याची किंमत सुरुवातीला २५ मलेशियन डॉलर सांगितली. व शेवटी ते ११ म डॉ.ला दिले अर्थात त्याचे

श्रेय ॲम्ब्रोजला आहे. मी आपला भारतीय नवऱ्याप्रमाणे गप्प उभा होतो बायका जशा दुकानदाराशी वाद घालताना आपल कौशल्य पणास लावतात, त्याप्रमाणे किंवा जरा वरचढच वाद घालण्याचं कौशल्य ॲम्ब्रोजन दाखविल. ही दुकान माग सरली की देवळाकडे जाणारी नागमोडी वाट लागते काही ठिकाणी पायऱ्या आहेत; तर काही भाग सपाट आहे फक्त पिनांगमध्येच काही भिकारी दिसले तेही या बुद्ध मदिरामुळे स्वयभू उत्पन्न झाले असावेत मदिराच्या आसपास भिकारी व भडभुजे पुजारी नसतील तर ते मदिर कुठल हो !

आबालवृद्धापर्यंत पुष्कळ लोक हे मदिर पाहण्यासाठी येत होते बरेच फ्रेंच व जर्मन लोकही होते या परदेशी पर्यटकाच्या बऱ्याच वातानुकूलित बसेस खाली उभ्या होत्या परदेशी म्हाताऱ्याच खरोखरच कौतुक करावस वाटत शेतात धान्य जस आनदान डोलत तस हे लोक अमाप उत्साहाने हिंडत असतात बहुतेकांचे चेहरे हसतमुख, पोशाख सुटसुटीत व उत्तम शिवणीचा आणि कपड्याच्या रगाची निवड तर त्याच्या गोऱ्या कातडीला व शरीराला शोभेल अशी होती आबे, लिब जशी आपण मुरवून ठेवतो, तशी स्वच्छता व टापटीप त्याच्या नसानसातून मुरलेली दिसते जशी हरदासी कीर्तनाला पगडी हवी, तशी याच्या गळ्यात कॅमेराची पिशवी लटकवलेली हवी काही लोक तर चक्क व्ही डी ओ शूटिंगचेच कॅमेरे घेऊन येतात

देवळाकड जाताना स्वच्छता अपार असून साफसफाईच काम सतत चालूच असत देवळाच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर चिनी पद्धतीचे ड्रॅगन्स, मोठे खाब व त्यावरील नक्षीकाम व रगकाम पाहण्यास मिळत तसच बुद्धमूर्ती तर शेकडोंनी दुतर्फा ठेवलेल्या आहेत. आणखी आतमध्ये गेल्यावर काही नगारे ठेवलेले आहेत आपल्याकडेही काही जुन्या देवळातून नगारे ठेवलेले आढळतात बुद्धप्रतिमा व त्याची भावमुद्रा याचे अनेक प्रकार इथ आहेत एके ठिकाणी बुद्धचरित्र, बौद्धधर्मावरील साहित्य, बुद्धप्रतिमा व मूर्ती याची विक्री करणार एक दुकान होतं काही चिनी लोक बुद्धमूर्तीसमोर उदबत्त्या ओवाळताना दिसले बरेचसे चिनी पर्यटक म्हणून आले होते. मला मात्र हे चिनी लोक कमी श्रध्दाळू वाटले केवळ एक उपचार म्हणून तो धर्म ते पाळत असावेत, असे बाह्यात्कारी वाटते कारण पाश्चात्य सुधारणाचे वारं येथे फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे धर्म व सामाजिक जीवन यात ते फारकत करताना दिसले तिथून आणखी वर गेल की बुद्धाची मुख्य मूर्ती दिसते ही मूर्ती महाकाय व गभीर होती. येथील सजावट तर फारच

मनमोहक होती. गणपतीत आपण आरास करतो त्याची आठवण झाली गोल -गोल जिन्यांवरून बरच वर जाव लागत तेथील हजारो टाइल्सवर बुद्धचित्र रगविलेल आहे देवळाच्या अत्युच्च शिखरावरून पिनागचा भव्य पसारा दिसत होता खाली पाहिल तर देवळाचं सुरेख चिनी वास्तुशिल्प मोठ खुलून दिसत चिनी पद्धतीची छपराची रचना लक्ष वेधून घेत होती एकावर एक पण निमुळते होत गेलेले, असे अनेक छपराचे स्तर सुरेख नक्षीकाम केलेले आढळत होते या देवळाच्या बाजूला एका टेकडीवर ८० फूट उचीचा पाढऱ्याशुभ्र रगाचा शातिदेवतेचा पुतळा आहे

दुकान व पर्यटकाच्या गर्दीतून वाट काढत खाली आलो तहान खूप लागली होती या देशात पिण्याच्या पाण्याची पचाईत होती मदिर असूनही पिण्याचे पाणी कुठेही दिसले नाही. हा अनुभव पुढे बऱ्याच ठिकाणी आला. हे लोक आपल्याकडून ही गोष्ट कशी शिकले नाहीत याच आश्चर्य वाटल प्रथम उसाचा रस घेतला नतर काही किरकोळ खरेदी करून घरी जेवायला परत आलो दुपारचे दोन वाजले होते गाडी विलक्षण तापली होती विदर्भात सिमेंटच्या घरात जशा भर दुपारी उष्णतेच्या झळा मारतात, तस होत होत जेवण झाल्यावर कूलर लावून छान झोप काढली

सायकाळी प्रसिद्ध पिनाग हिलकड निघालो पिनागला जाऊन, पिनांग हिल न पाहणे म्हणजे पुण्याला जाऊन पर्वती न पाहण्यासारख आहे अर्थात पर्वतीपेक्षा पिनाग हिल उच व विस्तीर्ण आहे परतु पूर्वी पर्वतीवरून पुण्याच जसं विलोभनीय दर्शन व्हायचं, तस पिनाग हिलवरून पिनाग शहराच होतं

या हिलची उंची समुद्रसपाटीपासून २४०० फूट आहे पिनाग शहरातून या हिलकडे जायला मोटारने सुमारे १५ ते २० मिनिटे लागतात. वर जाण्यासाठी एक छोटी रेलगाडी आहे ही गाडी मजेशीर, सुबक व लाल - पाढऱ्या रंगाची आहे हिलच्या पायथ्याशी असलेल्या स्थानकावरून तिकिटे घ्यावी लागतात तीन मलेशियन डॉलर इतके तिकीट आहे स्थानक टुमदार व स्वच्छ आहे तिकीट घेऊन रागेत उभे राहिलो. येथे बरेच मले, चिनी व युरोपियन लोक उभे होते. 'मले' स्त्रिया खास पारपरिक पेहरावात होत्या. दर अर्ध्या तासान ही छोटी रेल सुटते. काही वेळान आम्ही या रेल डब्यात स्थानापन्न झालो समोरासमोर चार -पाच जण बसू शकतील व चार पाच उभे राहू शकतील एवढाच डबा होता माथेरान रेल्वेपेक्षा ही गाडी लहान होती, परतु छोटेछोटे डबे ४/५ तरी होते. इजिनही

लहानस होत काही लोक उभ्यानच प्रवास करीत होते. साजेची वेळ होती सूर्यभगवान अस्ताला चालले होते गाडी हळूहळू वरती मार्ग आक्रमू लागली रेलमार्गाच्या दुतर्फा दाट झाडी आहे. ही टेकडी म्हणजे निसर्गप्रेमींना एक मेजवानी आहे व पक्ष्याच आश्रयस्थान आहे असंख्य प्रकारची झाडी, झुडपे व वनस्पती आणि पक्षी आहेत. बरेच लोक पायीही या टेकडीवर चढून जातात छोटी छोटी स्टेशन लागतात मधल्या एका स्टेशनवर पहिली गाडी सोडून, दुसरी गाडी घ्यावी लागते ही दुसरी गाडी तेव्हा स्टेशनात उभी असते जाताना व येताना दोन्ही वेळा हे सव्यापसव्य कराव लागतं या वेळी खिडकीजवळील जागा पकडण्यासाठी धादल उडते. आणखी पुढे गेल्यावर वरून येणारी गाडी क्रॉस होऊन जाते वरून येणारी, वृक्षवेलींच्या मधून अवतीर्ण होणारी ती रगीत गाडी भान हरपून टाकते इथं बऱ्याच जणानी कॅमेऱ्याच्या कळा दाबल्या दोन्ही गाड्या जेव्हा एकमेकींना क्रॉस होतात, त्या वेळच दृश्य फारच मनोवेधक आहे तो प्रसग मी अजून विसरू शकत नाही खडाळ्याला जाताना जसे डोंगराच्या कुशीत छानसे बगले दिसतात तसेच काही या टेकडीवर जाताना दिसतात मात्र खडाळ्याप्रमाण सिमेंटच जगल अजून झाल नाही झाडींच्या मधून एखादाच बगला आलेल्या पर्यटकाच जणू काय स्वागत करण्यासाठी हळूच डोकावतो सुमारे अर्ध्या तासानं वर पोहोचलो परत येणाऱ्या प्रवाशाची बरीच गर्दी होती लहान मुलाची एक सहल तिथ आली होती

हिलवर हिंडायला सुरुवात केली एका पॉईंटवरून पिनाग शहर फारच रमणीय दिसत होतं निळा समुद्र, हिरवागार परिसर व उत्तुग इमारती, सायकाळच्या त्या धूसर वातावरणात मन मोहून टाकीत होत्या एका परदेशी मडमेला विनती करून आमचा दोघांचा फोटो आम्ही काढून घेतला टेकडीवरही छोटे छोटे व छान रस्ते होते मुलासाठी आकर्षण म्हणून एक मध्यम आकाराची तोफही मध्यभागी ठेवण्यात आली आहे

गार वारा सुटला होता जरा वेळान आम्ही तिथल्या 'एव्हिअरी गार्डनमध्ये' गेलो यासाठी १ मलेशियन डॉलर इतके शुल्क आहे. 'एव्हिअरी गार्डन' हेही या हिलवरील एक मुख्य आकर्षण आहे नाना रंगाचे व नाना ढगाचे पक्षी या बागेत आहेत तसेच अनेक प्रकारच्या वनस्पती व झाडं आहेत काही दुर्मिळ ऑर्किडस्ही आहेत काही प्लाट्स टायगर, स्लिपर, ऑर्किडस् ज्युवेल ऑर्कीडस्,

मंकी कप, पीचर प्लाट, रेड न्यू गिनी कीपर वगैरे जातींचे आहेत.

तितर पक्ष्याचे काही निवडक प्रकार, पीफाउल्स व इतर प्रादेशिक पक्षी, तुरेवाली कबुतर, रगीत पोपट, हॉर्नबिल्स, मकाऊ तसेच काही लॅटिन अमेरिकी पक्षी लक्ष वेधून घेत होते. हिल मैना या पक्ष्यान फार लक्ष वेधून घेतल कोणीही मनुष्य त्याच्या पिंजऱ्यापाशी आला की तो पक्षी 'हॅलोऽ ऽ ! हाऊ आर यू ?' असे म्हणायचा मी तर प्रथम चक्रावूनच गेलो व इकडेतिकडे बघायला लागलो नंतर ते लक्षात आले.

पक्षी बघून 'बेल व्ह्यू' या टेकडीवरील अलिशान हॉटेलात चहा प्यायला गेलो. हॉटेलच्या पुढील मोकळ्या जागेत काही उच वृक्ष होते बाहेरील दिवाणखाना प्रशस्त व उत्तम सजावटीचा आणि भारी फर्निचरयुक्त होता. दिव्याचा मद प्रकाश टाकलेला होता. या हॉटेलमध्ये कलात्मक वस्तूंचा आणि सुदर पेंटिंग्जचा बराच मोठा सग्रह आहे तो पाहण्यासारखा आहे. दिवाणखान्यातून आतील कॉरिडॉरमध्ये आलो इथ समोरासमोर अशा राहण्यासाठी व सर्व सुखसोयीयुक्त खोल्या आहेत ते पार करून गेलो की एक गॅलरी लागते तेथून थोड उतरून आणखी पुढे गेलो की छानसं हिरवगार लॉन तयार केल आहे. तिथ आपण येतो पलीकडे मोठी दरी आहे. गॅलरीत व लॉनवर चहा व खाण्यापिण्यासाठी पाढऱ्या शुभ्र रगाच्या गोल टेबल्-खुर्च्या माडून ठेवल्या होत्या गॅलरीतील एका टेबलासमोर आम्ही बसलो. बाजूलाच एक दुर्बीण देखावा पाहण्यासाठी बसविली होती, पण ती नादुरुस्त होती. ट्रे टी मागविला. त्यात चहा भरपूर मिळतो चहा बरोबर दूधपावडरच्या पुड्या व साखरेच्या क्यूब्ज मिळाल्या. चहाचे घोट घेता घेता आजूबाजूचा विहंगम परिसर हरखून निरखीत होतो हळूहळू अधारून येत होत. वारा मस्त सुटला होता. पिनांग बदरातील शेकडो होड्या, मचवे, बोटी यावरील दिवे लागलेले दिसत होते पिनाग ब्रिजवरील दिव्याची मालिका तर फारच विलोभनीय दिसत होती. अमावास्येला जस आभाळ चादण्यानी भरून जात, तसा समुद्रही चांदण्यानी भरून गेला आहे अस वाटावं वाऱ्यासगती बागेतील हिरवगार गवत डुलत होत या वेळी स्व बालकवींच्या कविताची आठवण आल्याशिवाय रहात नाही अस जादूमय वातावरण होत.

याच वेळी ॲम्ब्रोज अतर्मुख होऊन, गंभीरपणे बोलत होता मलेशियातील एकदर राजकीय व सामाजिक परिस्थिती सबधाने बरंच काही सागत होता मलेशियात 'मले' म्हणजे मुसलमान धर्मीयच ओळखले जातात. इतर हिंदू, ख्रिश्चन व बौद्ध

याना 'मले' समजण्यात येत नाही या 'मले' लोकाच्याबरोबरीने हक्क या बिगर मले लोकाना नाहीत सवलती व अधिकार नाहीत, याची खत त्याला डाचत होती 'बिगर मले' लोकाना सापत्नपणाची वागणूक दिली जात, अस त्याच म्हणण होत शिक्षण, नोकरी, उद्योगधदा यामध्ये 'मले' लोकाना प्राधान्य अगोदर दिल जात. या लोकाचा धर्मवेडेपणा अधिक बळावत चालला आहे की काय, अशीही भीती त्याने व्यक्त केली

अधारून येत होत, म्हणून आम्ही उठलो त्या छोट्या रेलच्या रागेत उभे राहिलो पहिली गाडी मिळाली नाही दुसऱ्या गाडीत नबर लागला. माणस मोजून, मगच आत सोडतात जरा वेळान खाली आलो व मग कारन घरी जाऊन, जेवण केल जेवण झाल्यावर ॲम्ब्रोज म्हणाला की, आता आपण पिनागचा रात्रीचा प्रसिद्ध असा स्ट्रीट मार्केट पाहायला जाऊ '' मलेशियात ठराविक जागी, वेळी व दिवशी रस्त्यांवर असे बाजार भरतात विक्रेते प्रामुख्याने चिनी असतात व गर्दीही खूप असते हा बाजार ॲम्ब्रोजच्या घराजवळ असल्याने, पायीच गेलो. बाजार नुसता जक्शन भरला होता. गर्दी एवढी की वाहन ठेवायला जागा नाही, पण गर्दी असूनही कोलाहल नाही तसा चिनी लोकाना खरेदीत उत्साह फार, पण तो त्याच्या डोळ्याच्या फटीत कधी लपून बसतो ते समजत नाही. चिनी लोक चेहऱ्यावरून गभीर व गूढ का भासतात, याचा समाजशास्त्रीय अभ्यास करायला हवा. या चिन्याना आपल्याकडील जेवढी म्हणून फुले व शाहू मार्केट आहेत, ती दाखवायला हवीत

खरेदीला बरेच चिनी, मले हे लोक आले होते विदेशी पर्यटक खूपच कमी दिसले असख्य प्रकारचे ठेले तेथे होते टी शर्टस्, जीन्स, होजियरी, काचसामान, शोभेच्या वस्तू, पेंटिंग्ज्, गृहोपयोगी वस्तू, कापडचोपड अशा अनेक वस्तू रस्त्यावर घेऊन, हे विक्रेते बसले होते सायकल - रिक्षासारख्या वाहनातून हा माल आणला जातो व खाली प्लॅस्टिक पसरून किंवा खाट टाकून तो विकला जातो बाजार बहुताशी स्त्रियाच कौशल्याने साभाळीत होत्या पुरुषलोक अफीमबाज आहेत, अस नतर कळल.

बाजारातून उगाचच वस्तू पाहत व भाव विचारीत भटकत होतो काही किरकोळ खरेदी केली चेसनटस्सारखा एक खास चिनी पदार्थ विकत घेतला हा पदार्थ शिगाड्याहून थोडा लहान, पण जाडसर अशा टरफलाचा असतो हा पदार्थ खास चीनहून येतो, अस ॲम्ब्रोज म्हणाला खायला मात्र फारच स्वादिष्ट होत

घरी यायला रात्रीचे अकरा वाजले होते. आल्यावर थोडी फळ खाल्ली अन् थोडासा टी व्ही. वरील कार्यक्रम पाहून झोपलो. मलेशियात टी.व्ही चे तीन चॅनेल्स आहेत. हाणामारीचे इग्रजी चित्रपट बरेच दाखविले जातात. त्यात रस नसल्यान मी ते पाहत नव्हतो. पाश्चात्य व पॉप सगीतही बऱ्याच वेळा ऐकवलं व दाखवल जायच, पण त्यात समाधान वाटत नव्हत पॉप सगीत हा प्रकार अजिबात आवडत नाही, तसेच टी व्ही वर ते म्हणणारे पुरुष व स्त्रिया फारच ओंगळ व किळसवाण्या वाटायच्या त्याचे हावभाव, विचित्र हालचाली, केसांचा अस्ताव्यस्तपणा, भडक किंवा अगदी कमी कपडे आणि एकदम हिवर भरल्याप्रमाण किंचाळणं आणि अगात आल्यासारखं उड्या मारण, इत्यादी गोष्टी माझ्या भारतीय मनाला पटत नव्हत्या ज्या कानानी १९४५ ते १९६५ पर्यंतच सुरेल हिंदी व मराठी सिनेसगीत ऐकल आहे; त्याना पॉप सगीत भिकार न वाटल तरच नवल !

मलेशिया हे मुस्लिम राष्ट्र असल्यानं, दूरदर्शनवर मुसलमान धर्माचा बराच प्रचार होतो तिथले मत्री, अधिकारी, सामान्य माणस याची जणू काय धर्मप्रेम व्यक्त करण्याची अहमहमिका लागायची. वर्तमानपत्रांचा पण तोच प्रकार होता मी केवळ १५ / १६ दिवसासाठी तिथ गेलेला व माझी ही कंटाळवाणी अवस्था झाली, तिथ इतराची काय कथा ! आपल्या देशात कुठल्याच धर्माचा प्रचार सरकारी प्रचारमाध्यमाद्वारे केला जात नाही, ही गोष्ट खरोखरीच स्तुत्य आहे. मनुष्यस्वभाव जगात सर्वत्र थोड्याफार फरकाने सारखाच असतो भारतातील मुसलमानाना बहुसख्य हिंदूची भीती वाटते व मुसलमान अल्पसख्य असल्यान, त्याची नैसर्गिकपण एकी जास्त होते; याची हिंदूना चिता वाटते, तसंच मलेशियातील ख्रिश्चन, हिंदू, बुद्ध याना मुस्लिम वर्चस्वाची भीती वाटते. मले मुसलमानाना चिनी बहुसंख्याकाची भीती वाटते. म्हणून तर सिंगापूर हे वेगळे राष्ट्र करण्यात आले, कारण सिंगापूरमध्ये ८० % चिनी लोक राहतात. तिकड थायलडमध्ये अहिंसेचे पुजारी म्हणविणाऱ्या बुध्दाची दहशत तेथील ख्रिश्चनाना वाटते अल्पसख्याकाना बहुसख्याकाची दहशत बसणे, हा समाजशास्त्रीय व राज्यशास्त्रीय नियम, मला वाटत बहुतेक देशात असावा

शनि १८ नोव्हेंबर. रोजी सकाळी १० वा. एका कॅथलिक चर्चमध्ये ॲम्ब्रोजच्या मित्राचे लग्न होते. तिथं गेलो आयुष्यात पहिल्यादाच ख्रिस्त्याचे लग्न पाहत होतो चर्च घरापासून जवळ होत ॲम्ब्रोजची आई व तिची एक मैत्रीण येणार असल्यानं सर्वच जण पायी निघालो. चर्चची इमारत मजबूत व पाढऱ्या रगाची होती. मोठा

क्रूस, उच मनोरे, मोठ्या घटा या गोष्टी लक्ष वेधून घेत होत्या चर्चचं पुढील व मागील पटागण खूपच मोठ आहे स्वच्छता तर कमालीची आहे या लोकानी जीवनात स्वच्छता कशी अमलात आणली, हे एक खरोखरच कोडं आहे. इ स च्या पूर्वीपासूनच आपण लोक ईश्वर, ब्रह्म, माया, सत्य यांचा नुसता काथ्याकूट करीत बसलो आहोत, परतु देव कोणाला दिसला नाही तशीच स्वच्छताही सापडली नाही. याच उत्तर आपल्याला आपल्याच समाजशास्त्रात शोधावे लागेल चर्चला कमानीवजा असे तिन्हीकडून बरेच दरवाजे आहेत आत गेल्यावर चर्चची भव्यता अधिक जाणवू लागली उचीही खूप होती. खिडक्या, झरोके, दरवाजे वैशिष्ट्यपूर्ण होते सुंदर झुबर लटकत होती. काही ख्रिस्ती सताचे पुतळे होते सुमारे ६०/७० माणस आत शाततेन बसली होती विवाहविधी चालला होता लग्न लावणारा मुख्य फादर काहीतरी प्रार्थना म्हणत होता मध्येच आपल्याप्रमाणे हात जोडून, बायबलमधील उतारे म्हणत होता नतर मुलीकडील एक मनुष्य व नवरदेवाची मैत्रीण यानीही काही गेय प्रार्थना म्हटल्या; पण त्या प्रार्थनेला एक प्रकारची चाल होती व त्याला सुरेल व गोड आवाजाच्या ऑर्गनची साथ होती हा प्रकार पहिल्यांदा पाहून व ऐकून, खूपच आवडला. मध्येच त्या फादरने वाइनचा एक घोट घेतला व ब्रेडचा एक तुकडा खाल्ला, व पुन्हा हात जोडून प्रार्थना म्हणू लागला सुमारे अर्धा तास हा कार्यक्रम चालला होता नतर वधुवराच परस्परांना पुष्पगुच्छ देणं, गालांच हळूवार चुबन घेण, मोठ्याचे आशीर्वाद घेण इत्यादी कार्यक्रम झाले सर्व जण उठून प्रार्थनेला उभे राहिले नतर लग्न लागल्याचं जाहीर केल गेल. लोकाच्या सयमित टाळ्या पडल्या नतर हळूहळू सर्वजण बाहेर जाऊ लागले. फार दिवसानी भेटत असल्यामुळ बरेच लोक एकमेकाशी हातात हात घालून बोलत होते, किंवा ओळखही करून घेत होते

तिथून एका 'फाईव्ह स्टार' हॉटेलात लग्नाचं जेवण घ्यायला गेलो

पहिल्यादाच पचताराकित हॉटेलात जेवणासाठी जात होतो ऊन खूप होत त्यामुळे सावलीची जागा बघून, गाडी तिथ ठेवली व पचताराकित हॉटेलात पाय ठेवला हॉटेलच्या पायऱ्याही प्रशस्त आहेत व हॉटेल जरा उचावर आहे हॉटेलच्या आतमधील मऊ गालिचे, मंद दिवे, सुवास यांमुळ मी जरा सुखावलोच होतो तसच पाहुण्याच्या स्वागताला एक सुंदर युरेशिअन मुलगी होती. ती लग्नघरापैकी कोणाचीतरी नातेवाईक होती ॲम्ब्रोजच्या ओळखीची होती त्यान माझी व तिची ओळख करून दिली. तिन गोड हसून, हस्तांदोलन केल, आणि मुंबईहून इथ

आलो आहे, हे सागितल्यावर तिन डोळे विस्फारले. तिथल्या लोकाना मुबई व काश्मीरचे फार आकर्षण आहे. ही मुलगी युरेशिअन असली तरी चेहरा बराचसा भारतीय वळणावर गेलेला आहे युरेशिअन ही सकर जात आहे, अस नतर समजलं

हॉटेलात एका गोल टेबलाभोवती ॲम्ब्रोज, मी, ॲम्ब्रोजचा भाऊ विल्फ्रेड, त्याची आई, तिची मैत्रीण, आणखी एक चिनी स्त्री व तिची मुलगी बसलो होतो हळूहळू सर्व निमंत्रित स्थानापन्न झाले ॲम्ब्रोजने बऱ्याच लोकाशी ओळख करून दिली. लोक आपसात विनोद करीत होते. बव्हशी लोक चायनीज ख्रिश्चन होते. आमच्या टेबलाच्या जवळच छताच्या सिमेंट तुळईवर घंटेच्या आकाराचे दोन रगीत कागदांचे पुडे करून ते उलटे बाधले होते अन् त्याच्या रिबिनी खाली सोडल्या होत्या. त्या पुड्यांमध्ये गुलाबाच्या पाकळ्या भरलेल्या होत्या वधू-वर आले व त्यांनी त्या रीबिनी हळुवार हातांनी ओढल्या त्याबरोबर त्याच्यावर गुलाब पाकळ्याची पखरण झाली सर्वांनी टाळ्या वाजविल्या वधू -वर आपल्या टेबलाशी जाऊन बसले टेबलावर पद्धतीप्रमाणे डिशेश व ग्लासेस मांडले गेले चिनी पद्धतीच भोजन होतं

सर्वप्रथम वराच्या मोठ्या भावान आमत्रितासाठी विनोदी व खुसखुशीत इग्रजीत आभारप्रदर्शनाचे छोटस भाषण केले हा वराचा भाऊ व वर स्वत. बाद्र्याच्या किंवा वसईच्या ख्रिश्चनापैकी वाटत होते वधू मात्र चायनीज होती नतर वधू -वर यानीही छोटसं भाषण केलं, अन् भोजनाचा बार उडाला प्रथेप्रमाण प्रथम वाइनचे अगदी छोटे ग्लास भरले गेले त्यापाठोपाठ कोऱ्या चहाचे ग्लास भरले गेले ख्रिश्चन -चिनी लग्नात जेवणाच्या अगोदर एक घोट वाईन घेण्याची पद्धत आहे नंतर चहाचा ग्लास रिकामा केला. तर पुन्हा तो वेटरने भरून दिला काही लोक चहाऐवजी बियर पीत होते माझा घसा बसल्याने मी थड बियर घेण्याचे टाळले. मात्र या ख्रिश्चन चिन्यांची जेवणाची पद्धत काही औरच निघाली प्रत्येक टेबलावर दोन-दोन मोठ्या डिशेश भरून पदार्थ येत साधारणत: पाच -सहा जण एका टेबलावर बसले होते हे पदार्थ काड्यानी किंवा काट्या -चमच्यान खायला लागतात एकूण ७ ते ८ वेळा वेगवेगळ्या प्रकारच्या डिशेश येतात उदा पहिले फ्रायफिश येणार, नंतर क्रमाने स्टीमड् फिश, प्रॉन्स, पोर्क, मटण, पुलाव, आइस्क्रीम, केक असे पदार्थ पाठोपाठ येतात.

परंतु, त्या कोऱ्या चहाने माझी मोठी धांदल उडवून दिली, कारण प्रत्येक पदार्थ येण्याअगोदर चहाचा ग्लास भरला जायचा अर्थात ही प्रथा मला माहिती

नव्हती. चिन्याच हे प्रतिष्ठेच पेय पंचतारांकित हॉटेलमध्ये आल्यावर टाकायच कस, असा प्रश्न पडला, व तसेच आपण लग्नाच्या जेवणाला आलो आहोत, असही भान ठेवाव लागे चहा टाकून देता येईना! त्यामुळे मी चहाचा प्रत्येक ग्लास संपवीत होतो, तर वेटर त्या रिकाम्या ग्लासमध्ये आणखी चहा ओतायला तत्पर असायचा ग्लास एकदम रिकामा ठेवायचा नाही, ही पद्धत मला माहीत नव्हती. त्यामुळे प्रत्येक डिशनंतर एकेक कोरा चहा करीत एकूण सात कोऱ्या चहाचे ग्लास रिचवले. इकडे ॲम्ब्रोज, मी एकावर एक अकरा या पद्धतीने चहा पीत आहे, हे बघत होता, परंतु त्याचा अशी समज झाला की ह्याचा घसा बसल्याने हा एवढा चहा पीत आहे मलाही अस वाटायला लागल की आपण चहा पिण्यात चिन्याच्याही वरताण करतोय हा प्रकार ॲम्ब्रोजला जेव्हा समजला तेव्हा तो पोट धरून हसायला लागला व म्हणाला की चहाचा ग्लास पूर्ण संपवायचा नसतो, तो थोडा शिल्लक ठेवायचा; म्हणजे पुन्हा पुन्हा वेटर चहा ओतणार नाही पुढील प्रवासात हा किस्सा तो त्याच्या नातेवाइकाना व मित्राना सर्वत्र सागत सुटला होता.

सर्वांची जेवण झाली सर्वांना शेवटी एक केक दिला गेला आणि लग्नसमारंभाच सूप वाजल गेल. वधू-वर निमंत्रिताना निरोप द्यायला दरवाज्याशी उभे होते. मीही त्यांचे अभीष्टचिंतन करून बाहेर पडलो बाहेर पडल्यावर लग्न लावणारे मुख्य फादर व सहाय्यक असे दोघे भेटले ॲम्ब्रोजन त्याची व माझी ओळख करून दिली आणि सांगितल की हा पहिल्यांदा कॅथलिक विवाह बघत आहे तेव्हा फादरला बरंच आश्चर्य वाटल मग तो म्हणाला, “कस काय? मुबईत कॅथलिक लोक भरपूर आहेत” तेव्हा ॲम्ब्रोजन त्याला सागितल की, “अरे बाबा! पिनागपेक्षा मुबई ४/५ पटीन मोठी असून, लोकसंख्या एक करोडच्या आसपास आहे ॲम्ब्रोजबरोबर मी असल्यान मीही खिस्ती असावा, अशी त्याची भाबडी समजूत झाली होती

हॉटेलातून बाहेर पडलो, कारन समुद्रकिनाऱ्यावरील एका प्रसिद्ध ब्रिटिश-कालीन पचतारांकित हॉटेलात गेलो अर्थात तेथील समुद्र व किनारा आणि ते हॉटेल पाहून घराकडे वळलो आणखी कुठे जाण्याची इच्छा नव्हती तशात मी सफारी सूट घातला होता; त्यामुळे त्या टळटळीत उन्हात अगाची नुसती लाहीलाही होत होती. हवामानाला शोभेसेच कपडे वापरणे किती नैसर्गिक आहे, हे मला तेव्हा पटले घरी येऊन नुसत्या लुगीवर कुलरसमोर बसलो व नतर ताणून

दिली

पण जरा वेळाने लगेच उठलो. दुपारचे चार वाजले होते आम्हांला अजून पिनागची प्रख्यात बटरफ्लाय गार्डन बघायची होती सायकाळी ५ वाजता बाहेर पडलो जमल तर समुद्रस्नानाचा विचार होता.

गाडी वेगान बटरफ्लाय गार्डनच्या दिशेन धावू लागली ६/७ कि मी.चे अतर होते गुळगुळीत व वळणदार रस्ता, वृक्षाची दाटी, त्या झाडींमध्ये लपलेली एखादी छानसी बंगली, तर एका बाजूला अर्धगोलाकर पसरलेला निळाशार समुद्र; एकदर वातावरणाची खुमारी वाढवीत होता पिनागचा सुदर बीच न्याहाळीत चाललो होतो या बीचवर अवतीभोवती सुमारे ५० ते ६० तीन किंवा पचतारांकित हॉटेल्स असावीत काही हॉटेल्स तर वास्तुरचनेच्या दृष्टीन केवळ लाजवाब ! युरोपियन, अमेरिकन व जपानी पर्यटक खूप दिसत होते

सायकाळी ५.३० चे सुमारास बटरफ्लाय गार्डनमध्ये पोहोचलो. बघतो तर ५ वाजताच फार्म बद झालं होत तेवढ्यात आणखी काही पर्यटक आले त्याची गैरसोय होऊ नये म्हणून व्यवस्थापनान आम्हांला चाळीस मिनिटात फार्म बघून या, अस सागितल तीन मलेशियन डालर्सच तिकीट घेतल. तिकिटाबरोबर फार्मचा छापील नकाशा आणि त्यासबधी असलेल्या संक्षिप्त माहितीच पत्रक दिल गेलं अर्धगोलाकार अशी या फार्मची रचना आहे

या फार्ममध्ये अनेक सुरवटाच्या व फुलपाखराच्या जाती आणि प्रकार आहेत त्याचे वेगवेगळे कक्ष पाडण्यात आले आहेत अ, ब, क, ड, इ अशी ती स्थानक आहेत रगीबेरगी फुलपाखरांचे खूप प्रकार पाहिले. सुरवटही भरपूर होते अगदी सूक्ष्म अशा अंड्यापासून ते फुलपाखरापर्यंत त्याचा प्रवास दाखविला आहे अड्यांची वैशिष्ट्यं, सुरवटाचे विशिष्ट खाद्य याची माहिती प्रत्यक्ष फार्म बघत असताना मिळत होती. सुरवट व फुलपाखरांना लागणार सर्व आवश्यक ते वातावरण निर्माण केल आहे. नाकतोड्याचेही काही प्रकार होते. या सर्व प्राण्याना लागणाऱ्या वनस्पतीही तयार केल्या आहेत. थड व सावलीचे बोगदे या फुलपाखराना नैसर्गिक वातावरण मिळावे, म्हणून बनविले आहेत. या छोट्या बोगद्यांसाठी ग्रॅनाईटचे खडक वापरले आहेत. या बोगद्यामध्ये हजारो फुलपाखर त्या खडकाला चिकटलेली होती व नुसतीच पंखाची उधडझाप करीत होती

स्टेशन 'इ' मध्ये विंचवाच्या बऱ्याच जाती दिसतात. पाठीचा कणा नसलेल्या प्राण्यावर त्याना जगवल जात हे विंचू रात्रिंचर असून; रात्रीच ते शिकार करतात

मादी वर्षातून एकदाच १८ ते २५ पिल्लं घालते

स्टेशन 'जी' मध्ये लहानशा तळ्यात छोटे छोटे कृत्रिम धबधबे सोडून त्या पाण्यात काही रंगीत बदक सोडली आहेत. ती पोहताना पाहण, म्हणजे एक मोठी मौज वाटते चायनीज वुड डक्स, लाल चोचीची व पाढरी बदकं आहेत जायट वॉटर लिलीही या पाण्यात बघायला मिळते एकदर दृश्य मोठ नयनमनोहर आहे.

स्टेशन 'एच्' मध्ये इतर काही कीटकांची अभ्यासपूर्ण माहिती मिळते या बटरफ्लाय फार्ममध्ये छोटी छोटी तळी व त्यावर रंगीत लाकडी साकव, दगडी छोटेसे बोगदे, धबधबे, लहानसे डोंगर व त्यावरील वनस्पती व त्या सर्वांवर रंगीबेरंगी फुलपाखरांची उधळण आणि पाढऱ्या बदकाची माळ पाहून, आपण स्वप्ननगरीत तर नाही ना, असा भास होतो या ठिकाणी आम्ही बरेच फोटो काढले वेळ नसल्यान जास्त वेळ बघता आल नाही मात्र या फार्ममध्ये वातावरण दमट असल्यान फारच उकाडा जाणवत होता फार्ममधून बाहेर पडताना, आपण एका विविध वस्तुभाडारात येतो, पण तिथे वस्तू फार महाग होत्या नुसतच ते वस्तुभाडार पाहून, बाहेर पडलो गाडीत बसल्यावर वाऱ्यामुळ बर वाटल.

समुद्रावर पोहायला जायचा बेत होता, पण काळोख होत चालल्यान पोहण रहित केल मात्र समुद्र किनाऱ्याजवळ एका ठिकाणी गाडी उभी केली व तेथील मऊ पुळणीवरून फेरफटका मारू लागलो. मद वारा, मद प्रकाश, शांत निरामय वातावरण व लाटाची लहानशी खळखळ यामुळे मन कुठेतरी अतर्मुख होत होते. नकळत 'आनंद' या हिंदी चित्रपटातील श्री मन्नाडे यानी गायलेल 'जिदगी कैसी है पहेली' हे मोठ गोड गीत गुणगुणू लागलो क्षितिज आणखी काही दूर अस वाटत होतं परतु ॲम्ब्रोज सारखा बोलत असल्यान मी भानावर येत होतो समुद्रकिनाऱ्यावरील निरनिराळ्या अलिशान पचताराकित हॉटेल्सची माहिती तो देत होता. पैसेवाल्याना आपल्याकडं आकर्षित करता येईल इतकी खबरदारी या हॉटेलवाल्यानी घेतली होती या हॉटेलाच्या समुद्रसफरीसाठी लॉंचेस होत्या फिरते झोपाळे, त्याच्या प्रशस्त व हिरव्यागार लॉनमध्ये ठेवले होते. मासेमारीचं साहित्य ठेवल होतं एकेक हॉटेल म्हणजे जणू काय हिऱ्याचा तुकडाच ! जरा वेळ भटकून पुन्हा मुख्य रस्त्यावर आलो तेथील काही बाटीक कपड्याची दुकान पाहिली व एक डिपार्टमेंटल स्टोअर बघून घरी परतलो आणि ती अविस्मरणीय सध्याकाळ सपली

दुसऱ्या दिवशी दुपारी थायलंडला जायच असून त्याचे वेध लागले होते. रात्री टी.व्ही.वर ऑस्ट्रेलियन दे - मार सिनेमा बघितला. या पाश्चात्य किंवा गोऱ्या लोकाच्या सिनेमाच एक वैशिष्ट्य असत व ते म्हणजे आपण जितक्या सहजतेने तबाखूची वा तपकिरीची डबी खिशातून काढतो, तितक्याच सहजपण हे लोक पिस्तूल काढून समोरच्या माणसावर गोळ्या उडवतात.

सकाळी जरा उशिराच उठलो पावसाची भुरुभुर चालू होती भिवंडीला सौ ला पत्र लिहिलं. थायलंडला जाण्यासाठी थोडं सामान बाधल पासपोर्ट, व्हिसा या गोष्टी घेतल्या फक्त एअर तिकीट घेतल नव्हत कारण थायलड तसं सुरक्षित नाही, व दारिद्र्यामुळे चोऱ्यामाऱ्या फार होतात. म्हणून विमान तिकीट घरीच बॅगमध्ये ठेवल पण त्यामुळे मोठी आफत ओढवली; त्याच वर्णन पुढे येईलच. अमेरिकन डॉलर्सही घरीच ठेवले मात्र ॲम्ब्रोजने भरपूर थाय चलन घेतलं होतं

दुपारी जेवण झाल्यावर ॲम्ब्रोजच्या भावानं त्याच्या गाडीन आम्हाला पिनाग जेटीवर सोडल. पिनागला तात्पुरतं टाटा करून, बटरवर्थ इथ फेरीन आलो. याच स्टेशनातून बँकॉकसाठी थाय रेल्वे सुटते, परतु गाडी सुमारे १॥ तास विलबानं येणार होती त्यामुळं तिथच रमतगमत वेळ काढला

जो कोणी मलेशियाला जाईल त्यान पिनाग शहर व पिनाग हिल आवर्जून पाहावी मी तर प्रथमदर्शनीच पिनागच्या प्रेमात पडलो इतका की प्रेयसीच्या प्रेमात देखील इतक्या लवकर पडता येणार नाही. जस आग्रा शहरी ताजमहाल पाहावा, औरगाबादला गेल्यावर अजठा - वेरुळची लेणी पाहावीत, बँकॉकला गेल्यावर सुवर्ण मंदिर पाहाव, तसंच मलेशियाला गेल्यावर पिनाग शहरही पाहणे अत्यावश्यक आहे दोन डोळेही अपुरे पडतात.

थायलंडला जाणारी गाडी सुमारे तीन वाजता बटरवर्थ स्टेशनात आली परदेशी प्रवाशाची बरीच गर्दी होती पिनागहून म्हणजे बटरवर्थ स्टेशनातून उत्तरेला बँकॉकपर्यंत, तर दक्षिणेला सिगापूरपर्यंत आरामात रेल्वेने जाता येत मात्र येथील रेल्वे मीटरगेज असल्याने व रेल्वेच फारस जाळ नसल्यामुळे स्टेशन आपल्या कल्याण, ठाणे, दादर, यापेक्षा बरीच लहानसर आहेत

बँकॉकला नेणारी गाडी सहा -सात डब्याची होती, परतु अगदी ऐषआरामी होती ही खास परदेशी लोकासाठी तैनात होती या गाडीला निळा रग होता, व तो जणू काय पूर्वीच्या डेक्कन क्वीनची आठवण करून देत होता गाडीतले सर्व प्रवासी उतरल्यावर रेल्वे कामगारांनी गाडी धुवून स्वच्छ केली व नतरच

के. प्र.
दा. क्र. ७६२
२८३५६
२४३१९

सर्वांना आत बसण्यास सांगितले ही अलिशान गाडी सुपरफास्ट म्हणून ओळखली जाते थाय सरकार जास्तीत जास्त परकीय चलन मिळवण्याच्या प्रयत्नात असत. ह्या गाडीची योजना त्यासाठीच केली आहे, अस समजल. ही गाडी परदेशी प्रवाशानी भरगच्च भरलेली असते परतु भाऊगर्दी नसते जेवढी आरक्षण आहेत, तेवढीच माणस आत असणार दुसरा कोणीही तुमच्या डब्यात बसून किंवा उभ राहून प्रवास करू शकत नाही तशी दक्षता घेतली जाते

गाडीत बसायला प्रशस्त फोम गादीच्या खुर्च्या, बाजूला मोठी काच, की जेणेकरून आपण बाहेरचा परिसर नीट बघू शकू. या खुर्च्या समोरासमोर होत्या बर्थही फोमचे होते खुर्चीवर अधिक आरामशीर बसता यावे म्हणून जाड तक्क्या ठेवलेला वरचा बर्थ कप्प्याप्रमाणे होता तो उघडला की त्यात मऊ गादी व चादर आणि ब्लँकेट ठेवलेल असायच रात्री झोपते वेळी ही सर्व तयारी करून द्यायला, रेल्वेचा खास मनुष्य असायचा तुम्हाला काहीच तकलीफ नाही. एवढ्या स्वच्छ, आरामशीर, सुखसोयीयुक्त अशा गाडीत बसल्यावर इद्रपद मिळाल्याचा भास झाला तिकीटही फार नाही परतीच तिकिटसुद्धा ४० मलेशियन डॉलर्स एवढच तिकीट होत एवढच नव्हे तर डब्यातले सडासही भारतीय पद्धतीचे होते ही फारच समाधानाची बाब होती भारतीय रेल्वेलाच काय अवदसा आठवते कुणास ठाऊक ? भारतात डब्यातील एक सडास पाश्चात्य पद्धतीचा असतो. म्हणजे आणखीनच कुचबणा होते स्वच्छतेच्या नावानही शख आहे पाश्चात्याच्या अधानुकरणाची सवय अशीच शतकानुशतक चालू राहणार. भारतातील एवढी प्रचंड व महाकाय रेल्वे व्यवस्था, व्यवस्थापनाच्या अभावी, भ्रष्टाचार आणि बेशिस्त, यामुळं अगदी श्यामभटाच्या तट्टाणीप्रमाण भासते अर्थात व्यवस्थापनाप्रमाणेच याला सामान्य लोकही जबाबदार आहेत रेल्वेचा अनुभव मलेशिया, थायलड, सिंगापूर येथे सर्वत्र चागला आला

दुपारी ३.३० वा रेलगाडी बँकॉकच्या दिशेने कूच करू लागली त्या आरामदायी खुर्चीवर मी आरामात बसलो आहे, असा फोटो घेतला या गाडीत बव्हशी युरोपीयन, जपानी व अमेरिकन होते क्वचित एखादा निग्रो दिसायचा गोंगाट, गोंधळ, पत्ते खेळणे हे प्रकार डब्यात अजिबात नव्हते या परदेशी माणसाची हलकेच कुजबूज ऐकू यायची. काही स्टेशनावर गाडी दोन मिनिटे थाबायची, परंतु फेरीवाले व भिकारी याना पूर्ण मज्जाव होता भारतीय रेल्वेनं प्रवाशाना सोयी व सरक्षण देण्याऐवजी, भिकारी व फेरीवाले यानाच दत्तक घेतल आहे

असं वाटतं कर्नाटकातील काही स्टेशनावर अक्षरश: रेल्वे डब्यामधून भिकाऱ्याची पलटणच्या पलटण घुसते

वस्तुत: आपल्याकडील उणिवाची दुसऱ्या देशातील गोष्टींबरोबर तुलना करू नये, असही वाटत परतु आपल्याकडे सामाजिक शिस्त व स्वच्छता याचा एवढा अभाव आहे, की त्या गोष्टी पोटतिडकीन लिहाव्याशा किंवा बोलाव्याशा वाटतात

सभोवताली हिरवीगार शेते आणि चुनखडीचे डोंगर गरगर फिरत होते. वारा भन्नाट होता सायकाळी सूर्य मावळताना गाडी मलेशिया -थायलड सरहद्दीवरील पेडागबसार या स्टेशनवर थाबली पासपोर्ट व व्हिसा इथ तपासला जातो त्यामुळे गाडी बराच वेळ थांबते सर्वांनाच खाली उतरून, त्या त्या देशसमूहाच्या बूथवर जावे लागते. इथ एक प्रकार चागला आहे की निरनिराळी बूथ्स आहेत आशियाई लोकांसाठी वेगळा, युरोपियनासाठी वेगळा, अमेरिकनासाठी वेगळा बूथ अशी योजना आहे त्यामुळे एकाच ठिकाणी गर्दी होत नाही व काम भराभर होत अर्थात माझ्या बूथवर गर्दी नव्हती थायलडमध्ये प्रवेश करीत असल्याची लगेच नोंद झाली मी नतर गाडीत माझ्या जागेवर बसलो. मात्र या स्टेशनावर तस्करी फार मोठ्या प्रमाणावर चालते अस कळल विशेषत: तादळाची होते थायलडचा तांदूळ फार जगप्रसिद्ध आहे व उत्तम प्रतीचा असतो हा तादूळ मलेशियात आणायला बंदी आहे त्यामुळ तस्करीला उत्तेजन मिळत तसच थायलडमध्येही मादक पदार्थांच पीक उदड आहे तिथूनही चोरटी आयात मलेशियात होते, असही समजल त्यामुळं मलेशियात या मादक पदार्थांवर कडक नियत्रणं आहेत. त्या गुन्ह्यासाठी मृत्युदडाची शिक्षा आहे या पेडागबसार स्टेशनवर बरेच घाणेरडे, गांजेकस, गरीब व उनाड लोक दिसले काही स्त्रियाही होत्या. या सर्वच लोकाची नजर भकास; पण शोधक वाटली यातील बरेच जण तांदळाच्या तस्करीत गुतलेले असत. आमच्याही डब्यात एक असाच लफंगा आला व त्याच्या हातातील प्लॅस्टिक पिशवी त्यान आमच्या सामानाशी ठेवली. मी त्याला हटकताच त्यान सदर पिशवी आणखी दुसरीकड ठेवली व निघून गेला सर्वांचे पासपोर्ट, व्हिसा तपासून झाल्यावर गाडी थायलडच्या हद्दीत मार्ग आक्रमू लागली, आणि गाडीत सशस्त्र रेल्वे पोलिसाची तैनात सुरू झाली. त्यांच्या हातात धातुशोधक व कमरेला पिस्तूल आणि खांद्यावर स्टेनगन होती आपल्या एखाद्या क्षत्रिय देवतेप्रमाणे ते भासले. त्याच गाडीत झडतीसत्र सुरू झाले. मी उगीच घाबरलो होतो. आमच्या डब्यात त्याना बऱ्याच प्लॅस्टिक पिशव्या मिळाल्या त्यामुळे गाडी पुन्हा त्या स्टेशनजवळ

थाबली अशा अनेक पिशव्या त्यानी जमा केल्या व रेल्वे रुळामध्ये फेकून दिल्या. काही भुरटे चोर दिसावेत अशा काही तरुणाना ताब्यात घेतल होत आमचंही सामान धातुशोधकानं तपासल नतर अस समजल की हा प्रकार नेहमीच चालतो व त्यात थाय रेल्वेचे कर्मचारी सामील असतात

शेवटी झडतीसत्र थाबलं व गाडी थायलडकडे सरकू लागली हा रेल्वेमार्ग भरपूर झाडींच्या जगलामधून जातो. गाडीत पोलीस बदोबस्त खूप होता कारण सर्वच परदेशी प्रवाशाची सुरक्षितता पाहायची होती व दुसर थायलडमध्येही गरिबी फार असल्यान गुन्हेगारीही बरीच आहे रेल्वेलुटीचेही प्रयत्न काही वेळा होतात. तसेच बडखोराचा उपद्रवही अधूनमधून होतो बटरवर्थ ते बँकॉक हा रेल्वेमार्ग १२०० कि मी. लाबीचा असून बराचसा मार्ग सागरपट्टीजवळून जातो.

रात्री आठ वाजता थायलंडमधील 'हत्ताय' हे मोठे जक्शन आलं काही मलेशियन खुशालचेंडू व परदेशी लोक इथ उतरले 'हत्ताय' हे मोठ शहरही आहे. रात्रीची मौजमजा करण्यासाठी बरेच मलेशियन ऐय्याषी हत्तायला येतात असे समजले थायलडमध्ये मद्याचा व मदनिकाचा महापूर आहे. थायलडमध्ये वेश्याव्यवसायाला म्हणे सर्वमान्यता आहे परदेशी पाहुण्याना याही मार्गाने आकर्षित करण्याचा प्रयोग थायलडमध्ये चालतो त्याचे विदारक स्वरूप बँकॉक, पट्टाया येथे जास्त पाहायला मिळाले ते वर्णन पुढे येईलच

हत्तायला गाडीला भोजनाचा डबा जोडला गेला काही वेळाने एक १७ / १८ वर्षांची चुणचुणीत व गोरीपान थाय मुलगी जेवणाची व चहा, कॉफीची ऑर्डर घेण्यासाठी आली तिला मोडकतोडक इग्रजी येत होतं हसून गोड गुड ईव्हिनिंग केले व मेन्यू कार्ड दिले. भूक नसल्यान चहाची ऑर्डर दिली व जेवण एक तासान आणायला सागितल पाच मिनिटानी तिने ट्रेमधून चहा व बिस्किट आणली पहिल्या चहाबरोबर चार बिस्किट मोफत होती. जेवणाची ऑर्डरही दिली बरोबर एक तासान तिन दोन थाळ्या भरून जेवण आणल प्रथम तिने दोन खुर्च्यांमधील लाकडी ट्रे पाडला व त्यावर थाळ्या ठेवल्या जेवण अर्थातच मांसाहारी होते. या थाय लोकानाही शाकाहार ही काय चीज आहे, हे माहीत नाही जेवण मात्र झकास होत प्रॉन्स तर लाजवाब होते त्याची चव अजून जिभेवर आहे. सोबत 'कोमयाम' नावाचं सूप व भात होता प्रॉन्स चागले तळलेले व मोठे होते पाणी देखील निर्जंतुक केलेल्या बाटल्यामधून दिल जेवण झाल्यावर ती थाळ्या व पैसे घेऊन गेली उरलेली काही नाणी तिला 'टिप' म्हणून दिल्यावर ती फार

खूश झाली थाय चलनाला 'बाट' म्हणतात. थायलंडमध्ये चलनवाढ फार असल्यानं त्यांच्या चलनाचं बरंच अवमूल्यन झाले आहे दहा बाटसना कॉफीचा पेला मिळतो

सर्वांची जेवण झाल्यावर एक रेल्वेसेवक डब्यात आला आणि सर्व बिछाने व्यवस्थित घालून दिले. वरच्या बर्थनादेखील छानसे निळसर पडदे होते

मी व अम्ब्रोज बराच वेळ गप्पा मारीत बसलो होतो राजकारण, सामाजिक स्थिती, जातिव्यवस्था, एकमेकांचे नातेवाईक, मानसशास्त्र, अमेरिका अशा अनेक विषयावर बोलत होतो. एवढच नव्हे तर शास्त्रीय दृष्टिकोन व बुद्धिप्रामाण्यावरही मी त्याच्याशी काही बोललो. त्याला ते कितपत रुचल ते माहीत नाही; कारण त्याचा चर्चशी जवळचा सबध असून तो स्वत ब्रदर होता त्यामुळे त्याला बुद्धिप्रामाण्यवाद समजत असूनही, तो कितपत त्या वादाला अनुकूल आहे, हे मी जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होतो, परंतु त्यानं बुद्धिप्रामाण्यावर आपली प्रतिक्रिया नतरही संपूर्ण दौऱ्यात कुठही व्यक्त केली नाही. धर्म माणसाच्या वैचारिकतेला कस जखडून ठेवतो; याच ते उत्तम उदाहरण मला वाटल अर्थात ॲम्ब्रोज बराच जगभर फिरला असल्यानं अनुभवी व सखोल विचाराचा होता दृष्टीही व्यापक होती अमेरिका – व्हिएतनाम युद्धानंतर जे व्हिएतनामी निर्वासित मलेशियात आले, त्याना इंग्रजी शिकविण्याचं कार्य त्यानं काही वर्षं विनावेतन निर्वासित छावण्यामध्ये केले होते. अर्थात चर्चेतर्फे केले.

मला झोप लवकर आली नाही खोकल्यान बेजार झालो होतो. या त्रासामुळ एखादा विदेशी पर्यटक अगावर धावून येतो की काय असे वाटले सकाळी जाग लवकर आली. न्याहरी व चहा घेतला. गाडी 'हुआहीन' स्थानकावर थांबली होती. थाय स्टेशनाच एक वैशिष्ट्य म्हणजे ती फारच टुमदार आहेत स्थानकावरील स्टेशनमास्तराच व इतर कार्यालयाच ऑफिस म्युनिसिपाल्टीच्या टपऱ्याप्रमाणे नसून, रगीत व पॅगोडाच्या आकाराचे होते. लहानशी आणि मध्यम आकाराची झाडे व वेली प्लॅटफॉर्मवर विशिष्ट जागेत रचना करून लावले होते मात्र स्टेशनवर मासाहारी पदार्थ उघड्यावर विकताना पाहून किळस आली काही ऑस्ट्रेलियन तरुण ते अगदी निर्विकारपणं भेळ खावी, तसे खात होते. वस्तुत. थायलंड हा अहिंसेच तत्त्वज्ञान सागणाऱ्या बौद्धधर्मीयाचा देश; पण त्या ठिकाणीच मासाहार फार होतो 'बुद्धत्व ही आमची जीवनपद्धती' असा अट्टाहास त्यानी बहुधा धरला नसावा स्टेशनाच्या सर्व पाट्या थाय लिपीत आहेत इग्रजी लहानसं कुठतरी कोपऱ्यात असत थाय लिपीतील काही अक्षर आपल्या मोडी लिपीप्रमाणे भासमान

झाली अगदी वळणदार अक्षर आहेत रेल्वेमार्गाच्या दुतर्फा भरपूर जगल व काही ठिकाणी हिरवीगार शेत दिसली. नारळ, आबा, पीच याची बरीच झाड दिसली सागही भरपूर प्रमाणात मिळतो येथे वर्षातून दोन -तीन वेळा भाताच पीक घेतात समुद्राजवळील खेडेगावातून प्रॉन्स तयार करण्याचा बराच मोठा उद्योग चालतो समाजातला बराच मोठा वर्ग शेती व मासेमारीत गुतलेला दिसतो गोल व लाबट, पसरट बाबूच्या टोप्या घालून. हे लोक शेतात किंवा रेल्वेमार्गावर व सडक बाधकामावर राबताना दिसले थाय लोकाचा पोरवडाही बराच दिसत होता उच्च लाकडी घरं असून बरेच लोक डुकरं पाळताना दिसले

सकाळी लच्छाबुरी हे स्टेशन आल. गाव मोठ दिसत असून, रेल्वे जवळच मोठ बुद्धमंदिर असल्यच दिसत होत रेल्वेमार्ग शहरातून जातो इथल्या बसेस जुन्या लॉऱ्याप्रमाणे भासत होत्या मोटारसायकलीही खूप दिसल्या



थायलंड चे थाय नृत्य

# थायलंड

थायलड हा आग्नेय आशियातील एक सार्वभौम देश आहे. प्राचीन काळी इथ भारतीयांनी बऱ्याच वसाहती केल्या होत्या या देशाचे पूर्वीचे नाव होते 'सयाम' कथील, तादूळ, साग, रबर, बाबू ही इथली प्रमुख उत्पन्न आहेत पाढऱ्या हत्तींसाठी हा देश प्रख्यात आहे पूर्वी थाय राजा चीनच्या सम्राटाला पाढरा हत्ती भेट देत असे

बँकॉकला 'ला सल्ले' विद्यालयात ॲम्ब्रोजचा पीटर बुचीत नावाचा थाय मित्र आहे. बँकॉकला पोहोचल्यावर प्रथम त्याला बोलवून घेतल व त्याला घेऊनच, आम्ही आधी पटायाला जायच ठरविल मध्यतरी गाडीच्या भोजनालयात जाऊन थोडस खाल्लं व चहा घेतला, कारण नतर जेवणाला एखादे वेळेस वेळ नसता मिळाला बँकॉक जवळ येत चालल होतं थायलडची वेळ मलेशियाच्या वेळेपेक्षा एक तास मागे आहे. बँकॉक स्टेशनच्या अलीकडे नदीवर एक मोठा पूल दिसतो नदीतूनही बरीच वाहतूक पडाव व होड्यांमधून होताना दिसत होती पाणी मात्र अगदी खराब वाटले मुबईप्रमाणच रेल्वेमार्गाच्या बाजूला बरीच मोठी झोपडपट्टी आहे बऱ्याच घरांसमोर अगणात किंवा मोकळ्या जागेत तुळशी वृदावनाप्रमाणे लाकडी चबुतऱ्यावर बुद्ध देव्हारेही दिसत होते

दुपारी १२ वाजता गाडीने बँकॉक रेल्वे स्थानकात प्रवेश केला व दम टाकून विसावली स्थानक तस मोठ होत, पण आमच्या बोरीबदरच्या मानान किरकोळच की! माणासाची गर्दीही फारशी नव्हती. खडखडाट, ठणठणाट, आरडाओरडा वगैरे प्रकार तेथे ऐकू आले नाहीत गाड्यामधून माणसाचे लोंढे बाहेर पडताहेत असही दिसलं नाही फक्त काही परदेशी व एक स्काऊटच्या मुलाचा सहलीसाठी आलेला घोळका दिसला काही हमाल लोक सामानाची चढउतार करीत होते.

म्हटल, स्टेशनवर उतरल्याबरोबर आधी परतीचे आरक्षण करू फक्त तीन दिवसात बँकॉक व पटाया आटपायचे होते तेथील आरक्षण कार्यालयात गेलो कार्यालय छान होत भरपूर कर्मचारी वर्ग, आदबशीर वागणूक, प्रवासाची हरतऱ्हेची

माहितीपत्रक व नकाशे, कॉम्प्यूटर इत्यादी सोयींनी ते सज्ज होत. दि २३ नोव्हेंबरच परतीच आरक्षण लगेच मिळाल ही गाडी बँकॉकहून बटरवर्थला जाण्यासाठी दुपारी तीन वाजता सुटते आरक्षण झाल्यावर ॲम्ब्रोजने त्याचा मित्र पीटर बुचीत याला त्याच्या शाळेत फोन केला; अन् बँकॉक रेल्वे स्थानकावर बोलावून घेतल त्याच ठिकाण जवळजवळ दहा कि मी लाब होतं त्यामुळे त्याला यायला वेळ लागणार होता रेल्वे उपाहारगृहात कॉफी घेतली व स्टेशनालगतचा परिसर पायी हिंडून बघण्यास सुरुवात केली. हा भाग फारच जुनाट वाटला अस वाटल की आपण पुण्याच्या रास्ता पेठेतच आहोत. बँकॉकसारख्या आतरराष्ट्रीय शहरात आहोत, अस मुळीच वाटत नव्हत एक लाब फेरी मारून पुन्हा रेल्वे स्टेशनच्या कार पार्किंगजवळच्या कॉरिडॉरच्या कमानीखाली येऊन, थाय समाज न्याहाळीत उभे राहिलो आपल्याप्रमाणच स्टेशनवर बरेच निरुद्योगी व बेकार लोक पडलेले दिसले काही तर त्याच्या चेहऱ्यावरून भलतेच अफीमबाज वाटले रस्त्यावर वाहनाची वर्दळ खूप होती.

जरा वेळान एक सावळासा, चष्मेवाला, लहानसर व गभीर चेहऱ्याचा इसम आम्हाला शोधत आला तोच पीटर बुचीत होता. गळ्यातील चादीची क्रूसाची चेन मुद्दाम कॉलरच्या बाहेर काढून ठेवल्यासारखी होती. ॲम्ब्रोजन माझी व त्याची ओळख करून दिली तो त्याची टोयोटा गाडी घेऊन आला होता. अविवाहित असल्यान तसा मोकळा होता, किंवा ब्रदर असेपर्यंत लग्न करता येत नसाव. तोही आमच्याबरोबर त्याची गाडी घेऊन, पटायाला यायला तयार झाला. त्यामुळ काम खूपच सोप झाल. कारण थायलंडमध्ये भाषेचा प्रश्न फार सतावतो या लोकाना अजिबात इग्रजी समजत नाही अर्थात् थायलड कधीच ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखाली नव्हतं सर्व हॉटेल, लॉजेस, दुकानं, बँका, इतर संस्था याच्या सर्व पाट्या अगम्य अशा थाय लिपीत होत्या

प्रथम पीटरबरोबर त्याच्या 'ला सल्ले' विद्यालयात गेलो 'ला सल्ले' ही एक मोठी फ्रेंच शैक्षणिक सस्था आहे. फादर, ब्रदर, सिस्टर असे सर्व लोक ही सस्था चालवितात. बँकॉकमध्ये वाहतूक प्रचड असल्यान, ठायीठायी वाहतूक ठप्प व्हायची ऊन प्रखर होते रामा द फोमा हा मुख्य रस्ता व तसच मध्यवर्ती भाग होता उच व गगनचुबी इमारती, मोठे रस्ते व वाहनाचे लोटच्या लोट हे बँकॉकच वैशिष्ट्य म्हणता येईल वाहनसागर नुसता डहुवळत होता. अष्टदिशाना वाहनच वाहन दिसत होती मुबईप्रमाण अनेक ठिकाणी फ्लाय ओव्हर्स बांधले

आहेत. बँकॉक हे शहर चाऊफ्राया नदीच्या तीरावर वसलं आहे. आणि एक फार मोठ बदर आणि आतरराष्ट्रीय विमानतळही आहे  बऱ्याच वेळानं आम्ही 'ला सल्ले' विद्यालयात पोहोचलो. शाळेच आवार व इमारत दोन्ही प्रशस्त आहे थायलंडमध्ये आपल्याप्रमाणं हात जोडून नमस्कार करण्याची पद्धत आहे. गाडी शाळेच्या पोर्चमध्ये उभी केली. काही शिक्षक व विद्यार्थी पीटरला हात जोडून नमस्कार करीत होते. पीटर त्याच्या निवासात गेला व कपडे घेऊन आणि दुसऱ्या दिवशीची रजा टाकून आला. शाळेच्या कँटीनमध्ये मुलांना आवश्यक अशा अनेक गोष्टी ठेवल्या होत्या  तिथल्या सेविकेनं आम्हांला कॉफी देऊ केली  माझा घसा बसल्याने तिन मला ग्लासभर गरम पाणी प्यावयास दिलं  शाळेचं मैदान समोरच होतं  तिथे बरीच मुल कवायत करीत होती. सस्था ह्या आपल्या पाल्यांप्रमाणच जोपासून, त्या उत्तम, आकर्षक व सर्व सुखसोयींनी सुसज्ज कशा ठेवाव्यात हे ख्रिस्त्यांनाच विचारलं पाहिजे  हा अनुभव सिंगापूर व मलेशिया इथही आला यांची स्वच्छता व टापटीप पाहिल्यावर असं वाटतं की जीवन जगण्याची खरी रसिकता त्यांच्याकडंच आहे  या शाळेत लहानशी कारजी, रगीबेरंगी फुलझाडे, नाजुक टाइल्स, पाळीव पक्षी, रगीत मासे, उत्तम फर्निचर ठेवलेल होत  खरेखुरे सौंदर्याचे उपासक आहेत  केवळ पैशाने या गोष्टी साध्य होत नाहीत  सौंदर्यदृष्टी हवीच. आम्ही आमच्या सार्वजनिक सस्था रखडत खरडत कशा चालवितो, हे केवळ आम्हांसच माहीत !

सुमारे चारच्या सुमारास आम्ही पटायाकडे प्रयाण केल. बँकॉक ते पटाया हे सुमारे १५० कि.मी चं अतर आहे. पीटरला इग्रजी विशेष येत नव्हत, माझे उच्चार त्याला कळत नव्हते; त्याच बोलणं मला समजत नव्हतं  त्यामुळं ॲम्ब्रोजला दुभाष्याच काम करावं लागलं  पीटर बराच अबोल असल्यानं, ॲम्ब्रोजच जास्त बोलत होता. शेवटी कटाळून मी गाडीत डुलक्या घेऊ लागलो. वाटेत चेंबुरी नावाच एक मोठ शहर लागलं. थायलंडची लोकसख्या आपल्याप्रमाणंच दाट आहे  केरळमध्ये जस पावलोपावली मनुष्य चालताना दिसतो तसच इथं कुठेही नजर फिरवली तरी माणसं दिसायचीच  मग त्या मोटारी असोत की शेतं असोत; हॉटेल असोत वा रस्ता असो  पटायापर्यंतच्या प्रवासात सुनसान रस्ता कुठेच दिसला नाही  इलेक्ट्रिकच्या तारा जशा प्रवासात सोबत करतात, तसे हे वरील घटक सर्वत्र दिसत होते  भाग तसा रूक्ष व झाडझाडोरा अगदीच कमी असलेला दिसला

**बेधुंद पटाया :** सायंकाळी पटाया शहरात प्रवेश केला या शहराचे व माणसाचे पूर्ण पाश्चात्यीकरण झालेल दिसलं बायकाना बॉबकट किंवा स्टेपकटची केशरचना हवीच, त्याबरोबरच जीन पँटस् व टी शर्ट्स् हवेच अलिशान मोटारी, बंगल्याची रेलचेल होती. पटाया शहरापासून ४ / ५ कि मी वर समुद्रकाठी 'सिग्मा' नावाच प्रचंड फाइव्ह स्टार हॉटेल आहे. तिथ मुक्काम ठोकला पीटर त्या हॉटेलचा एक भागधारक असल्यान, त्याला त्या हॉटेलात खोली सवलतीच्या दरान मिळते. त्यामुळ ता माहन्यातून एकदा तरी पटायाला जात असे इथ दाढी, आघोळ करून पटाया शहर पाहायला तयार झालो हॉटेलच्या २१ व्या मजल्यावर आमची खोली होती ती खोली वातानुकूल होती पंचतारांकित असल्याने, झगमगीत व चकचकीत होती आघोळीला टब, गरम पाणी, शॉवर, सुवासिक साबण, मोठा आरसा इत्यादी सोयी बाथरूममध्ये होत्या टाइल्स तर एवढ्या चकाकत होत्या की तिथ पाय ठेवताना दहादा विचार करावा लागे खोली तर एखाद्या लहानशा दिवाणखान्याएवढी होती छानसे सनमायका बसविलेले दिवाण, दोन मोठी लाकडी कपाट, आरामखुर्च्या, लिहिण्याच सुबक टेबल, मोठ्ठा आरसा, पलगाना सुरेख पडदे, लहानसा फ्रीज इत्यादी गोष्टी या खोलीत होत्या. फ्रीजमध्ये किरकोळ खाद्यपदार्थ, बियर व दारूच्या बाटल्या, कोकाकोला आदी वस्तू होत्या. गॅलरीत समोरच निळाशार सुमद्र फेसाळताना दिसत होता आजूबाजूला उत्तम इमारती होत्या. बीचही शात, नीरव होता बीचवर रगीत मोठ्या छत्र्या उभ्या करून, त्याखाली वेताच्या गोल खुर्च्या व टेबलं माडली होती पुळणीवर काही गुलहौशी लोक मुलींकडून मसाज करून घेत होते. काही लोक बियर पीत बसले होते

सायंकाळी काळोख पडल्यावर पटाया पाहायला सज्ज झालो. खालती आल्यावर पटाया गावात जाऊन, एका चिनी हॉटेलात गेलो जेवायला पॉन्स भात व [illegible] यावर भागवलं तिथ चपाती, आमटी, वरण, हिरवी भाजी मिळण दुरापास्तच दिसल या थाय किंवा चिनी लोकांना स्वयपाक शिकवायला महाराष्ट्रात आणल पाहिजे, असं इथ प्रकर्षान जाणवल हॉटेल मोकळ्या प्रांगणात होत तिथ तळलेला मासा उच उडवून झेलायचा, असा एक खेळ चालतो हा प्रकार फारच लोकप्रिय दिसला याबद्दल मी पीटरला विचारलही, पण तो जे काही बोलला ते मला नीट समजल नाही जेवण झाल्यावर रात्री ८ वाजता अल्काझार कॅब्रे हाउसमध्ये 'डान्स शो' पाहण्यासाठी गेलो. पटायाला येणाऱ्या प्रत्येकाने हा 'डान्स शो' पाहायला पाहिजे, असा एक सकेत आहे, अस पीटरन सागितलं आम्ही तिकिटाच्या रागेत

उभे राहिलो गर्दी तोबा होती तेवढ्यात, या 'डान्स शो' मध्ये काम करणारी एक बॉयगर्ल अत्यंत अपुऱ्या कपड्यात कोणाशी तरी बोलत बाहेर आली. बाहेर येताच मादक हसून, सर्वांना हात उचावून 'हाय' केलं तिन तस करताच रागेची 'लाइन' बिघडली एकच हलकल्लोळ उडाला कोंबडे जसे माना हलवितात, तसे लोक माना वळवून तिच्याकडं पाहू लागले व तिच्यासबधी गरमागरम चर्चा करू लागले काही आबटशौकीन तर थिएटरात मारतात तशा शिट्ट्या मारीत होते. ती दिसायला मादक, सुरेख व शेलाट्या बांध्याची होती. जरा वेळान पुन्हा आत गेली व जाताना 'हॅलो' करून गेली, तर तसंच इकडं लोकाची रागही वेगाने पुढ सरकू लागली आपल्या एस् टी त आत शिरण्यासाठी जशी बेधुंद गर्दी उडते; तस इथही तिकीट मिळताच, हॉलमध्ये प्रत्येक जण सुसाटत होता. रागेत उभा असतानाच, आजूबाजूचा परिसर पहात होतो तीर्थक्षेत्री जशी धर्मशाळांची वा भिक्षुकाच्या घराची रेलचेल असते, तद्वत, येथे हॉटेल्स, बार याची अमूप दाटीवाटी होती. पटायाच्या मुली जशा खुणावतात, त्याप्रमाणे इथली हॉटेल्स, कॅसिनो, बिअर बार, गोगो बार, कॅब्रे हाउसेस हळूच खुणावतात व सागत असतात की यथेच्छ भोग भोगून घ्या मृत्यूनतरच जीवन शोधू नका. हयात असेपर्यंतच जीवन ख्यालीखुशालीत जगून घ्या, अस तत्त्वज्ञान सांगत, जणू काय ते उभे असतात.

एकदाची तिकिटं मिळाली, परतु गॅलरीची मिळाली मला जरा बर वाटल, कारण पीटरने मला घाबरवल होतं; की एखादी मुलगी तुला तिच्याबरोबर नाचायला बोलावेल म्हटल, बर आहे! स्टेजवरची मुलगी निश्चितच गॅलरीपर्यंत येणार नाही.

तिकिटे घेऊन आत गेलो 'कॅब्रे' आहे की 'डान्स शो' आहे, याबद्दल खात्री नव्हती पाहतो तर बरेच लोक 'सहकुटुंब' या 'शो'ला आले होते आम्ही गॅलरीत खुर्च्यांवर स्थानापन्न झालो गेल्याबरोबर प्रथम एक चिल्ड बीयर देण्यात आली अर्थात त्याचे पैसे तिकिटात अतर्भूत होते

कार्यक्रम सुरू झाला सर्वत्र काळोख पसरला. फक्त स्टेजवर आवश्यक तेवढाच प्रकाश पडत होता अनेक रगाचे प्रकाश किंवा प्रकाशछायाच्या साह्यान व वाद्याच्या तालावर वेगवेगळे नृत्यप्रकार गुंफून येऊ लागले काही नृत्यप्रकार थाय, जपानी, मले व भारतीय पद्धतीचे होते. मयूरनृत्य केवळ अप्रतिम होत काही नृत्य कलात्मक; तर काही विनोदी व विडबनात्मक होती नाच करणाऱ्या बॉयगर्ल्स नृत्यनिपुण होत्या. सभागृह खचाखच भरल होत. नृत्याला उत्स्फूर्त दाद मिळत होती कॅमेऱ्याची

कटमार होत होती. नाचणाऱ्या मुलींची वेषभूषा, केशभूषा फारच आकर्षक होती; आणि यातील दोन तीन मुली दिसण्यात फारच लाजवाब होत्या. तासभर हा कार्यक्रम चालला. यात अभिरुचीहीन असं काहीच नव्हतं. हल्ली अभिरुची हा शब्द लिहायची किंवा बोलायचीही भीती वाटते एखादा नवमतवादी किंवा गरम भेजाचा पुढारी, कवी किंवा लेखक असं उलट विचारेल की, 'अहो! इकड भारतात कोट्यवधी लोकाच्या तोंडाला रुची नाही, अन् तुम्ही बायकाचे नाच बघून अभिरुचीच्या गोष्टी करताहात!'

गर्दीतून वाट काढत काढत थिएटराच्या बाहेर आलो व बघतो तर नृत्य करणाऱ्या सर्व बॉयगर्ल्स दुतर्फा उभ्या होत्या. [illegible]

असलेल्या गरीब लोकांवर नमाजी जशी नजर टाकतो, तसे लोक यांच्याकडे नजरा उळवून पुढे सरकत होते. मात्र या मुली उभ्या असायच्या त्या गिऱ्हाइकाच्या शोधामध्ये एखाद्या पैसेवाल्या किंवा ऐय्याषीला यातील एखादी बॉयगर्ल आवडली तर त्यान क्रीडेसाठी तिला घेऊन जायचं असत पण थांबावं जरा! या मुली हुशार असतात अगोदर हेरतात की यातील पैसेवाला कोण आहे. मुख्य म्हणजे डॉलर्सवाला कोणी आहे की नाही, याची त्या अचूक पारख करतात; आणि मगच त्याच्याशी लघळपणा करतात साधारणपण अमेरिकन, ऑस्ट्रेलियन, जपानी अशी बडी धेंड त्या गटवायला टपलेल्याच असायच्या ॲम्ब्रोज म्हणाला, "तू घाबरू नकोस. [illegible] कारण त्यांच्याकड किती डॉलर्स असतात, हे त्याना चागल माहीत असतं."

बाहेर येऊन मोटार पार्किंगच्या इथं येऊन उभे राहिलो. मोटारींची भली मोठी राग लागली होती दिव्याचा झगमगाट होता दारू घेतल्याशिवायच लोकांना त्या उन्मादक वातावरणाची झिंग चढली होती आम्ही पीटरचा मित्र व ॲम्ब्रोजचा जुना विद्यार्थी जोसेफ याची वाट पाहत होतो. कारण जोसेफ हा त्याच्या गाडीतून आम्हाला फिरायला नेऊन, रात्रिंचर पटाया दाखविणार होता आजूबाजूला बऱ्याच अलिशान व वातानुकूलित पर्यटन बसेस उभ्या होत्या त्यात तद्दन कोरियन व जपानी पर्यटक आलेले दिसत होते.

तेवढ्यात, आधी अपुऱ्या कपड्यात येऊन 'हॅलो' करून गेलेली सुंदर नृत्यांगना त्याच अपुऱ्या कपड्यात बाहेर आली व एका धनाढ्य गलेलठ्ठ जपानी माणसाशी लगट करू लागली दोन मिनिटातच एका टोयोटामधून ते दोघ नाहीसे झाले. जरा वेळाने जोसेफ त्याची गाडी घेऊन आला. पीटरला झोप आली, म्हणून

तो अगोदरच हॉटेलमध्ये परतला. जोसेफच्या गाडीतून प्रथम त्याच्या प्रिंटिंग प्रेसच्या ऑफिसमध्ये गेली तिथ हात, पाय, तोंड धुऊन व चहा घेऊन रात्रीची मदमस्त व रंगीन पटाया पाहण्यास त्याच्याबरोबर बाहेर पडलो. रस्त्यात गर्दी असल्याने गाडी हळूच चालवावी लागत होती. शेवटी एके ठिकाणी गाडी बाजूला उभी करून, पायीच निघालो

पटायात लोकाना रात्रीचं उधाण येतं समुद्राच्या उधाणापेक्षा जास्त खळबळ असते वाहत्या पाण्याबरोबर आपणही वाहत जाणं हा निश्चला पर्यटकी स्वभावधर्म रंगीत व चित्रविचित्र कपडे घातलेले नाना देशींचे लोक, हरतऱ्हेचा माल मांडून बसलेले दुकानदार, मद्यालय, मद्यान व मदनिकांनी दुथडी भरून वाहत होती, या सर्वांवर तेथील झगमगीत दिव्यामुळे अधिकच धुंदीत भर पडत होती गोगो बार, कॅसिनो बार, बियर बारमध्ये बसायला जागा नाही बारमध्ये ग्लासात मद्य ओतायला व प्रेमाचे चाळे करायला, या मुली हव्यातच हॉटेलांतून मंद प्रकाशात माइक हातात घेऊन भसाड्या आवाजात गाणी म्हणण्याची स्पर्धा लागली होती.

पटाया ही भोगनगरी आहे. रस्त्यांवर झगमगीत लाइट्स, माणसांची बेधुंद झालेली बेबंद गर्दी, तोंड रंगविलेल्या व तंग आणि तोकडे कपडे घालून, सहज 'यस सर ! कम सर !' म्हणून खुणावणाऱ्या मुली, यांत्रिक जुगाराचे अड्डे, वखवखलेले गोऱ्या कातडीचे लोक, हे सगळ बघितल्यावर; नैतिक काय नि अनैतिक काय, हा प्रश्न पडतो. एवढ्या सुधारणा, उत्क्रांत्या होऊनही मनुष्यस्वभाव पशुवतच राहणार काय, असाही प्रश्न मनात येतो उघड्या डोळ्यांनी जगाकड पाहाव, हे सर्व बरोबर असल तरी विचारांचा आवर्तन कसा राखणार ? एवढ्या कोलाहलातही एकाकीपण जाणवू लागलं. आपल्याकडंही पाश्चात्यांचा उदारमतवाद व सामाजिक सुधारणा न उचलता, केवळ भोगवादी संस्कृती जतन करण्याचा कल शहरात तरुण पिढीमध्ये व विशिष्ट वर्गात वाढीस लागला आहे, हे मोठच दुश्चिन्ह आहे स्वातंत्र्य व सुधारणा म्हणजे स्वैराचार नाही, हे सांगायला आता सुधारकाग्रणी आगरकर कोठून आणायचे ?

सर्व प्रकारच्या मालाची मोठीच बाजारपेठ इथं आहे. खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणावर होत असते दुकानं बव्हंशी बायकाच सांभाळीत होत्या मी एका दुकानातून चामड्याचा पट्टा विकत घेतला. पैसे देताना ती बाई व तिची १४ / १५ वर्षांची मुलगी एकदम किंचाळल्या, "त्या बघा, त्या बघा सेक्सी बॉयगर्ल्स बघा", आम्ही चमकून रस्त्याकड पाहिल; तर काही बॉयगर्ल्स एका बसमधून उतरून

खरेदीला निघाल्या होत्या. पटाया, बँकॉक इथं हा प्रकार विशेषत्वाने पाहायला मिळतो. धड ना मुली, धड ना मुलं, असा हा मधलाच प्रकार असतो. मात्र त्याची अंगकांती, नाजुकपणा, चेहरा थेट मुलींसारखा असतो. 'अशी' कोवळी कोवळी मुलं पर्यटकाचे फाजील चोचले पुरविण्यासाठी निवडली जातात

एका बारमध्ये जोसेफ बियर प्यायला घेऊन गेला माझा घसा बसल्याने व बराच खोकला असल्याने कॉफीच मागविली. एक भसाड्या आवाजाची भसाडी मुलगी ड्रमच्या तालावर काहीतरी गाणी म्हणत होती इथं जोसेफनं बरीच हकीगत सागितली. तो स्वत: पटायात राहणारा होता त्याच्या म्हणण्यानुसार अशा लोकाची इथं मुद्दाम पैदास केली जाते यात अनीतिकारक, अन्याय्य असं इथल्या सरकारला व समाजाला काही वाटत नाही उलट हे पैसे, डॉलर्स मिळविण्याचं मोठ साधन समजल जात देशागणिक नीतिमत्तेच्या कल्पना कशा बदलतात, याच हे उत्तम उदाहरण आहे. या बॉयगर्ल्सची कालातरान लग्न होऊन, त्या छानसा ससारही थाटतात, असं त्यान सागितल

हॉटेलातून बाहेर पडल्यावर एके ठिकाणी एका मोकळ्या मैदानात मोठ्या स्क्रीनवर एक देमार चित्रपट चालू होता, तो पाहत काही वेळ उभा होतो समोरच जुगाराची अनेक यंत्रे होती. साठीच्या पुढचा एक अमेरिकन माणूस एक १५ / १६ वर्षांची बॉयगर्ल बगलेत घेऊन हिंडताना दिसला युरोपिअन, अमेरिकन, ऑस्ट्रेलियन तरुणाचे घोळकेच या बॉयगर्ल्सच्या शोधात हिंडताना व त्यांच्याबरोबर असले तर प्रेमाचे चाळे करताना दिसत होत. ७ / ८ ऑस्ट्रेलियन तरुणांचं टोळक दोन अगदी कोवळ्या बॉयगर्ल्सना घेऊन, घाईघाईने जाताना दिसत होते व त्या बॉयगर्ल्सही त्या तरुणाच्या सिगारेटी पेटवून देत देत हसत खिदळत चालल्या होत्या. बरं, या सर्वच बॉयगर्ल्स दिसायला चागल्याचुगल्या आहेत, असंही नाही. बऱ्याच यथातथाच होत्या स्त्रिया या धद्यात किती प्रमाणात आहेत, हे मात्र समजलं नाही या रात्रीच्या पटायाच भडक चित्र फारच किळसवाण वाटलं नाही म्हणायला एक पजाबी महिला साडीत बघितली, तेवढंच काही क्षण बर वाटलं जस चर्चगेट, फोर्ट, फाउंटन या अमराठी व 'छप्पन्न' टिकली संस्कृतीत चर्चगेटला कै. नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांचा पुतळा पाहिल्यावर वाटतं तस! रात्री बऱ्याच उशिरा हॉटेलवर आलो हॉटेलच्या लाऊंजमध्येही या 'बया' बसलेल्याच होत्या. वर आल्यावर अंथरुणात 'अंग' टाकल्यावर ताबडतोब झोप लागली पीटर अगोदरच येऊन, झोपला होता.

सकाळी उशिराच उठलो. सर्व आटोपून खाली यायला सकाळचे ११ वाजले होते गाडी बाहेर काढली व जवळच समुद्रकिनाऱ्यावर एका मोठ्या रंगीत छत्रीखाली गोल टेबल -खुर्च्या माडल्या होत्या, तिथं जाऊन बसलो समोरच्या हॉटेलातून एक मुलगी आली व जेवणाची ऑर्डर घेऊन गेली पाचच मिनिटात जेवण आल चिनी व थाय जेवणाच एक वैशिष्ट्य आहे, की ते पटकन मिळते; थांबाव लागत नाही टमटमीत प्रॉन्सबरोबर सी फूड नामक आणखी काही जलचर प्राणी होते. तोंडी लावण म्हणून आपण जसं पापड, लोणची, साडगे खातो, तसे भाताबरोबरं हे पदार्थ खात होतो हवेत विलक्षण उष्मा होता जेवण करून, जोसेफचा निरोप घेऊन बँकॉककडे निघालो दुपारी सुमारे दोनच्या सुमारास बँकॉक शहराच्या वेशीवर आलो, पण वाहतूककोंडीने कैचीत पकडले अक्षरश मुगीच्या गतीन वाहनं पुढे सरकत होती. त्यात बराच वेळ गेला. शेवटी कसबस ३ वाजता रेल्वे स्टेशनजवळ पोहोचलो स्टेशनजवळील काही लॉजेस बघत होतो, पण भिकार होती ॲम्ब्रोज स्वत लॉजेस बघत होता काही ठिकाणी स्वागताला बॉयगर्ल्स असायच्या त्याना पाहून, हा ब्रह्मचारी धापा टाकीत त्याच पावली परत येत असे. हे थाय लोक गोल चेहऱ्याचे व जाडजूड गालांचे, त्यांचे चेहरे गभीर असायचे. त्यांनी रोखून पाह्यल की पोटात गोळा उठायचा. स्टेशनजवळील लॉजेस काही पसंतीस आली नाहीत. पीटर बरोबर असल्याने भोषचा प्रश्न आला नाही, नाही तर लॉज शोधण व चौकशी करण्याच काम अगदीच दुरापास्त होऊन बसल असतं. थायलडवर इग्रजी सत्ता कधीच नसल्यानं, ते लोक व्यवहारातही थाय भाषाच वापरतात त्यांची थाय अस्मिता फार जाज्वल्य आहे, असे अम्ब्रोज सांगत होता. जागतिक मराठी परिषदेच्या व्यासपीठावरून आमचे कविवर्य कुसुमाग्रज पोटतिडकीने सांगत होते, की मराठी ही सर्व लोकव्यवहाराची भाषा झाली पाहिजे, परतु हल्लीची मराठी भाषेची स्थिती व स्वरूप बघून मराठी भाषा ही मृत्युपथाला लागणार, हे इतिहासाचार्य राजवाड्याच भाकीत आठवल्यावाचून राहत नाही थायलडमध्ये थाय भाषेशिवाय पर्याय नाही. आमची मराठी अस्मिता हृदयात कधीच साठविली जात नाही ती फक्त ओठावरच थोड स्मित करते, आणि आम्ही व आमचे काही लेखक 'बदलता काळ' या नावाखाली आपल्या मुलांना 'कॉन्व्हेण्ट किवा इंग्रजी माध्यमाच्या शाळात दाखल करतो त्यामुळे अलीकडच्या पिढीत कविवर्य कुसुमाग्रज किंवा कै. ग.दि माडगूळकर याच्यासारखे प्रतिभासंपन्न कवी निर्माण होताना दिसत नाहीत कारण मूळ मराठी मातीची नाळ तुटलेली असते.

फिरफिर फिरलो, पण लॉज कुठही मिळाल नाही. काही मोठी व पंचतारांकित हॉटेल्स होती, पण ती परवडण्यासारखी नव्हती शेवटी पीटरने असं सुचविलं की काही सोय होईपर्यंत तुम्ही आमच्या 'ला सल्ले' शाळेच्या अतिथिगृहात रहाव सध्याकाळी फोन करून बकाक गावातील ख्रिश्चन हास्टेलमध्ये काही सोय होईल का ते पाहू हा प्रस्ताव मजूर झाला आम्हाला पुन्हा विरुद्ध दिशेला जायच होतं रस्त्यावर तर जक्शन वाहतूक आणि गाडी वळविण्याची तर काही सोयच नव्हती शेवटी पीटरला खूप लांब जाऊन, गाडी हव्या त्या मार्गावर आणायला, बराच वेळ लागला. तोपर्यंत रस्त्याच्या कडेलाच उभ राहून, मी व ॲम्ब्रोज ती प्रचड वाहतूक व आजूबाजूची दुकान पाहत होतो. रस्त्याच्या कडेला फूटपाथवर मांसाहरी पदार्थ विकणाऱ्या ठेल्यांची बरीच गर्दी होती थायलडमध्ये सर्वत्रच लोक उघड्यावर अन्न विकतात व खातात मोठे बेडूक, बदकं, कोंबड्या, मोठे प्रॉन्स यासारखे मासाहारी पदार्थ मसाले व सॉस लावून विकायला ठेवलेले असायचे अक्षरश. दहा दहा फुटावर असे ठेले असायचे त्या वासानंच मळमळायला व्हायचं मच्छी व सी फूड तर विचारूच नका चणेकुरमुरे विकत घ्यावेत तितक्या सहजतेन इथ मासपदार्थांची खरेदी होते

## बुद्धाचे बॅकॉक

'ला सल्ले' शाळेकड जाताना बँकॉक शहराच खरंखुर दर्शन होत होत. गगनचुंबी इमारती, प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्स, वित्तीय सस्था, बँका, महामंडळ यांच्या सुदर व आधुनिक बाज असलेल्या इमारती डटसन, मर्सिडिझ, बेंझ, टोयोटासारख्या लाबलचक गाड्याची साखळी, राम, अशोक, फाहेनसारखे अतिरुद रस्ते, बँकॉकची भव्यता दर्शवीत होते पण त्याचबरोबर वाहतूक वारंवार ठप्प होत असल्यान अत्यत कातावल्यासारख होत होते पीटरला मात्र ही वाहतूक कोंडी अगवळणी पडल्यासारखी दिसली, कारण तो राजा जनकाप्रमाणे या वाहतूक कोंडीत अत्यंत स्थितप्रज्ञाप्रमाणं मोटारीचे चक्र हातात धरून नुसताच समोर पाहत राही. सायकाळी ६ वाजण्याच्या सुमारास 'ला सले'च्या आवारात पोहोचलो. गाडीतून कधी एकदा उतरतो, अस होऊन गेलं होतं. शाळेच्या लांबलचक कॉरिडॉरमधून चालत चालत आम्ही शाळेच्या माग असलेल्या वरच्या मजल्यावरील अतिथिगृहात आलो. हे अत्यत सुसज्ज अस अतिथिगृह होते चहा, कॉफीचंही साहित्य इथ होत. सामान ठेवून कोचावर स्वस्थ बसलो होतो

तेवढ्यात एक उच, नाकेला, निळ्या डोळ्याचा, साठीच्या आसपास असलेला

फ्रेंच मनुष्य आला हा बरीच वर्षे या शाळेत शिकवीत होता हा ब्रदर असल्यानं व एकाच शिक्षणसंस्थेत काम करीत असल्यानं ॲम्ब्रोजच्या व त्याच्या गप्पा रंगल्या प्रामुख्यानं त्यांच्या शिक्षण, शाळा या विषयांवर गप्पा चालल्या होत्या. या फ्रेंच मनुष्यानं थायलंडमधील बुद्धाच्या वरचष्म्याविषयी तक्रारी सुरू केल्या होत्या ॲम्ब्रोजनं माझी व त्याची ओळख करून दिली मी मुंबईहून आलो आहे; म्हटल्यावर त्यानं आश्चर्य व्यक्त केल्यासारखं दाखविलं या गृहस्थाचाही मी ख्रिश्चन आहे, असा समज झाला कारण एका ब्रदरबरोबर बँकॉकच्या ख्रिस्ती संस्थेत भारतातून हिंदी मनुष्य येईल, याची त्याला सुतरामदेखील कल्पना नसावी त्यामुळं त्यानं निरागसपणं प्रश्न केला की "आपल्या ब्रदर लोकांचे भारतातील कार्य कसे काय चालू आहे?" पण लगेच मी त्याची चूक सुधारली व म्हणालो, "बाबा रे! माफ कर, मी हिंदू आहे" त्यावर तो फार ओशाळला आणि बायका ज्याप्रमाणे लाजल्यावर जीभ चावतात, त्याप्रमाणं त्यानं चक्क जीभ चावली आणि माफी मागितली मात्र शिक्षण हे परक्या भाषेतून घेण्यापेक्षा मातृभाषेतून घेणं अत्यंत नैसर्गिक आहे, यावर माझं व त्या फ्रेंच गृहस्थाचं एकमत झालं. थायलंडमध्ये इंग्रजीचा दर्जा अगदीच सुमार आहे, असं त्याचं मत होतं. एक मात्र खरं की भारतातील लोक व्याकरणदृष्ट्या इंग्रजी शुद्ध बोलोत किंवा न बोलोत, उच्चार स्पष्ट करतात. इतरांचे इंग्रजी समजावून घ्यायला वेगळा बुद्ध्यांक वापरावा लागतो या फ्रेंच गृहस्थानं स्वहस्ते कॉफी बनवून आम्हाला दिली.

जरा वेळानं पीटर आला. त्यानं बँकॉक शहरात ख्रिश्चन हॉस्टेलमध्ये फोन करून आमच्या राहण्याची सोय होतेय का ते पाहिलं तिथून होकार आल्यावर पीटर म्हणाला की, "आपण जेवण करून ख्रिश्चन हॉस्टेलवर जाऊ, तिथे सोय झाली आहे"

सायंकाळी ७ वाजता या शाळेत प्रार्थना होते तो फ्रेंच मनुष्य व ॲम्ब्रोज प्रार्थनेला निघून गेले मी जरा वेळ आराम केला व शिक्षक लोकांच्या मेसवरती जेवायला गेलो. जेवायला मी, ॲम्ब्रोज, तो फ्रेंच मनुष्य व शाळेतील इतर दोन शिक्षिका होत्या. एक नन् काय हवं नको ते पाहत होती. जेवण उत्तम होतं सर्वांचा निरोप घेऊन पीटरच्या गाडीतून बँकॉक शहरात गेलो. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ख्रिश्चन हॉस्टेलवर पोहोचलो सकाळी साडे आठ वाजता येतो, असं सांगून पीटर निघून गेला. हॉस्टेल खूपच मोठं व सुंदर होतं. हे हॉस्टेल खास करून ब्रदर्स, सिस्टर्स, फादर्स यांच्या निवासासाठी तयार केलं आहे. राहण्याची

सोय फुकट झाली कारण ब्रदर ॲम्ब्रोज बरोबर होता ना! इथ फादर, ब्रदर लोकाची विशेष वर्दळ दिसली या सर्व फादर, ब्रदर्समध्ये मी एकटा हिंदू नास्तिक होतो हे पाहून मलाच स्वत.ला गमत वाटली.

दुसऱ्या मजल्यावर छान स्वतत्र खोल्या मिळाल्या व्यवस्था उत्तमच होती आणि कशाचीच कमतरता नव्हती विशेष म्हणजे या हॉस्टेलमध्ये एक वाचनालय व प्रयोगशाळाही आहे निर्जंतुक पाणी पिण्यासाठी ठेवले आहे पाश्चात्याचा शुद्ध पाण्याबाबत फार कटाक्ष असतो सामान खोलीत ठेवले व बँकॉक शहर पाहण्यासाठी बाहेर पडलो

इथं पटायाप्रमाणं रात्री उजाडत. दुकान उघडी होती हरतऱ्हेच्या मालाचे स्टॉलस् लावले गेले होते खाद्यपदार्थांची रेलचेल, अनेक पंचतारांकित हॉटेलाचा दिमाख, लाबलचक मोटारी, भपकेबाज व रगीबेरगी पोशाख ल्यालेली पर्यटक मंडळी, गोल व मोठ्या चेहऱ्याचे अन् बारीक डोळ्यांचे थाय लोक, गिऱ्हाइकाची प्रतीक्षा करणाऱ्या मदनिका, सामिष खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या बायका आणि वस्तू पर्यटकांच्या गळ्यात मारणारे माल - विक्रेते, अस विविधरगी आणि विविधढगी वातावरण बँकॉकच्या दिव्यांच्या झगमगाटात उजळून निघत होत बिअर बार, कॅसिनो बार, गोगो बार तर धुदीने न्हाऊन निघाले होते मध्यरात्रीसुद्धा लोकामध्ये दिवसाइतका उत्साह संचारला होता काही चामड्याच्या व होजिअरी वस्तू आम्ही खरेदी केल्या. फुटाफुटावर रस्त्यावर खच्चून माल भरलेलं होत मला खोकला असल्यानं एका दुकानात व्हिक्स ४४ हे औषधही विकत घेतले. इथ प्रवासी कपन्याही बऱ्याच होत्या. एका ठिकाणी दुसऱ्या दिवसासाठी 'बँकॉक दर्शन' बसची चौकशी केली, परतु त्यानी अव्वाच्यासव्वा भाडे सांगितले व आमच्या वेळेतही ते बसणार नव्हते. त्यामुळ आम्ही हा नाद सोडला

रस्त्यावरून भटकताना तिथला थाय समाजही दिसत होता बँकॉकमध्ये श्रीमंत, मध्यम व कनिष्ठ वर्ग असे तिन्ही समाजातील लोक दिसले श्रीमती जशी उतू जात होती, तशी गरिबीही फेसाळत होती. अनेक निरुद्योगी व कळाहीन चेहरे उगीचच भटकताना दिसत होते रस्त्यावर पदार्थ विकणाऱ्या बायकाच्या चेहऱ्यावरूनही गरिबी समजत होती मात्र या थाय बायका चिनी बायकाप्रमाणेच अपार कष्ट उपसतात. आपल्याकडही लहान गावांत व खेड्यामध्ये स्त्रियांच्या कष्टांना सीमा नाही मानसिक व शारीरिक दोन्ही दृष्ट्या त्या बिचाऱ्या भरडल्या जातात

एकदरीत थाय लोक बाह्यत: तरी शात व सौम्य स्वभावाचे वाटले पूर्वेकडील देशाच्या माणसांच्या चेहरेपट्टीचं हे एक प्रमुख गुणवैशिष्ट्य आहे की काय न कळे ! एका चिनी बाईच्या रेस्तारॉंमध्ये फिल्टर कॉफी घेऊन रात्री दीडच्या सुमारास हॉस्टेलवर पायी परत आलो

उठलो सकाळी जरा लवकरच; कारण पीटर साडे आठ वाजता गाडी घेऊन येणार होता आणि गोल्डन टेंपल व चाऊ फ्राया नदीचा परिसर दाखवायला नेणार होता या हॉस्टेलमध्ये वॉश बेसिन, सडास, आघोळीची जागा मात्र कॉमन होती मी सकाळी तोंड धुण्यासाठी म्हणून वॉश बेसिनशी गेलो चार -पाच वॉश बेसिन्स एका जवळ एक अशी होती तेवढ्यात एक अमेरिकन फादर आला व त्यान मला गुड मॉर्निंग केले तोंडात ब्रश असल्यान मी नुसतीच मान हलविली या सकाळी ओळख नसतानाही मला अनेकाशी गुड मॉर्निंग कराव लागल 'हॅलो' या कृत्रिम शब्दापेक्षा 'गुड मॉर्निंग,' 'गुड ईव्हिनिंग' हे शब्द वापरायला बर वाटत आपल्या नमस्काराशी ते कुठतरी नात सागतात वॉश बेसिनच्या वर आरसे लावले होते तिथच दाढी केली. इथं आघोळीला जायच म्हणजेही एक उपद्व्यापच होता. आघोळीला जाताना त्यांनी ठेवलेल्या स्लीपर्स घालून जाव लागतं या स्लीपर्स बाथरूमच्या बाहेर दिसतील अशा ठेवाव्या लागतात दरवाजे अगदीच तोकडे म्हणजे वकील, डॉक्टरांच्या केबिनला असतात तसे होते व त्याला आतून कड्या नव्हत्या आपण आत आहोत, हे कळावे म्हणून म्हणे स्लीपर्स तशा ठेवायची व्यवस्था होती

चहाची तल्लफ आली म्हणून बाहेर पडलो हॉटेल व स्टॉल्स खूप होते, पण कुठही चहा मिळाला नाही. कॉफीही नव्हती अगदी सकाळी हे थाय लोक कसलंसं सूप पिण्यात आणि मासाहार करण्यात गुग झाले होते इतक्या सकाळी सामूहिक मासाहार बघून, मला चक्कर यायला लागली टी, कॉफी हे शब्दही येथील लोकाना माहीत नव्हते एका दुकानदाराच इराण्याच्या हॉटेलप्रमाण दुकान होत वाटल त्याच्याकडं चहा मिळेल तोही मिळाला नाही व तो जे काही बोलला ते समजल नाही. मग आम्ही त्याच्या दुकानातून बनपाव, केक व डोनट्स खरेदी केले आणि एका चौकात नुसतेच हताशपणे बसलो. जरा वेळाने हॉस्टेलवर परत आलो बरोबर साडे आठ वाजता पीटर गाडी घेऊन आला सामान घेतल व खोलीच्या चाव्या तेथील व्यवस्थापकाकडं दिल्या आणि त्याचे आभार मानून बाहेर पडलो

जगप्रसिद्ध 'गोल्डन टेंपल'कडे निघालो सुरुवातीपासूनच वाहतूक अडथळ्यांना प्रारंभ झाला गाडी अगदी हळूहळू जात होती. पल्ला फारसा मोठा नव्हता. पण तिथल्या वाहतुकीमुळे जीवघेणा वाटला. तशात भूक लागली होती. कारण काट्याचमच्यानी मासाहार करण्याची सवय नसल्यामुळे आदल्या रात्री हात राखूनच जेवलो होतो शेवटी बरोबर आणलेले केक व डोनट्स खाऊन भूक भागविली व वाहतूक कोंडीत थोडा 'टाइमपासही' झाला. बराच वेळाने वाट काढीत 'गोल्डन टेंपल'पाशी आलो बघतो तर तिथे गाड्याची तोबा गर्दी झालेली एकच भाऊगर्दी उडाली व पीटरलाही प्रश्न पडला की गाडी कुठे उभी करावी देवळाच्या महाकाय, विस्तीर्ण आवारात गाडी नेऊन उभी करण्यातच बराच वेळ गेला तिकीटविक्रीच्या खिडकीपर्यंत पोहोचेपर्यंत बरच चालावं लागल उन्हाचा तडाखा जबरदस्त होता त्यातून वहाणा, बूट काढून आत जाव लागत होत जाताना हिरवळीचे आखीव चौकोन व त्या चौकोनातून गेलेली फरसबदीची सुरेख वाट आणि उन्हात लकाकणारे सोनेरी मनोरे मनाचा ठाव घेत होते पर्यटकाची नुसती रीघ लागली होती तिरुपती बालाजीला जसे दर वर्षी लाखो लोक भेट देतात, तसे हे मदिर पाहण्यासाठी देशविदेशातून लाखा पर्यटक येतात. बुद्धदर्शन हा त्याचा हेतू असेलही, पण पर्यटक लुब्ध होतात ते मदिराची आतील -बाहेरील कलाकुसर बघून. मानवी प्रतिभेचा आणि कारागिरीचा व कर्तबगारीचा तो एक अत्युत्तम नमुना आहे. बँकॉकला काही नाही तरी गोल्डन टेंपल पाहायला आयुष्यातून एकदा तरी यावच हे बुद्धमदिर प्रसिद्ध असून याला इग्रजीमध्ये The Emerald Buddha असे म्हणतात. इथल्या बुद्धमूर्तीसाठी हिरव्या रगाचा मौल्यवान धातू वापरला आहे.

या मदिराला चोहोबाजूनी पाढऱ्या रगाची तटबदी आहे व मजबूत असे बुरूजही आहेत रॉयल पॅलेसच्या जागेतच हे बुद्धमदिर आहे ह्या मदिराच्या उभारणीमाग अनेक राजवशाचे हातभार लागले आहेत सात -आठशे वर्षापूर्वी सुखाथाइ या राजवशानं हे मदिर बाधण्यास सुरुवात केली राम पहिला या राजान या प्रसिद्ध बुद्धमूर्तीची स्थापना केली. 'एमराल्ड बुद्ध' ही येथील प्रमुख प्रतिमा आहे. या मूर्तीचा घेर ४८ ३ सें मी असून उंची ६६ सें.मी इतकी आहे. आसनस्थ अशी ही मूर्ती आहे सोन्याच्या पत्र्याने मढविलेल्या सिंहासनावर ही मूर्ती बसविली आहे. तिच्या समोरच आणखी एक लहान ध्यानस्थ बुद्धाची मूर्ती आहे. तसच अत्यत नाजुक व बारीक कोरीवकाम केलेल्या राम पहिला व राम दुसरा या राजांना अर्पण केलेल्या बुद्धमूर्तीही लक्ष वेधून घेतात. निरनिराळ्या राजघराण्यांनी

अर्पण केलेल्या या मूर्ती आहेत गाभाऱ्यात सुदर व नाजुक झुंबरामधून मद दिवे सोडले होते. एक प्रकारची सोनेरी झाक त्यामुळे पसरली होती. सुवासिक फुलांच्या सजावटीमुळे सुगध दरवळत होता बुद्धाची ती शात, सयमी मुद्रा बघून पर्यटक खरोखरच काही मिनट स्तब्ध होत अनेक लोक माडी घालून व डोळे मिटून शातचित्त बसले होते सर्वधर्मीयाचा त्यात सहभाग होता

अजठा वेरूळ व्यवस्थित पाहण्यासाठी खऱ्या जाणकाराला जस काही दिवस हवेत, तसच हे गोल्डन टेंपल बघताना होत काय पाहावे, किती पाहाव, कसे पाहाव व किती वेळ पाहावं याचाच सभ्रम पडतो मदिराच्या भिंतींवर आतील बाजून अनेक पौराणिक कथा चित्रित केल्या आहेत थाय कलेवर भारतीय तत्त्वज्ञान व रामायण याचा फार मोठा प्रभाव आहे. भारताप्रमाणेच इथही कलेची अभिव्यक्ती धार्मिक प्रतिमातून झालेली आहे येथे रामायणावर नाटक होतात या भिंतींवरील चित्रात रामायण, काही पुराणकालीन देवदेवतांची चित्रं आहेत शिव, विष्णू, इद्र, गरूड, नाग या देवताची चित्र आहेत गरूडाने दोन नागांना पकडून ठेवल्याच दृश्य या बुद्धमंदिरात धातूवर मोठ्या आकारात तयार केलेल आहे जस मीनाकाम कराव, तस बारीक बारीक सुदर नक्षीकाम सर्वत्र केलेल आढळत अनेक ठिकाणी रगीबेरगी काचा, मौल्यवान धातू, सोन्याचा मुलामा वापरलेला आहे इचनूइच सौंदर्यान भरलेला आहे याच पॅलेस व मदिराच्या परिसरात इतर बऱ्याच राजवशीय लोकाचे प्रासाद आहेत सर्वत्रच हरतऱ्हेची व नानाविध आकाराची झाड असलेल्या कुंड्या आहेत. स्वच्छता तर अपरपार आहे काही ठिकाणी छोटी छोटी कारजी आहेत. मार्बलचे चौथरे, त्यावर गोल व वरती निमुळते होत गेलेले आणि सोन्याचे अगरखे चढविलेले स्तूप, तसेच मदिराचे अनेक मजबूत, अजस्त्र खाब, त्यावर लाल रगाची व हिरवी किनार असलेली लाकडी छपरं व तीही एकावर एक ठेवलेली जणू काय केळीची ताजी पान उलटी एकावर एक रचलेली आहेत त्या छपराच्या वरच्या बाजूस डोकावणारे छोटे छोटे लाकडी सुळे आणि त्या इग्रजी 'व्ही' आकार तयार झालेल्या छपरामध्ये उच गोपुरासारखे सोनेरी मनोरे पाहताना देहभान हरपून जायला होते सर्वच दृश्य मोठं नयनमनोहर व वर्णनापलीकडच आहे अगदी नेमस्त मुद्रेन बसलेल्या एका सन्याशाचा पुतळा व अक्राळ-विक्राळ प्रचड आकाराचा द्वारपालाचा पुतळा लक्ष वेधून घेतात या राक्षसाच्या अगावरील कपड्यावरही बारीक नक्षीकाम केल आहे सन्याशाच्या बैठ्या पुतळ्याला तर चक्क भगव कापड शालीप्रमाणे लपेटल होत हा प्रकार

जरा धर्मप्रेमप्रदर्शनाचा वा भाबड्या समजुतीचा वाटला साईबाबा साधुसंताना त्याचे भगत लोक सोन्याचादीचे मुकुट अर्पण करतात तस वाटलं. साईबाबांनी आपल्या उभ्या आयुष्यात सोन्याचा मुकुट पाहिला नसेल, पण बुवापेक्षा त्याचे भगत लोकच जास्त सवाई असतात

या 'ग्रँड पॅलेस'च्या बाजूला एक वस्तुसग्रहालय आहे ते बघून कॅटीनमध्ये कॉफी प्यावयास गेलो. आणखी काही पॅलेसच्या आवारातील इमारती व बुद्धमदिरे बघून त्याचे काही फोटो घेतले. इथ कोरिअन लोक बरेच दिसले अर्थात ते ॲम्ब्रोजन सागितलं. अम्ब्रोज बरोबर सांगायचा की कोण चिनी आहे, कोण जपानी आहे, कोण कबोडियन, ब्रह्मी, थाय आहे. मी सर्वांना समाजवाद्याप्रमाणे समानच समजायचो पॅलेसच्या आवारातून बाहेर पडता पडता मार्ग वळून वळून मी त्या ग्रँड पॅलेसकड बघत होतो डोळ्यात साठविण कठीणच ! पण प्रज्ञाचक्षूही गुग होऊन जातात

मोटार वळवून जवळच 'चाऊफ्राया' या बँकॉकच्या जीवनदायी नदीच्या काठावर पोहोचलो ही नदी खूप मोठी आहे. होड्या, पडाव यातून तिच्यात बरीच वाहतूक चालू होती. या नदीच्या काठावर एका हॉटेलात जेवण घेतल. पीटर बरोबर असल्यान भाषेची अडचण आली नाही. नाहीतर आपल्याला न येणारी भाषा ही नेहमीच साहित्यशास्त्राइतकी दुर्बोध वाटते जेवणात आत्तापर्यंत न पाहिलेले काही पदार्थ होते मी गुमान खात होतो पीटरला तू हे काय मागविले आहेस, हे विचारायच्या भानगडीत पडलो नाही या ठिकाणी बोटिंगची व्यवस्था करून नदी किनाऱ्यावर वसलेल्या बँकॉकची काही ठिकाण पाहण्याची सोय केली होती, परतु वेळ नसल्याने थोडा वेळ त्या नदीकिनाऱ्यावर काढून रेल्वे स्टेशनचा मार्ग धरला.

रेशनची राग लवकर सरकेल, पण इथल्या मोटारींची रांग काही सरकताना दिसत नव्हती ऑटोरिक्षा, बसेस, मोटारी एकमेकाना चिकटून उभ्या असायच्या अस वाटायच की एकमेकावर आपटतात की काय ? वैतागून मीही एक दोनदा 'ठोक तिच्या आयला !' अस म्हणालो वाटेत थोडा वेळ चायना टाऊनमध्ये काढला मुबईच्या भेंडी बाजार, अब्दुल रहेमान स्ट्रीटप्रमाणे वातावरण वाटले. १९६२ पासूनच चिन्यानी मनात गूढतेचं वातावरण निर्माण केल आहे दुपारी एक वाजता स्टेशनवर पोहोचलो. पीटरला मनापासून धन्यवाद दिले आणि त्यानं देऊ केलेल्या मदतीबद्दल त्याच कौतुकही केल त्यान फारच परिश्रम घेतले दोन दिवस स्वत ची टोयोटा कार घेऊन तो आमच्या आदरातिथ्यासाठी झटत होता

त्यातून तो फारच मितभाषी होता हे त्यानं आमच्यासाठी का केल? कशासाठी केल? हे प्रश्न निर्माण होऊ लागले परतु असो! कथाकारांप्रमाणं भावनेला स्वैर सोडता येत नाही

दिवस कमी असल्यान इतर काही गोष्टी थायलडमध्ये बघता आल्या नाहीत दुपारी ३ वाजता पिनागची रेल्वे सुटणार होती दोन तासाचा अवधी होता व आरक्षणही होतं त्यामुळ चिता नव्हती. स्टेशनजवळच्या परिसरात भटकत बसलो कुठे जोडे विकत घे, तर कुठे वाईनची बाटली घ्या, तर कुठे फळं विकत घे अस करून वेळ काढीत होतो एका हॉटेलात चहा घेतला हॉटेलात सर्व स्त्रियाच होत्या चहा आणून देणारी मुलगी एवढी सुदर होती, की मी चक्रावून गेलो. फारच आकर्षक होती असं वाटल इथेच बसून एकावर एक अकरा कप चहा प्यावा!

स्टेशनवर आलो, तर गाडी उभीच होती आरक्षण असूनही जागा मिळेल की नाही, हा विचार मनात शिवलाही नाही बरोबर तीन वाजता गाडी बँकॉकच्या चाऊफ्रायापासून दूर जाऊ लागली, आणि बटरवर्थ पिनागचा रस्ता धरला या आरामदायिनी रेल्वेचा सुखकर कपिलाषष्ठीचा योग अनुभवीत प्रवास सुरू झाला दुसऱ्या दिवशी सकाळी ९॥ वा थायलड-मलेशिया सरहद्दीवरील ठिकाण आलं ते होते पेडागबसार गाडीतील सर्वजण लगबगीनं उतरून धावतच पासपोर्ट व व्हिसा तपासून घ्यायला व मलेशियात प्रवेश करीत असल्याचा परवाना घेण्यास गेले. मीही माझा पासपोर्ट-व्हिसा दाखविला; परतु इथल्या अधिकाऱ्यान मला त्याच्याबरोबर तिकीट दाखवा, अस सागितल मी मनात विचार केला की तिकीट म्हणजे रेल्वेच असणार मी ते सादर केल तसं तो म्हणाला, "हे तिकीट चालणार नाही एकतर विमानतिकीट सादर करा किंवा ५०० अमेरिकन डॉलर्सचे प्रवासी चेक्स दाखवा" त्याबरोबर धाबं दणाणल डोळ्यापुढे काजवे चमकू लागले कारण मी थायलंड प्रवासात धोका नको, म्हणून एअर तिकीट पिनागला घरीच ठेवल होत प्रवासी चेक्स माझ्याकडे होते पण ते फक्त २०० अमेरिकन डॉलर्सचे भारत सरकारने मला फक्त २७० अमेरिकन डॉलर्स दिले मी सर्व परिस्थिती त्या अधिकाऱ्याला समजावून सागितली पण तो ऐकायला तयार होईना तो मनात म्हणाला असेल, "खिशात दिडक्या नाहीत, आणि परदेशवारी करतोय"

शेवटी अम्ब्रोजला बोलावून आणून त्याला सर्व प्रकार सागितला तो अनुभवी होता लगबगीन तो स्थानकावर वरिष्ठ अधिकाऱ्याकडं आला आणि त्याला सर्व

जरा धर्मप्रेमप्रदर्शनाचा वा भाबड्या समजुतीचा वाटला. साईबाबा साधुसताना त्याचे भगत लोक सोन्याचादीचे मुकुट अर्पण करतात तस वाटल. साईबाबानी आपल्या उभ्या आयुष्यात सोन्याचा मुकुट पाहिला नसेल, पण बुवांपेक्षा त्यांचे भगत लोकच जास्त सवाई असतात

या 'ग्रँड पॅलेस'च्या बाजूला एक वस्तुसग्रहालय आहे ते बघून कँटीनमध्ये कॉफी प्यावयास गेलो. आणखी काही पॅलेसच्या आवारातील इमारती व बुद्धमदिरे बघून त्याचे काही फोटो घेतले. इथ कोरिअन लोक बरेच दिसले अर्थात ते ॲम्ब्रोजन सागितल. अम्ब्रोज बरोबर सागायचा की कोण चिनी आहे, कोण जपानी आहे, कोण कबोडियन, ब्रह्मी, थाय आहे मी सर्वांना समाजवाद्याप्रमाणे समानच समजायचो पॅलेसच्या आवारातून बाहेर पडता पडता माग वळून वळून मी त्या ग्रँड पॅलेसकड बघत होतो डोळ्यात साठविण कठीणच ! पण प्रज्ञाचक्षूही गुग होऊन जातात

मोटार वळवून जवळच 'चाऊफ्राया' या बँकॉकच्या जीवनदायी नदीच्या काठावर पोहोचलो ही नदी खूप मोठी आहे होड्या, पडाव यातून तिच्यात बरीच वाहतूक चालू होती या नदीच्या काठावर एका हॉटेलात जेवण घेतल पीटर बरोबर असल्यान भाषेची अडचण आली नाही नाहीतर आपल्याला न येणारी भाषा ही नेहमीच साहित्यशास्त्राइतकी दुर्बोध वाटते. जेवणात आत्तापर्यंत न पाहिलेले काही पदार्थ होते मी गुमान खात होतो पीटरला तू हे काय मागविले आहेस, हे विचारायच्या भानगडीत पडलो नाही या ठिकाणी बोटिंगची व्यवस्था करून नदी किनाऱ्यावर वसलेल्या बँकॉकची काही ठिकाण पाहण्याची सोय केली होती; परतु वेळ नसल्याने थोडा वेळ त्या नदीकिनाऱ्यावर काढून रेल्वे स्टेशनचा मार्ग धरला.

रेशनची राग लवकर सरकेल, पण इथल्या मोटारींची राग काही सरकताना दिसत नव्हती ऑटोरिक्षा, बसेस, मोटारी एकमेकाना चिकटून उभ्या असायच्या अस वाटायच की एकमेकावर आपटतात की काय ? वैतागून मीही एक दोनदा 'ठोक तिच्या आयला !' अस म्हणालो वाटेत थोडा वेळ चायना टाऊनमध्ये काढला मुबईच्या भेंडी बाजार, अब्दुल रहेमान स्ट्रीटप्रमाणे वातावरण वाटले. १९६२ पासूनच चिन्यानी मनात गूढतेच वातावरण निर्माण केल आहे. दुपारी एक वाजता स्टेशनवर पोहोचलो. पीटरला मनापासून धन्यवाद दिले आणि त्यान देऊ केलेल्या मदतीबद्दल त्याच कौतुकही केल त्यान फारच परिश्रम घेतले. दोन दिवस स्वत ची टोयोटा कार घेऊन तो आमच्या आदरातिथ्यासाठी झटत होता

त्यातून तो फारच मितभाषी होता. हे त्यान आमच्यासाठी का केलं? कशासाठी केल? हे प्रश्न निर्माण होऊ लागले. परतु असो! कथाकारांप्रमाण भावनेला स्वैर सोडता येता नाही

दिवस कमी असल्यान इतर काही गोष्टी थायलडमध्ये बघता आल्या नाहीत दुपारी ३ वाजता पिनागची रेल्वे सुटणार होती दोन तासाचा अवधी होता व आरक्षणही होत. त्यामुळ चिता नव्हती. स्टेशनजवळच्या परिसरात भटकत बसलो कुठे जोडे विकत घे, तर कुठे वाईनची बाटली घ्या, तर कुठे फळं विकत घे अस करून वेळ काढीत होतो एका हॉटेलात चहा घेतला हॉटेलात सर्व स्त्रियाच होत्या चहा आणून देणारी मुलगी एवढी सुदर होती, की मी चक्रावून गेलो फारच आकर्षक होती अस वाटलं इथेच बसून एकावर एक अकरा कप चहा प्यावा!

स्टेशनवर आलो, तर गाडी उभीच होती आरक्षण असूनही जागा मिळेल की नाही, हा विचार मनात शिवलाही नाही बरोबर तीन वाजता गाडी बॅकॉकच्या चाऊफ्रायापासून दूर जाऊ लागली, आणि बटरवर्थ पिनांगचा रस्ता धरला. या आरामदायिनी रेल्वेचा सुखकर कपिलाषष्ठीचा योग अनुभवीत प्रवास सुरू झाला दुसऱ्या दिवशी सकाळी ९॥ वा थायलंड -मलेशिया सरहद्दीवरील ठिकाण आल ते होते पेडागबसार गाडीतील सर्वजण लगबगीन उतरून धावतच पासपोर्ट व व्हिसा तपासून घ्यायला व मलेशियात प्रवेश करीत असल्याचा परवाना घेण्यास गेले मीही माझा पासपोर्ट -व्हिसा दाखविला, परतु इथल्या अधिकाऱ्यान मला त्याच्याबरोबर तिकीट दाखवा, अस सांगितल. मी मनात विचार केला की तिकीट म्हणजे रेल्वेच असणार. मी ते सादर केल तस तो म्हणाला, "हे तिकीट चालणार नाही. एकतर विमानतिकीट सादर करा किंवा ५०० अमेरिकन डॉलर्सचे प्रवासी चेक्स दाखवा." त्याबरोबर धाब दणाणल. डोळ्यापुढे काजवे चमकू लागले कारण मी थायलंड प्रवासात धोका नको, म्हणून एअर तिकीट पिनागला घरीच ठेवल होत. प्रवासी चेक्स माझ्याकडे होते पण ते फक्त २०० अमेरिकन डॉलर्सचे भारत सरकारने मला फक्त २७० अमेरिकन डॉलर्स दिले मी सर्व परिस्थिती त्या अधिकाऱ्याला समजावून सागितली पण तो ऐकायला तयार होईना तो मनात म्हणाला असेल, "खिशात दिडक्या नाहीत, आणि परदेशवारी करतोय."

शेवटी अम्ब्रोजला बोलावून आणून त्याला सर्व प्रकार सागितला तो अनुभवी होता. लगबगीन तो स्थानकावर वरिष्ठ अधिकाऱ्याकडं आला आणि त्याला सर्व

प्रकार सांगितला विमानतिकीट का बरोबर घेतले नाही, याचंही त्यानं चांगले स्पष्टीकरण दिलं व माझी लेखी हमीही त्यानं घेतली. त्या अधिकाऱ्याने सर्व शांतपणे ऐकून घेतलं व माझ्या पासपोर्टवर मलेशिया प्रवासाचा शिक्का मारून, पासपोर्ट मला परत दिला आम्ही सुटकेचा नि श्वास टाकला नाहीतर ॲम्ब्रोजला माझे तिकीट आणण्यासाठी पिनांगला जाऊन परत पेडांगबसारला यावं लागलं असतं व त्यात जवळजवळ संपूर्ण दिवस बरबाद झाला असता मनस्तापही झाला असता या स्टेशनवर तांदळाचा चोरटा व्यापार करणारेही बरेच होते या तांदळापासून केकसारखे पदार्थ चांगले बनवितात यावेळेस विशेष तपासणी झाली नाही फक्त थाय प्रवाशांवर कडक नजर असे दुपारी एक वाजता पिनांगला पोहोचलो. फेरीने पलीकडे गेलो ॲम्ब्रोजचा भाऊ विल्फ्रेड गाडी घेऊन आला होता घरी आल्यावर मनसोक्त आंघोळ व जेवण करून पटकन झोपी गेलो

**कौलालंपूर**

सायंकाळी पिनांगची डिपार्टमेंटल स्टोअर्स पाहण्यासाठी बाहेर पडलो कमाही दुपारी तिथं आला होता पिनांगच्या सुरेख इमारती पाहत पाहत चाललो होतो पिनांगचा कपडा बाजार पाहिला आपल्याकडे मंडईत दाटीवाटीने जशी दुकाने मांडलेली असतात तसाच प्रकार होता तिथून मुख्य रस्त्यावर येऊन तेथील काही इलेक्ट्रॉनिक्स व पादत्राणाची दुकानं व इतर काही दुकानं पाहिली. मी एक गॉगल व काही टी शर्टस खरेदी केले एक पावसाची मोठी सर येऊन गेली सरकत्या जिन्याची कसरत सावरत काही डिपार्टमेंटल स्टोअर्सना भेटी दिल्या सर्व प्रकारचा माल अत्यंत आकर्षकपणं मांडलेला होता प्रत्येक गोष्ट हवीहवीशी वाटत होती. परंतु अजून बराच प्रवास शिल्लक असल्यानं ॲम्ब्रोजने मला काही खरेदी करून दिले नाही तो म्हणाला की तू फक्त भारतात जायच्या आदल्या दिवशी काय ती खरेदी कर तो सल्ला फारच मोलाचा ठरला रात्री एका 'मले' हॉटेलवाल्याकडं परोठा व डालफ्राय हे जेवण घेतले या हॉटेलचा मालक मूळचा तामिळी होता

गाडी पिनांगच्या प्रसिद्ध रात्रीच्या बाजाराकडे वळविली प्रथम स्वादिष्ट चिनी चेसनट्स खाल्ले कमाने काही रंगीत चित्रे विकत घेतली. अशी त्यानं बरीच चित्रे स्वस्त भावाने खरेदी केली. जास्त भावानं पोर्ट डिक्सनला तो त्याची विक्री करणार होता हा किरकोळ व्यापार करतो ॲम्ब्रोजने मला डझनभर चॉपस्टिक्स विकत घेऊन दिल्या व म्हणाला या काड्यांनी खायला शिकलास तरच पुन्हा

मलेशियाला यायच. चिनी लोकाच त्याच्या खाण्याच्या पद्धतीवर अतीव प्रेम आहे या चिन्याना काय माहीत की आम्ही देखील अगोदर वरण-भात, त्यावर तुपाची धार व लिबाची मोट्ठी फोड असल्याशिवाय जेवण करीत नाही वऱ्हाडी व्यक्तीच जीवन वरणाशिवाय वैराण आहे बाजारात आणखी काही किरकोळ खरेदी केली रात्री १२ वाजता रमतगमत घरी परतलो आल्यावर प्रथम बॅगा भरल्या, कारण पिनाग प्रवास सपवून सकाळी १० वाजता कौलालपूरकडे मार्गक्रमण करावयाच होत व तिथून लगेच मलाक्काकड मार्गस्थ व्हायचं होत

सकाळी जरा उशिराच आघोळ, न्याहारी करून तयार झालो ॲम्ब्रोजच्या आईचा व भावाचा प्रेमळ निरोप घेतला. त्याच्या आईनं मला मुलाप्रमाणच ममतेन वागविल खायला रोज नवीन पदार्थ करून वाढत होती आम्ही बाहेरून येईपर्यंत आमची वाट पाहत थाबायची गप्पाही खूप मारीत होती एवढच नव्हे तर माझ्या कपड्याना इस्त्रीही करून ठेवीत होती तिचा निरोप घेताना फारच जड गेल मी तिला खाली वाकून नमस्कार केला तस तिन मला जवळ घेतल व बायको-मुलाना घेऊन पुन्हा एकदा पिनागला ये, अस वारवार बजावल

गाडी हळूहळू फाटकाच्या बाहेर पडली वाटेत पिनागच एक प्रसिद्ध बुद्धमदिर पाहावयास गेलो हे अगदी गावात असून बैठ्या पण मोठ्या इमारतीत आहे इथ बुद्धाची आडवी पडलेली व निद्रिस्त अशी मोठी मूर्ती आहे जसा विठ्ठल त्याच्या भक्ताना शेतात, मळ्यात किंवा नैवेद्य वगैरे खाताना दिसतो तद्वत येथील बुद्धभक्ताना बुद्ध हा झोपलेला, उभा, ध्यानस्थ, गंभीर, दु खी, समाधानी असा वेगवेगळ्या रूपात दिसतो या मूर्तीची लांबी अंदाजे १८ ते २० फूट असावी या मूर्तीखालील चौथराही फार मोठा आहे या चौथऱ्यावर आणि गाभाऱ्यातील भिंतींना काचेची कपाट केली आहेत यात पोर्सेलिनची अनेक भाडी किंवा फ्लॉवरपॉटसारखी भाडी ठेवली असून, त्यात आपल्या प्रिय व्यक्तीची रक्षा अनेकानी जतन करून ठेवली आहे हे बुद्धमदिर बघून आम्ही तडक रस्ता धरला. तो कौलालंपूरचा जाताना पिनांगचा प्रख्यात प्रचड खाडीपूल पार करून गेलो हा पूल फारच प्रेक्षणीय असा आहे वाटेत एक दोन ठिकाणी विश्राती घेत दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास कौलालपूरच्या जवळपास येऊ लागलो तर पावसाने मध्येच जोराचा तडाखा हाणला धोधाटा यावा तस झाल मुबईत ठिकठिकाणी सिग्नलपाशी गाडी थाबते तशी आमची गाडी नवा पूल आला भर टोल, नवीन रस्ता बांधून झालेला आहे, भर टोल, अस करीत करीत सायकाळी ५ वाजता

कौलालपूरला कमाच्या ब्लॉकवर पोहोचली तिथ थोडा आराम केला कमान यामची व केळ्याची भजी आणली व स्वत.च चहा बनविला. थोडा वेळ फिलीपाइन्समधली हॉटेल्स, बारमधील बायकांच्या जीवनावरील डॉक्युमेंटरी बघितली विकसनशील व मागास राष्ट्रांत एकंदर स्त्रीजीवन फारच खडतर वाटत

पुन्हा गाडी काढली, कारण पुढ मलाक्काला जायच होत वाटेत कौलालपूरला ॲम्ब्रोजचा एक तामीळ मित्र राहतो त्याच्याकडे गेलो. त्याचं नाव सुब्रा मूर्ती असून तो मूळचा मद्रासकडचा आहे त्याचा ट्रान्सपोर्टचा धदा होता घराशी गाडी उभी केली त्याचा भाऊ शेखरन् स्वागताला पुढ आला घरात कोचावर बसलो मद्रासमध्ये आल्याचा भास झाला. सर्वांचा मद्रासी रंग; घरात तिरुपती बालाजी, कार्तिकस्वामी, गुरुवायूरच्या श्रीकृष्णाचे फोटो, भारतीय पद्धतीप्रमाणच विणकाम केलेले काही वॉलपीसेस, टीपॉयवरील आच्छादन, घरात अजून भारतीयत्व टिकविल्याची साक्ष देत होते सर्वांशी ओळख होऊन, इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या मद्रासी कुडर्चा, साडगे याचे प्रकार, तादळापासून बनविलेले लाडू, त्यावर छानसी मद्रासी कॉफी यावर हात मारून तृप्त झालो या कुटुबाबरोबर एक फोटोही घेतला व टी.व्ही पाहत बसलो टी व्ही वर कुठलासा तामीळ सिनेमा चालू होता इथले तामीळ लोक झपाटल्यागत तामीळ चित्रपट व नृत्य बघतात हे कुटुंब पिढ्यान्‌पिढ्या मलेशियात राहात आहे दहा मिनिटात सुब्रा आला व म्हणाला, ''चला जेवायला।''

मी म्हटलं, ''एवढ्या लवकर ? अन् आत्ताच तर एवढं खाण झाल आहे।''

''ओह ! नो ! बस्स् ! थँक्यू !'' अशी नाटकी भाषाही जमत नाही, त्यामुळ मी मुकाट्यान उठलो व जेवायला टेबलावर जाऊन बसलो. जेवण बनवतील, ही काहीच कल्पना नव्हती जेवण उत्कृष्टच होत. पाढरा भात, रसम्, फ्लॉवरची भाजी, तळलेला पापड, कोशिबीर, पायसम् असे विविध प्रकार होते जेवण झाल्यावर लवग -वेलदोडाही मिळाला त्यान फार समाधान वाटल जेवण झाल्यावर दोघे भाऊ स्पोर्टस्‌बद्दल गप्पा मारीत होते मात्र त्याना क्रिकेटमध्ये रस नव्हता भारतातील नामाकित क्रिकेट खेळाडू त्याना माहीत नव्हते. जरा वेळाने त्या सर्व कुटुबाचा प्रेमळ निरोप घेऊन, मलाक्काचा मार्ग धरला

# पूर्वेकडील गोवा – मलाक्का

गाडी ताशी १२० कि मी वेगाने धावत होती रस्ता, उत्तम, मोठा व तीन पदरी होता ट्रक्सनी होणारी वाहतूक वेगळ्या पट्ट्यातून होई. ठिकठिकाणी काही मीटर्सवर व किलोमीटर्सवर अनुक्रमे टेलिफोन व टॉयलेटची सोय होती सुमारे दोन तासात आम्ही मलाक्काला पोहोचलो तेव्हा रात्रीचे साडे अकरा वाजले होते गावात शुकशुकाट होता. गावाच सुरुवातीचं दर्शनच ऐतिहासिक स्वरूपाचं वाटल

मलाक्का हे एक प्राचीन शहर असून, मलाक्काची सामुद्रधुनी प्रसिद्ध आहे हे पश्चिम किनाऱ्यावरील एक महत्त्वाच बदर असून, त्याला ऐतिहासिक महत्त्वही फार आहे चौदाव्या व पधराव्या शतकात इथ मुसलमानानी अमल स्थापन केला. त्यानतर डच, पोर्तुगीज व नतर इंग्रज आले त्याच्या सत्ताही तिथ निर्माण झाल्या अजूनही काही डच व पोर्तुगीज अवशेष इथं पहावयास सापडतात.

एका प्रशस्त, मजबूत आणि मोठं कुपण असलेल्या इमारतीशी आम्ही पोहोचलो. कुपणाच्या आत काही झाडही लावली होती पिवळ्या रगाची इमारत होती फाटकाचं दारही मजबूत लोखडी होतं. मी स्वत· कधी पोर्तुगीज – कालीन किंवा नंतरचं गोवा पाह्यल नाही, पण ही वास्तू पाहिल्यावर मला गोव्याची आठवण झाली गोवा पाहिलं ते अलीकडच सिमेंट युगातल. प्रथमदर्शनीच ही इमारत फार जुनी असावी, असे वाटत होते. बाधणीवरूनही ती पोर्तुगीज बनावटीची वाटत होती शाळांना सुट्टी असल्यान शाळेत कोणी नव्हत ॲम्ब्रोजनं स्वत-कडील चावीन फाटकाचे कुलूप उघडलं गाडी आत नेऊन, पोर्चमध्ये उभी केली उतरून आजूबाजूला बघतो, तर 'सी' आकाराची आधुनिक तीन मजली भलीमोठ्ठी इमारत होती या चोहोकारात सिमेंटचं एक मोठं मैदानच होत याच्याशिवाय या नवीन इमारतीच्यामागे खूपच विस्तीर्ण फुटबॉल मैदान आहे, अस ॲम्ब्रोजनं सांगितलं. एकंदर स्वरूपावरूनच शाळा बरीच मोठी, जुनी अन् नावाजलेली वाटत होती शाळेच्या आवारात काही ठिकाणी शीतपेयं देणारी रंगीत यत्रं ठेवली होती पहिल्या

मजल्यावर निवासस्थान होत सामान घेऊन, प्रशस्त, मोठे व पाढऱ्या रगाचे कठडे असलेला जिना चढून वर गेलो समोरच्या लहानशा चौकात एका चबुतऱ्यावर एका ख्रिश्चन धर्मगुरूचा अर्धपुतळा होता डाव्या हाताला मागेही काही धर्मगुरू व शाळाचालकांचे पुतळे व काही फोटो होते त्याच्या - जवळच बऱ्यापैकी मोठ प्रार्थनास्थळ म्हणजे चर्चसारखी जागा होती त्याच्या - समोरच आमची राहण्याची जागा होती कुलूप उघडून आत गेलो. एक व्हराडा होता. त्याच्या उजव्या बाजूला स्वयपाकघर असून, उजव्या हाताला असलेल्या कॉरिडॉरमधून चालत चालत एका मोठ्या हॉलमधून आमच्या खोल्याकडे आलो समोरासमोर अशा आठ खोल्या होत्या पहिल्या खोलीत ॲम्ब्रोजचा मुक्काम असायचा सर्वत्र लाकूडकाम मोठ्या प्रमाणावर होत कॉरिडॉरलाही लाकडी कठडे असून, सगळीकडे जमीनही लाकडी होती फर्निचर तर डोळ्याना सुख देणार होत

माझी खोली उघडून दिली खोली लाब व मोठी असून, दोन मऊ गाद्याचे दिवाण, दोन मोठी कपाट, लेखन-टेबल, खुर्ची, भरपूर हवा येण्यासाठी मोठ्या खिडक्या, पखे, डासासाठी गुड नाइट इत्यादी सोयी असून, सडास -बाथरूम स्वतत्र होत. गरम पाण्यासाठी व गार पाण्यासाठी शॉवर्स, कपडे धुलाई यत्र, अगाचा व कपड्याचा भरपूर साबण आदी सुविधा इथ होत्या सामान खोलीत टाकून, स्वयपाकघरात चहा पिण्यासाठी गेलो स्वयंपाकघर म्हणजे सर्व सुखसोयींनी युक्त अशी मोठी खोलीच होती त्यात स्वयपाकाची व भाडी धुवायची जागा वेगळी व खाण्यापिण्यासाठी खोली वेगळी होती फ्रीज, मिक्सर, कुकिंग गॅस, हॉट वॉटर जग, इलेक्ट्रिकच्या किटल्या, ओव्हन, वॉटर फिल्टर, काटे, चमचे, सुऱ्या, मोठ्ठ गोल टेबल व त्या टेबलाच्या आत सहा इंच वर असं आणखी एक मोठ्ठ्या टेबलाहून दोन फुटानी अरुद अस गोल फिरतं टेबल होत त्यावर सर्व पदार्थ ठेवलेले असायचे येथे वाढण्याची पद्धत कोठेच नसल्याने, जेवताना सर्व पदार्थ आपणच आपल्या हातान घ्यायचे असतात ते लहान गोल टेबल हाताने फिरवून, आपल्याला हवा तो पदार्थ घ्यायचा असतो जेवणाच्या खोलीच्या बाहेर मोठा प्रशस्त दिवाणखाना असून, तिथं बरेच कोच, आरामखुर्च्या व वाचनाच भरपूर साहित्य होत या दिवाणखान्याला लागून आणखी एक खोली असून, तिथे टी.व्ही., व्ही सी आर व मोठा रेडिओ ठेवला होता. एक लहानसा दारूचा बारही होता दारूच्या सुरेख बाटल्या व्यवस्थित माडल्या होत्या टी व्ही पाहायला आरामशीर कोच होते. भिंतीवर सुरेख चित्रं लावलेली असून, खिडक्याना उत्तम

पडदे होते सर्वच वातावरण मोठ मोहक होत कॉरिडॉरमध्ये टेलिफोन होता ॲम्ब्रोजचे कसे आभार मानावेत तेच कळेना. गुड नाइट व पखा सुरू करून झोपी गेलो

ज्या ठिकाणी मी उतरलो होतो; त्या सस्थेचे नाव आहे- सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूशन, मलाक्का

सकाळी उशिराच उठलो ॲम्ब्रोजने चहा व न्याहारी तयारच ठेवली होती. आघोळ करून गावातून एक फेरफटका मारून आलो पिनाग, थायलडमध्ये जे फोटो काढले होते, ते रोल धुवायला दिले काही ऐतिहासिक स्थळंही बघितली. इथल एक पोर्तुगीज चर्च पाहण्यालायक आहे त्याला उच गॉथिक पद्धतीचे टॉवर्स आहेत

'फोर्मोसा' या नावाने प्रसिद्ध असलेल्या एका मध्ययुगीन किल्ल्यावर गेलो हा किल्लाही पोर्तुगीजाचा आहे ज्यानी महाराष्ट्रात व इतर प्रांती असलेले किल्ले पाहिले असतील, त्यांना हा किल्ला अगदीच किरकोळ वाटेल, परतु एका काळी या किल्ल्याला फार महत्त्व होत. समुद्राजवळच हा किल्ला आहे सतराव्या शतकात डचाच्या हल्ल्यात या किल्ल्याची बरीच पडझड झाली सध्या या किल्ल्याचे प्रवेशद्वार व वरती काही चर्चच्या भिंतीचे अवशेष बाकी आहेत मात्र वरून आजूबाजूचा परिसर फार रम्य दिसतो.

या किल्ल्याच्या समोरच मलाक्काचा प्रसिद्ध 'इडिपेंडन्स हॉल' आहे स्वातत्र्य चळवळीच्या स्मरणार्थ हा हॉल आज उभा आहे या हॉलची उभारणी मात्र १९१२ साली झाली आहे. मलेशियात स्वातत्र्यप्राप्तीसाठी जे झगडे व संघर्ष झाले, त्याचा सचित्र इतिहास या ठिकाणी बघावयास मिळतो तसच कागदपत्रं, नकाशे, तहाचे मसुदे, सभाची इतिवृत्त, महत्त्वाची छायाचित्र याच जतन या हॉलमध्ये केल असून, एका दालनात व्ही डी ओ वर हा इतिहास दाखविलाही जातो या म्युझियममध्ये सर्वत्र उत्तम गालिचे व छान प्रकाशयोजना असून, स्वच्छताही खूप आहे.

इथून जवळच असलेल्या बुदाया म्युझियममध्ये गेलो लाबूनच ही वास्तू लक्ष वेधून घेत होती मलेशियन वास्तुशिल्पाचा तो एक उत्तम नमुना ठरावा म्युझियमभोवती लहानलहान झाडं, फुलझाड होती १ मलेशियन डॉलर्सच तिकीट घेऊन आत गेलो, पण आत जाण्याअगोदर एक प्लॅस्टिकची पिशवी देण्यात येऊन, त्यात पादत्राण ठेवण्यास सागण्यात आल त्यामुळे बूट त्या पिशवीत घालून, ती पिशवी घेऊनच मी म्युझियम पाहायला गेलो सर्वच म्युझियम लाकडी होत

अनेक कलाकुसर केलेल्या वस्तू, मूर्ती, याबरोबर काही जुने पारंपरिक पोशाखही ठेवले होते काही मूर्ती, वस्तू व तैलचित्रं तर फारच लाजवाब होती काही ऐतिहासिक प्रसगही चित्रित केले होते एका प्रसगात राम, लक्ष्मण, सीता याच्याही मूर्ती दिसल्या. अर्थात स्वरूप भारतीय नव्हत काही कलाकारानी बनविलेली काष्ठशिल्पही मनोवेधक आहेत. मलेशियाच्या मध्ययुगीन काळापासून ते स्वातत्र्यकाळाची माहिती सांगणार दालन तिथ होत दालनात अधार असून, माहिती सांगणारी चित्र काच व ट्यूबलाइटच्या माध्यमातून अधिक प्रकर्षाने दिसत होती पोलिस बदोबस्त बराच होता, कारण एक बडा सरकारी इसम हे म्युझियम पाहायला आला होता तोही याच दालनात सर्व माहिती घेत होता बरेच पर्यटक हे म्युझियम पाहायला येतात बाहेर येताना इथली काही विविध वस्तू दुकाने पाहिली. बाहेर पडणार तेवढ्यात एका पुस्तकविक्रेत्यानं एक तरी पुस्तक विकत घ्या म्हणून मागं टुमण लावल, परतु माझी इच्छा नव्हती त्याच्या समाधानासाठी कॅटलॉगवरून नजर फिरविली व एक प्राचीन इतिहासाच पुस्तक मागितल. ते त्याच्याकड नसणार याची मला खात्री असल्यान, ते नसल्याच त्यान विषादान सागितलं व माझी सुटका झाली बाहेर आल्यावर ही वास्तू पुन्हा डोळे भरून पाहिली बरेच फोटो घेतले ही 'बुदाया' म्युझियमची इमारत लाब, लाकडी व लाल रगाची आहे पत्त्याचे बगले करताना पत्ते एकावर एक ठेवावेत, तशी याला काळपट लाल रंगाच्या कौलाच्या उतरंडी आहेत ही लांब, उतरती कौलारू छपर सरळ व आडव्या पद्धतीन ठेवली आहेत या छपराच्या आघाडीला वरती एक लाकडी तुरा आहे ब्रिटनमधील घराप्रमाणं ही छपर खालीवर पसरलेली होती. हे म्युझियम म्हणजे अगोदर मलाक्काच्या सुलतानाचा एक महाल होता

इथून समोरच असलेल्या 'पडाग पहलावान' या मोठ्या, हिरव्यागार विस्तीर्ण मैदानावर आलो या मैदानाला 'बदर हिलीर' पार्क म्हणतात इथ एक नमुनेदार बैलगाडी एका मले डॉलरला घेऊन या पार्कमधून फेरफटका मारून आणते आपल्याकडील छकड्यासारखी असते मात्र चाकं मोठी असतात व वरती वरून उचललेलं व मागे खाली उतरतं होत गेलेल आणि पाढऱ्या रगाच, रगीत किनारीच छत होत. बैलगाडीलाही रगरगोटी केलेली होती बैलही पाढरे शुभ्र व भक्कम होते हिरव्यागार मैदानावर ही बैलगाडी फारच खुलून दिसत होती

दुपारी जेवायच्या वेळेला सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूटमध्ये परत आलो जेवण बनवून द्यायला एक लठ्ठ चिनी अन्नपूर्णा येत असे सायकाळचही भोजन सकाळीच

बनवून ठेवून जाई जेवायला भाताबरोबर, फिश असायचच. चिनी माणसाच काळीज म्हणजे सूप असायचच कधी चिकन, तर कधी मटण असायचे जेवण झाल्यावर वेलची केळी किंवा खास मलाक्काचे आंबे खात असू.

जेवायला आमच्याबरोबर रॉबर्ट नावाचा आयरीश म्हातारा असायचा वय सत्तरीच्या आसपास होत. काहीसा ठेंगणा, पण मजबूत बांध्याचा असून, सतत कुठल्यातरी तद्रीत असणारा व त्याला पाहिल्यावर थोडा धाक निर्माण होईल, अशा चेहऱ्याचा होता सेंट फ्रान्सिसमध्ये यान बराच काळ नोकरी केली होती. व सध्या एका मुलांच्या हॉस्टेलचा व्यवस्थापक म्हणून काम बघत आहे. जेवायला व झोपायला हा सेंट फ्रान्सिसमध्ये यायचा त्याची जुनी ऑस्टिन गाडी होती हा बोलताना लहान, हलक्या आवाजात व एकसुरी अन् खास आयरिश इंग्लिश बोलायचा त्यामुळ याच बोलण माझ्या समजण्याच्या पलीकडच होत मी फक्त 'Yes', 'No' करून त्याला बोलका ठेवीत होतो ॲम्ब्रोज म्हणतो की त्यालाही सुरुवातीला त्याचे बोलणे समजणे कठीण जात होते. सरळ नाक, पिंगट डोळे व करारी मुद्रा बघून, हा मनुष्य फारसा कोणाच्यात मिसळत नसावा, असा ग्रह होत होता तो हसताना, फक्त त्याचे डोळे हसायचे जेव्हा जपानने सिंगापूर व मलायावर दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी हल्ला केला, तेव्हा तो मलायात होता या युद्धाच्या आठवणी निघाल्या, म्हणजे हा मनुष्य नुसता खुलून जायचा व धबधब्याप्रमाणे बोलायचा आमचा कोकणचा भाऊ त्याच्या भागाबद्दल, ज्या आत्मीयतेने सागतो तस ! या रॉबर्टला कोकणातला आबा फार आवडतो

मलाक्काच्या हवेत फारच सुस्ती व झोपेची झापड यायची. अस वाटायच की दिवसभर पख्याखाली नुसत पडून राहावं मलेशियाच्या इतर भागापेक्षाही मलाक्का फारच उष्ण व दमट वाटल

सायकाळी गावात पायीच फिरायला गेलो गावावरील मध्ययुगीन छाप अद्याप पुसली गेली नव्हती. ज्याला आपण नव्या काळातील झळाळी व चकाकी म्हणतो ती गावावर अजिबात नव्हती तामिळनाडूमधील मदुराई किंवा गोव्याच्या म्हापशाप्रमाण भासमान होत होत. बऱ्याच डच व पोर्तुगीज खाणाखुणा होत्या वातावरणात चैतन्यशीलता नव्हती.

सकाळीच कॅमेरा रोल धुवायला दिले होते ते आणायचे होते म्हणून बेंदहरा मार्गावरील एका दुकानात गेलो हे दुकान प्रसिद्ध असून, इथं सर्व प्रकारच फोटोग्राफी साहित्य व जनरल स्टोअरप्रमाणं अनेक वस्तू मिळत असत हे दुकान एका चिन्याच

होत इथ फोटोग्राफीसबधी सर्व काम बघणारी चिनी मुलगी फारच सुदर व नितळ कांतीची होती मुख्य म्हणजे तिचे डोळे चिन्याप्रमाणे बारीक नव्हते तिने हसून स्वागत केल्यावर बर वाटल पावती दिल्यावर तत्परतेन फोटो काढून दिले पैसे दिल्यावर पुन्हा एकदा गोड हसून थँक्यू म्हणाली इथ एक स्लाईडस् रोल विकत घेतला. बरेच स्वस्त रोल मिळतात मलेशियात सर्वत्रच हा अनुभव आला, की आपण एखादी वस्तू घेतली किंवा पैसे दिले, तर तिथले सेल्समेन 'थँक्यू' म्हणणारच.

सायकाळी समुद्रकिनारी फिरून आलो. जेवण करून, इथल्या 'पोर्तुगीज स्क्वेअर' मध्ये एक 'पारपरिक नृत्याचा कार्यक्रम बघावयास गेलो मलाक्कात आल्यावर हा 'डान्स शो' पाहावयासच हवा, असा सकेत आहे दर शनिवारी रात्री ८ ३० वाजता हा कार्यक्रम पार्तुगीज स्क्वेअरमध्ये होतो ॲम्ब्रोजने गाडी काढली व तिकड वळविली तीन मलेशियन डॉलर्सची तिकिट काढून आत गेलो गोऱ्या पर्यटकाची आत बरीच गर्दी होती तरी पण स्टेजपासून जवळ एका गोल टेबलाजवळ बसायला चागली जागा मिळाली कार्यक्रम हॉलमध्ये नसून, मोकळ्या हवेत व जागेत होता मात्र बाजून भिती होत्या हा खेळ पाहायला आल्यावर काहीतरी खाद्य किंवा पेय मागविले पाहिजे, असा तिथला नियम असल्यामुळ कॉफीची ऑर्डर दिली

कडक कॉफीचे घुटके घेत असतानाच, समोर स्टेजवर नृत्यप्रकाराना सुरुवात झाली. स्टेजच्या मागे चार-पाच वादक बसले होते प्रथम निवेदकान सर्वांच स्वागत व थोडक्यात प्रास्ताविक केल पहिला नृत्यप्रकार पोर्तुगीज पद्धतीचा होता मलाक्कात अद्याप बरेच पोर्तुगीजवंशीय लोक राहतात त्यातील बरेच तरुण-तरुणी हे नृत्यप्रकार करून दाखविण्यात वाकबगार आहेत पोर्तुगीज नृत्य विशिष्ट लयीत व ठेक्यात चालले होते. निरनिराळ्या रगीत दिव्याचा प्रकाश व नृत्यकारानी एकमेकाच्या कमरेत हात घालून धरलेला फेर फारच रगला होता या पोर्तुगीज नृत्याच्या वेळचा सगीताचा बाज काही कळत नव्हता, पण नकळत तो कुठेतरी राजकपूरच्या चित्रपटांतील काही गाण्याच्या सुरावटीशी नात सागत होता आवारा, श्री ४२०, सगम या चित्रपटांतील मधुर गाण्याची आठवण झाली.

अनेक युवक-युवती या लोकनृत्यात सामील झाले होते केवळ पोर्तुगीज पद्धतीची नव्हे, तर भारतीय, मलेशियन, जपानी, इंडोनेशियन पद्धतीचीही नृत्य झाली. एका तामीळ मुलीनं झकास भरतनाट्यम् नृत्य सादर केले तिथ बरेच फोटो घेतले एक तास फार मजेत गेला आजूबाजूच जग विसरण म्हणजे काय

असतं, हे इथं अनुभवलं! सर्वच प्रेक्षक आनंदानं धुंद झाले होते कॅमेऱ्याची एकच क्लीकमार चालू होती. रात्री जरा उशिरा सेंट फ्रान्सिसवर पोहोचलो नंतर कमा व त्याचा एक सॅम्युएल नावाचा मित्र हेही तिथं आले सॅम्युएल हा धावपटू होता

पहाटेपासून 'मलाक्का मॅरेथॉन' शर्यतीला प्रारंभ होणार होता. या मॅरेथॉनमध्ये सॅम्युएल धावणार होता मी मात्र सकाळी उशिराच उठलो सॅम्युएल शर्यतीत धावूनही आला होता कार्यक्रम समोरच्या मैदानावर होता गर्दीही होती सर्व आटोपून मैदानावर गेलो. सॅम्युएल तिथं उभा होता काही सांस्कृतिक कार्यक्रम तिथं एका स्टेजवर चालले होते व मलाक्काच्या महापौराच्या हस्ते बक्षीस समारंभ होणार होता हवा अत्यंत कुंद असून, बारीक पाऊसही पडत होता उभ्याउभ्याच कार्यक्रमही पाहात होतो व सॅम्युएलशी बोलत होतो हा सॅम्युएल मूळचा तामिळीच आहे त्याची चेहरेपट्टीही खास तामिळीच होती त्याने माझ्या आवडीचे खेळ विचारले. म्हटलं मला क्रिकेट, लॉन टेनिस व बिलियर्डस् हे खेळ आवडतात. मलेशियात फुटबॉल, बॅडमिंटन, कराटे हे खेळ प्रसिद्ध आहेत त्याच्या बोलण्यावरून क्रिकेटबद्दल बरीच अरुची या देशात दिसली हा सॅम्युएल घरात तामीळच बोलतो

दुपारी जेवण करून सिंगापूरला जायचे होते चार दिवस राहण्यापुरते कपडे बॅगेत भरले. नंतर ॲम्ब्रोज, कमा, सॅम्युएलबरोबर एका तामीळ माणसाच्या हॉटेलात जेवायला गेलो हॉटेल अगदीच साधे होते असे वाटायचे की भारतातल्या आपल्या एखाद्या गावातच जेवण घेत आहोत मद्रासी अण्णाचा सगळा घरगुती कारभार होता. तो स्वतः, त्याची बायको व मुलगी हे तिघेच त्या हॉटेलचा सर्व व्यवहार सांभाळीत जेवण मात्र केळीच्या पानावर वाढलं होत जेवायला भात, रसम्, कच्च्या केळ्याची भाजी, चटणी, पापड, कोशिंबीर व एक मोठ्ठं पापलेट एवढे पदार्थ भरपूर होते जेवणाचे पैसेही खूपच कमी घेतले ते पाहूनही मी चाटच झालो कमाच्या गाडीतून सॅम्युएल व तो दोघेही पोर्ट डिक्सनकडे रवाना झाले आणि मी व अम्ब्रोज सिंगापूरकडे मार्गस्थ झालो गाडी सिंगापूरच्या दिशेने सुसाट धावू लागली.

मलाक्काच्या प्रांताला गोव्याची उपमा देतात चोहोकडे हिरवीगार डोलणारी भातशेतं, पामचे मळे, नारळाची झाडं व त्यात एखाद्या रखवालदाराप्रमाणे भासणारी ग्रामीण मलेशियातील लाकडी उंच घर, या उष्ण हवेतही मनाची प्रसन्नता वाढवीत होती चोहोवार नजर फेकावी, तर हिरवी मखमल दृष्टीस यावी इथल्या लोकांना

मलाक्का हे गोव्याप्रमाण वाटत. अर्थात मला मलाक्कापेक्षा गोवा अनेक पटींनी सरस वाटलं गोव्याची सर मलाक्काला नाही

मात्र गोवा व मलाक्का याच्यात एक धार्मिकतेचा धागा फारच चिवट आहे मलाक्का व गोवा म्हणजे अनुक्रमे एक पश्चिमेकडील व एक पूर्वेकडील ख्रिश्चनाची मक्का, काशी समजले जाते येथील ख्रिश्चनाची तशीच समजूत आहे मलेशियात कॅथॉलिक ख्रिस्ती बरेच आहेत


धार्मिक धागा फार घट्ट आहे, तो अशा कारणाने की प्रसिद्ध ख्रिस्ती सत फ्रान्सिस झेवियर हा इ.स १५५३ च्या सुमारास चीनमध्ये मरण पावला. त्याला काही काळ मलाक्काच्या सेंट पॉल चर्चमध्ये ठेवण्यात आले. त्यानतर त्याचे शव पुन्हा बाहेर काढण्यात आल व ते गोव्यात नेऊन ठेवण्यात आल. हा सेंट फ्रान्सिस झेवियर मृत्यू पावला चीनमध्ये व मृत्यूनतर त्याने चीनपासून ते गोव्यापर्यंत प्रवास केला डॉ अब्राहम कोवूर यानी या प्रकरणाची बरीच माहिती त्याच्या 'बुवाबाजी हटाव' या पुस्तकात दिली आहे अर्थात 'बुवाबाजी हटाव' हे नाव मराठी अनुवादित पुस्तकाचे आहे मूळ पुस्तक इग्रजी आहे कॅथलिकांना मलाक्काप्रमाणेच गोव्याबद्दलही आस्था आहे

गाडी सतत १०० / ११० कि मी ताशी या वेगाने धावत होती प्रसिद्ध 'मुआ' नदी पार करून, एका शहरात विश्रातासाठी थाबलो चहा व केक यांवर दुपारची भूक भागविली हॉटेलच्या बाहेर एका हातगाडीवर दोन -तीन प्रकारच्या हिरव्या भाज्या विकायला ठेवल्या होत्या त्यातील दोन कुठल्याशा भाज्या ॲम्ब्रोजन त्याच्या सिगापूरमधील बहिणीसाठी घेतल्या सिंगापूरमध्ये हिरव्या भाज्याची म्हणे बरीच कमतरता असते सिंगापूरला ॲम्ब्रोजच्या बहिणीकड उतरणार होतो

गाडीन पुन्हा सिंगापूरचा रोख धरला. निरनिराळ्या विषयावर गप्पा मारण, चौकशा करण, तर कुठे जुन्या हिंदी गाण्याच्या कॅसेटस् लावून ऐकत बसण, अस चाललं होत गरम हवा व सतत वेगाने गाडी चालविल्यामुळे ॲम्ब्रोजही जरा सुस्तावलाच होता रस्ताही मोकळा होता ताशी १२० कि मी नं गाडी धावू लागली गाडीही डाव्या बाजूऐवजी जरा मधूनच धावू लागली समोरच काळपट निळा रस्ता दिसत होता तेवढ्यात समोरून येणाऱ्या एक मोटारीन आपले डोळे वटारले त्याबरोबर आम्ही भानावर आलो रस्त्याच्याच रगाची एका मोटार समोरून येत होती ती रस्त्याच्या रगाशी एकजीव झाल्यामुळे म्हणा किंवा आमच्या डोळ्यावर जरा झापड आल्यामुळे म्हणा, आम्हाला पटकन ती मोटार दिसलीच नाही त्या

मोटारने योग्य वेळी हेडलाइटस् सोडून, आम्हाला ताळ्यावर आणले. गाडीचा वेग कमी करून, ती पुन्हा डाव्या बाजूला घेतली

**जोहोरबारू** – हे मलेशिया - सिंगापूर सरहद्दीवरील महत्त्वाचं व मोठ शहर आहे हे शहर सोडल की मलेशिया सोडून, आपण सिंगापूरच्या हद्दीत प्रवेश करतो या जोहोरबारूला ॲम्ब्रोजचे दोन सख्खे भाऊ राहतात ते एकाच घरात आपल्या कुटुबासमवेत राहतात त्याच्याकड प्रथम जावयाच होते जोहोरबारू जसजस जवळ येऊ लागल, तसातसा हिरवागार निसर्गही दडी मारू लागला. सायकाळी ५ ३० वाजता जोहोरबारूला ॲम्ब्रोजच्या भावाच्या घरी पोहोचलो त्या घरीही उत्तम स्वागत झाल थोड्या आरामाचा व सुग्रास जेवणाचा लाभ घेऊन, सिंगापूरकडे निघालो जाताना ॲम्ब्रोजने स्वत ची गाडी त्याच्या भावाच्या बंगल्याच्या आवारात ठेवून दिली त्याच्या भावानी त्याची गाडी व ड्रायव्हर आम्हाला सिंगापूरला पोहोचविण्यासाठी दिले कारण एकतर रात्रीचे आठ वाजले होते व सिगापूरचे वाहतूक नियम अतिशय कडक असून, आम्हास तेथील रस्त्याची माहिती नव्हती. म्हणून हा ड्रायव्हर बरोबर दिला व तो चागला अनुभवी होता



ग्रँड पॅलेस

७९२
२८३५६

मलाक्का हे गोव्याप्रमाण वाटत अर्थात मला मलाक्कापेक्षा गोवा अनेक पटींनी सरस वाटल गोव्याची सर मलाक्काला नाही.

मात्र गोवा व मलाक्का याच्यात एक धार्मिकतेचा धागा फारच चिवट आहे मलाक्का व गोवा म्हणजे अनुक्रमे एक पश्चिमेकडील व एक पूर्वेकडील ख्रिश्चनांची मक्का, काशी समजले जाते येथील ख्रिश्चनाची तशीच समजूत आहे मलेशियात कॅथॉलिक ख्रिस्ती बरेच आहेत

धार्मिक धागा फार घट्ट आहे, तो अशा कारणाने की प्रसिद्ध ख्रिस्ती संत फ्रान्सिस झेवियर हा इ स.१५५३ च्या सुमारास चीनमध्ये मरण पावला त्याला काही काळ मलाक्काच्या सेंट पॉल चर्चमध्ये ठेवण्यात आले त्यानतर त्याचे शव पुन्हा बाहेर काढण्यात आलं व ते गोव्यात नेऊन ठेवण्यात आलं. हा सेंट फ्रान्सिस झेवियर मृत्यू पावला चीनमध्ये व मृत्यूनतर त्याने चीनपासून ते गोव्यापर्यंत प्रवास केला डॉ अब्राहम कोवूर यानी या प्रकरणाची बरीच माहिती त्यांच्या 'बुवाबाजी हटाव' या पुस्तकात दिली आहे अर्थात 'बुवाबाजी हटाव' हे नाव मराठी अनुवादित पुस्तकाचे आहे मूळ पुस्तक इग्रजी आहे कॅथलिकांना मलाक्काप्रमाणेच गोव्याबद्दलही आस्था आहे

गाडी सतत १०० / ११० कि मी ताशी या वेगाने धावत होती प्रसिद्ध 'मुआ' नदी पार करून, एका शहरात विश्रातासाठी थाबलो चहा व केक यावर दुपारची भूक भागविली हॉटेलच्या बाहेर एका हातगाडीवर दोन -तीन प्रकारच्या हिरव्या भाज्या विकायला ठेवल्या होत्या. त्यातील दोन कुठल्याशा भाज्या ॲम्ब्रोजन त्याच्या सिंगापूरमधील बहिणीसाठी घेतल्या सिंगापूरमध्ये हिरव्या भाज्यांची बरीच कमतरता असते सिंगापूरला ॲम्ब्रोजच्या बहिणीकडं उतरणार होतो

गाडीन पुन्हा सिगापूरचा रोख धरला. निरनिराळ्या विषयांवर गप्पा मारणं, चौकशा करण, तर कुठे जुन्या हिंदी गाण्याच्या कॅसेटस् लावून ऐकत बसणं, असं चाललं होत गरम हवा व सतत वेगाने गाडी चालविल्यामुळे ॲम्ब्रोजही जरा सुस्तावलाच होता रस्ताही मोकळा होता ताशी १२० कि मी न गाडी धावू लागली गाडीही डाव्या बाजूऐवजी जरा मधूनच धावू लागली. समोरच काळपट निळा रस्ता दिसत होता. तेवढ्यात समोरून येणाऱ्या एक मोटारीन आपले डोळे वटारले. त्याबरोबर आम्ही भानावर आलो. रस्त्याच्याच रगाची एका मोटार समोरून येत होती ती रस्त्याच्या रगाशी एकजीव झाल्यामुळे म्हणा किंवा आमच्या डोळ्यावर जरा झापड आल्यामुळे म्हणा, आम्हाला पटकन ती मोटार दिसलीच नाही त्या

# सिंगापूर

सिगापूर - जोहोरबारू शहरातून हजारो मुले -मुली रोज सिगापूरला शाळामध्ये शिकावयास जातात मलेशियन लोकाना सिगापूरला जाण्यासाठी व्हिसाची आवश्यकता नाही फक्त ओळखपत्र बरोबर ठेवाव लागत. अनेक मलेशियन फेरफटका मारायला किंवा कामधद्यानिमित्त सिंगापूरला सतत जा -ये करीत असतात रेल्वेनं किंवा मोटारीनं अर्धापाऊण तासात सिंगापूरला जोहोरबारूहून पोहोचता येते; परतु सिंगापूरला जाणाऱ्या मोटारी, बसेस याचा रेटा एवढा मोठा असतो की ब्ऱ्याच वेळा रखडपट्टी होते त्यात पुन्हा पासपोर्ट व व्हिसा याची तपासणी असतेच आम्हाला जास्त वेळ लागला नाही सिंगापूरच्या प्रवेशहद्दीवर बरीच तपासणी केंद्र आहेत आमचा पासपोर्ट एका यत्रावरती तपासून पाहिला दोन मिनिटात प्रवेश परवाना देऊन मोकळ केल अनेकपदरी, मोठे व गुळगुळीत रस्ते, रात्र असल्यान विशेष वर्दळ निदान या रस्त्यावर तरी नव्हती दिवेही कमी दिसले थोडेफार दिवे होते. रात्रीच्या वेळी मुबईला टिळक ब्रिजवर असाव, असं वाटत होतं सिगापूरच हे प्रथमदर्शन मनाला साशक करणार वाटत होतं ड्रायव्हरन या रस्त्यावरून गाडी अशी सुसाट मारली होती की बोलायची सोय नाही या गाडीला ब्रेक्स व्यवस्थित असतील ना अशीही शका मनात येऊन गेली जोहोरबारूहून सिगापूरला जाण म्हणजे ठाण्याहून मुंबईला बसन किंवा मोटारीनं जाण्यासारख होत मध्ये मोठी सिंगापूर नदी लागते रात्री ९ वाजण्याच्या सुमारास एका मोठ्या इमारतीशी पोहोचलो. या इमारती म्हणजे मोठ्या चाळींप्रमाणेच आहेत अनेक कुटुंब इथ एका इमारतीत दाटीवाटीन राहतात मोठ्या सख्येन अशा इमारतींची पलटण आहे. कारण सिंगापूर हे आकारानं अगदी लहान व माणस आणि मोटारींचा फारच सुळसुळाट, त्यामुळ जागा थोडी, अशी स्थिती आहे गाडीतून सामान बाहेर काढल व ड्रायव्हरचे मन पूर्वक आभार मानून, गाडी जोहोरबारूला परत पाठवून दिली. जिना चढून दुसऱ्या मजल्यावर एका ब्लॉकपाशी आलो ॲम्ब्रोजची बहीण इथ राहते हिचं नाव मेरी व नवऱ्याचं नाव हेनी जेन्सन हे जेन्सन पति -पत्नी

व त्याच्या तीन मुली या ब्लॉकमध्ये राहतात. ॲम्ब्रोजनं दरवाज्यावरील घंटा वाजविली व एका पन्नाशीतील बाईन दरवाजा उघडला ही बाई टी शर्ट व स्पोर्टस हाफपँटमध्ये होती स्त्रीच असं स्वरूप मी पहिल्यादाच बघत होतो तिनं हसून स्वागत केल व माझ्याशी हस्तादोलन केल "ही माझी बहीण आहे", अशी ओळख ॲम्ब्रोजनं करून दिली मलाच प्रश्न पडला की ही बाई हाफपँटमध्ये आहे, तर आपण एकदम कस आत जायचं ? जरा वेळान तिचा नवरा व मुलीही समोर आल्या पाहतो तर हे सर्वच हाफपँट घालून बसलेले म्हटलं, इथे हाफपँट सस्कृती दिसते आहे आत जाऊन सोफ्यावर बसलो जेनसन कुटुबाशी इकडच्या तिकडच्या चौकशा व गप्पागोष्टी सुरू झाल्या ॲम्ब्रोजच जास्त गोष्टी करीत होता, मी त्याच्या मानान गप्प होतो. सौ. जेन्सन यानी लगेच कॉफी व बिस्किट आणली सौ. जेन्सन या जरी चायनीज असल्या तरी त्याचे पती हेन्री हे युरेशिअन वशाचे होते त्यामुळे त्यांच्या मुली एकदम चिनी वळणावर गेल्या नव्हत्या त्याची मोठी मलगी तर सहज भारतीय म्हणुन खपून गेली असती.

कॉफी घेता घेता एकीकडे टी व्ही बघत होतो बातम्या चालू होत्या. त्या वेळेस भारतात लोकसभा निवडणुकाची धामधूम चालू होती सिंगापूरमधील वृत्तपत्रात त्याचे पडसाद उमटत होते व दूरदर्शनच्या बातम्यांच्या वेळीही निवडणूक प्रचाराची चित्रं व हिंसाचार दाखविला जात होता श्री जेन्सन हे मला भारतासबधी काही प्रश्न विचारीत होते. राजकारण, शिक्षण, भाषा व मुबईबद्दल त्यानी अनेक प्रश्न विचारले त्यानाही मुंबईची गर्दी, लोकल गाड्या व झोपडपट्टीविषयी विलक्षण कुतूहल होतं भारताची राष्ट्रभाषा हिंदी असून, सर्वांत मोठा लोकसख्येचा भाग हिंदी जाणणारा आहे, हे ऐकल्यावर त्याना जरा आश्चर्यच वाटल भारत हे सिंगापूरप्रमाण ब्रिटिशाच्या गुलामगिरीत असल्यान इथली राष्ट्रभाषाही सिंगापूरप्रमाणे इंग्रजी असणार, अशी त्याची समजूत होती सिंगापूरची ८० % प्रजा चिनी आहे, पण राष्ट्रभाषा इग्रजी आहे त्याना स्वत:ची अशी भाषा नाही जेन्सननी मला शिक्षणाच्या माध्यमाविषयी प्रश्न विचारून, जरा अडचणीत आणल म्हटल झाकली मूठच ठेवावी! म्हटलं, "शहरं सोडल्यास लहान गावात व खेडेगावात आम्ही लोकव्यवहारात इग्रजीचा वापर करीत नाही " पण त्या बिचाऱ्याला काय माहीत की मेकॉलेसाहेबांनी आमची काय गोची करून ठेवली आहे साहेबाचा प्रभाव काही अजून संपत नाही. मोठे मोठे व जाडे लेखक आणि सपादक मराठीवर प्रेम करा म्हणतील व तेवढेच लगेच म्हणतील की इग्रजीवरही प्रेम करा.

भाषाभिमानाची गोष्ट निघाली की हे लोक सबुरीचे सल्ले देत राहणार आपल्या देशात इग्रजी = नोकरी हे समीकरण आहे; त्यात अनेक तरुणाची सरसहा कत्तल होते आहे अलीकड स्पर्धात्मक परीक्षा हिंदीतूनही देता येतात, ही एक समाधानाची गोष्ट सरकारन केली आहे आमच्या देशात शहरापासून ते खेड्यांपर्यंत इग्लिश माध्यमाच्या शाळाच सरसहा पेव फुटल आहे हे सागण्याच धाडस मला झाले नाही

चार खोल्याचा कमी क्षेत्रफळाचा ब्लॉक होता त्यातील एक खोली आम्हाला देण्यात आली सुदैवाने मजल्यावर एक ब्लॉक रिकामा असल्यान, मुली तिकड झोपायला गेल्या झोप मात्र लगेच लागली सिंगापूरचा उकाडाही असह्य करून टाकतो सूर्यवशी असल्यान मी या प्रवासातही उशिराच उठत असे सिंगापूर, मलेशिया इथली ऑफिस वेळ सकाळी लवकर म्हणजे ८ ३० किंवा ९ वाजताची असते श्री जेन्सन सकाळी साडेसातलाच घराबाहेर पडायचे सकाळी आठ वाजता उठलो व नऊ वाजता सर्व आटोपून, तयार झालो जेन्सन याची सर्वांत लहान सहा वर्षांची मुलगी ऑड्री हिन खूप लळा लावला आल्यापासून ती सतत माझ्याबरोबर बोलत होती व खेळत होती फारच खट्याळही होती मोठी मुलगी इरीन ही उत्तमपैकी गाते तोच व्यवसाय पुढे करण्याचा तिचा इरादा आहे मधली मुलगी ज्युली हिला पेंटिंगचा नाद आहे. धाकटी मुलगी ऑड्री ही खूप सभाधीट असून गाण्याच्या क्षेत्रात पडेल अस तिच्या आईवडिलाना सध्यातरी वाटत आहे. ही ऑड्री दूरदर्शनच्या काही जाहिरातींमधूनही चमकली आहे आईवडीलही मुलाना खूप प्रोत्साहन देतात हे कुटुब तोहपायोह या भागात राहते

आदल्या रात्री सिंगापूरचं प्रथमदर्शन बरच धूसर वाटल होत सकाळी पाहतो, तर वेगळंच रूप ! नाविन्याची झळाळी व उभारी ल्यालेल दिसल गुलमोहोर फुलावा तशी सकाळ फुललेली व टवटवीत दिसत होती सुदर, प्रशस्त रस्ते. स्वच्छता तर बघायलाच नको ! सुबक इमारती, छान चकचकीत लाब मोटारी व त्यात बसलेली नितळ कातीची अन् मिचमिच्या डोळ्याची माणस, रस्त्याच्या कडाना लावलेले वृक्ष हे सर्व एकूण परिसराचे व वातावरणाचे सौंदर्य खुलवीत होते सकाळी उठल्या उठल्या आजूबाजूचा स्वच्छ व सुरेख परिसर पाहणे, हे भारतातील बहुसख्य शहरवासीयाच्या भाग्यात नाही कारण तुबलेली गटारे, उकिरडे पाहण्याची सवय लहानपणापासूनच आपल्या डोळ्याना झालेली असते. आमच्या जीवनाचा तो एक अविभाज्य घटक झाला असून, ब्रह्मीभूत व्हायची वेळ येते

सिंगापूर मात्र स्वर्गीय ब्रह्मात नेऊन सोडत

सिंगापूर हे अगदी अलीकडचं अत्यत छोट, पण प्रजासत्ताक राष्ट्र आहे १९६५ साली सिंगापूर स्वतत्र झाल पूर्वीच्या ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग मलाया द्वीपकल्पात मोडत होता येथील ८० % प्रजा चिनी वशाची आहे शिक्षण, विज्ञान, तत्रज्ञान यातील प्रगती व आर्थिक नियोजन आणि मुक्त व्यापार यामुळे हा देश भरभराटीला आला आहे मोठी आतरराष्ट्रीय बाजारपेठ इथ आहे तसच मोठे विमानतळ व उत्तम बंदर यामुळं ते सर्व जगाशी जोडल गेल आहे. सिंगापुरात तामीळ लोकांची मोठी वस्ती आहे

श्री जेन्सन याच्या घरापासून 'तोहपायोह हे भुयारी रल्वस्थानक अगदी जवळच आहे तेथपर्यंत पायी गेलो. भुयारी मार्ग भिकारी मार्ग नव्हता. स्थानकाकड जाताना सरकत्या जिन्यान एकदा चढाव लागतं व उतराव लागतं स्थानकावर असलेल्या एका बँकेत ॲम्ब्रोजनं मलेशियन डॉलर्स देऊन, सिंगापुरी डॉलर्स घेतले. स्थानकावर तिकिटं खरेदी करण्यासाठी आलो बघतो तर कसली तिकीट खरेदी हो ! यंत्रात पैसे टाकले की तिकीट मिळते व सुटे पैसेही मिळतात आम्ही ज्युरॉंग ईस्ट या स्टेशनचे तिकीट घेतल. व काही सुटी नाणी घेतली स्टेशनच्या कार्यालयात जेमतेम तीनच माणस दिसत होती. बाकी सर्व काम यत्रावर सोपविलं होत. १ सिंगापूर डॉलर्स व १ सेंट या पैशाच तिकीट घेऊन, सिंगापूरला कुठेही या भुयारी रल्वन प्रवास करता यता.

या भुयारी रेल्वेला MRT असं नाव आहे गाड्याही भरपूर असून, तिष्ठत बसाव लागत नाही स्टेशनवर ठिकठिकाणी नकाशे, स्टेशनची व कोणत्या मार्गावरून MRT धावेल व कुठे गाडी बदलावी, याची माहिती पिवळ्या व लाल दिव्याचे गोल करून, नकाशावर दाखविली होती त्यामुळे नवीन माणसालाही सहजपण मार्ग शोधता येतात आपल्याकड मुंबईला जसे मानखुर्द, बोरीवली, ठाणे, असे वेगवेगळे [illegible] वातानुकलित आहेत

गाडी आली की प्लॅटफार्मचे दरवाजे उघडतात व गाडीचेही उघडतात गाडी सुटताना दोन्ही दरवाजे पुन्हा आपोआप बंद होतात सकाळची वेळ असल्यामुळे गाड्याना गर्दी होती बरेच लोक उभ्यानंच प्रवास करीत होते; परतु या गर्दीला, धावपळीला एक शिस्त होती स्टेशनवर वा गाडीत गलका नाही, फेरीवाले - भिकारी याचा उपद्रव नाही पत्ते खेळणं, सिगारेटस् ओढण, खाद्यपदार्थ खाणं इत्यादी प्रकार नाहीत. या सर्वांना इथ कडक बदी आहे. हा गुन्हा समजला जाऊन;

त्यावर बराच दड आकारला जातो.

आम्ही गाडीत बसलो अन् गाडीन दरवाजे लपेटून घेतले पश्चिम रेल्वेच्या स्थानकांप्रमाणच जवळजवळ स्थानक आहेत पुढच स्थानक येण्याअगोदर एक गोड घंटा वाजते व नम्र आवाजात स्थानकाच नाव सागितल जात आम्ही रॅफल्स प्लेस या ठिकाणी उतरलो आणि ज्युरॉंग ईस्टकड जाणारी गाडी पकडली १५ मिनिटातच ज्युरॉंग ईस्ट स्थानकावर उतरलो गाडीत चढण्याअगोदर तिकीट पच करून घ्यावं लागत. अर्थात ते यंत्राद्वार होतं. आणि स्थानकावरून बाहेर पडतानाही तिकीट त्या यत्रात टाकावं लागत; मगच बाहेर पडता येत त्याशिवाय इथ असलेला छोटा दरवाजा उघडला जात नाही या तिकिटावर एक बाण दाखविलेला असतो. त्याच बाजून तिकीट जाते - येते वेळी यत्रात टाकाव तिकीट घेतल्यापासून अर्ध्या तासाच्या आत प्रवासास सुरुवात करावी लागते

ज्युरॉंग ईस्टला उतरून बाहेर मोठ्या रस्त्यावर आलो जगप्रसिद्ध ज्युरॉंग बर्ड पार्क पाहल्याशिवाय सिंगापूरसहल कशी सिद्धीस जाईल बर ? टॅक्सी करून ज्युरॉंग बर्ड पार्कला गेलो

तिकिटं घेऊन आत गेलो सुरुवातीच्या दालनात ज्युरॉंग बर्ड पार्कसंबधी माहिती देणारी पत्रक, चित्र, नकाशे होते माहिती केंद्र होती टॉयलेटस् होती किरकोळ व स्फटिकाच्या वस्तूची विक्री करणारी दुकान होती, फिल्म शो किंवा स्लाईडस् शो दाखविण्यासाठी एक थिएटर होत पर्यटकांना कोणकोणत्या प्रकारे आकर्षित करता येईल ते सर्व प्रकार या पार्कमध्ये अमलात आणले होते. छोटे छोटे हौद, धबधबे, बागा, हिरवळ, जलाशयाकाठी असलेली बांबूची रेस्तराँ, सायकल रिक्षा किंवा ट्रामगाडीतून पार्कमध्ये फेरफटका मारण्याची सोय, कोणतं आकर्षण नाही अस नाहीच पक्ष्याबरोबर न्याहारी, पक्ष्याबरोबर छायाचित्रण, पक्ष्यानी केलेले भविष्यकथनाचे खेळ निरनिराळ्या वेळात दाखविले जातात एका दालनात पक्ष्यांविषयी असलेल्या दुर्मिळ छायाचित्रांच प्रदर्शनही होतं यातील काही भारतीयानी पाठविलेली चित्रे आहेत ही चित्रं वैशिष्ट्यपूर्ण आहेत. खुद्द पार्कमध्ये तर अलम दुनिया पक्ष्यांचीच आहे. प्रादेशिक व परदेशी अनेकरंगी व अनेकढंगी पक्षी या पार्कमध्ये योजनाबद्ध रीतीने ठेवलेले आहेत मन मोहून जात या सुंदर दुनियेत. बुलबुल काय, हस काय, फ्लेमिंगो काय, अन् मोर, रॉबीन असे पक्षी काय ! नानारगी पोपट आत जातानाच आपल स्वागत करतात. घार, गरूड, पाणबदक, कबुतर, मकाऊ, तुरेवाली कबुतर, पेलिकन्स, शहामृगे, पाढरे मोर,

निसर्गाने त्या हरित पार्श्वभूमीवर केलेली रंगीबेरंगी इंद्रधनुषी उधळणच होय. हे मुक्त व निरागस सौंदर्य साठविताना दोन डोळे अपुरे पडावेत. येथील हॉर्नबिल्स् पक्षी पाहिल्यावर मुंबईच्या 'बॉम्बे नॅचरल हिस्टरी' सोसायटीची आठवण होते. मुबईतील या सस्थेच्या इमारतीचे नाव 'हॉर्नबिल हाऊस' अस आहे. सरोवरात विहार करणारे पांढरे शुभ्र हंस बघून, नल-दमयंती आख्यानाची आठवण आल्याशिवाय राहत नाही

एक स्वतत्र दालन तर रात्रिंचर घुबड पक्ष्यांसाठी तयार केल होतं. अनेक जातींची घुबड एका अधाऱ्या दालनात मोठ्या काचेच्या चौकटीत ठेवली होती. रात्रीसारख कृत्रिम वातावरण तिथ निर्माण केल होत आपल्याला आतील पक्षी दिसावा, म्हणून थोडा प्रकाश या काचेवर सोडलेला असतो प्रत्येक काचेच्या चौकटीवर घुबडांची माहिती व तपशील दिलेला होता हे दालन पाहिल्यावर घुबड एक किळसवाणा प्राणी आहे, हा भ्रम दूर होतो ठाणे जिल्ह्यातल सह्याद्रीच सर्वांत उच ठिकाण असलेल्या सूर्यमाळ या निसर्गरम्य गावी एका झाडावर सकाळी आठ वाजता घुबडाची दोन गोजिरवाणी पिल पाहिली होती; त्याची आठवण झाली बरेचसे हंस, पेलिकन्स, पाढरा मोर, रगीत पोपट तर मुक्त विहार करताना दिसत होते इतर पक्ष्याना मोठी, हवेशीर, स्वच्छ -खुराडी किंवा पिंजरे होते. मैना, बुलबुल पक्षी याचेही बरेच प्रकार होते विशेषत घार अन् गरूड यांचे पिंजरे बरेच उच व विस्तृत होते ते बघून सर्कशीतील प्राणी लहान लहान पिंजऱ्यात जखडले जाऊन, त्यांची अवस्था कशी केविलवाणी होते; हे चित्र पटकन चक्षूसमोर आले. मोठी शहामृगे व पांढरा मोकळा असलेला मोरही लक्ष वेधून घेतो पंधराशेच्या वर पक्षी या पार्कमध्ये आहेत आपल्याकडं 'काशी' या स्थळाच फार माहात्म्य आहे विठ्ठलभक्ताची काशी पंढरपूर, तर सावरकर भक्तांची काशी म्हणे अंदमान आहे, मदिराभक्ताची म्हणे गोवा आहे, तसेच 'पक्षिमित्रांची' काशी 'ज्युरॉंग बर्ड पार्क' आहे.

एका जलाशयाकाठी चहा मिळाला, पण पाणी मिळाले नाही. पाण्यासाठी दाही दिशा, पण पाणी गावलं नाही पक्ष्यांना विहार करण्यासाठी जलाशय आहेत, झरे आहेत, धबधबा आहे, पण तहानलेल्याला साधा पाण्याचा ग्लास नाही हो ! हव असल्यास काही पेनी खर्च करून, थंड पेय घ्या म्हणतात पण पाण्यापेक्षाही पेनी महाग होत्या, त्यामुळे पाणी न पिताच तहान भागली

पार्कमधून बाहेर पडल्यावर जवळच क्रोकोडाईल फार्मवर आलो इथं मगरींना

जेवण भरविण्याचा कार्यक्रम असतो, तो पाहण्यासाठी गेलो, परतु तिकीट दर अव्वाच्या सव्वा असल्यान आवढा गिळून, एवढे पैसे मगरींच जेवण पाहण्यासाठी खर्च न करता, स्वत चे जेवण त्यात भरपूर करावं, असा सूज्ञ विचार केला, अन एका चिनी माणसाच्या हॉटेलात यथेच्छ भोजन केल तिथ पाणी मिळाल नाही, पण थड व मधुर सोयाबीन वॉटरवरती तहान भागविली

तिथून सिंगापूरचं प्रख्यात 'सायन्स सेंटर' पाहावयास गेलो या 'सायन्स सेंटरची' इमारत सुरेख व पाढऱ्या शुभ्र रगाची आहे, पण दुर्दैवान सोमवार असल्यान हे 'सायन्स सेंटर' बद होतं बाहेरूनच या इमारतीचा फोटो घेतला नतर परत ज्युरॉंग ईस्ट स्थानकावर आलो या स्टेशनावरून सिंगापूरमधील बऱ्याच उच व निरनिराळ्या आकाराच्या, प्रकाराच्या इमारती फार शोभिवत दिसतात हे स्टेशन जरा उंचावर आहे. सरकत्या जिन्यावरून या स्टेशनवर आम्हास जावं लागलं

एफ्.आर टी रेल्वेने रॅफल्स स्ट्रीटवरून, ऑर्चर्ड रोडला आलो नितांतसुदर, पर्यटकानी भरभरून वाहत असलेली अतिमहाकाय डिपार्टमेंटल स्टोअर्स बघत चाललो होतो एखाद्या प्राण्यान जबडा उघडून बसाव, तशी अनेक डिपार्टमेंटल स्टोअर्स दाटीवाटीने या ऑर्चर्ड रोडवर उभी होती पर्यटक आपणहून त्यांच्याकडे नकळत आकर्षित होतात मात्र डिपार्टमेंटल स्टोअर्सची भव्यता, सुदरता व स्वच्छता दृष्ट लागण्यासारखी आहे पर्यटकाचा उत्साह गगा -यमुनेसारखा दुथडी भरून वाहत होता चेहरे चितामुक्त होते.

ऑर्चर्ड रोडला १६७ क्र ची बस घेऊन, तिने वर्ल्ड ट्रेड सेंटरला गेलो तेथून मोठा जिना आणि झुलता पूल पार करून व वर्ल्ड ट्रेड सेंटरची मोठी इमारत ओलांडून, जेटीवर आलो फेरीची तिकिट काढली अन् फेरीत जाऊन बसलो फेरीही अलिशान होती फेरीतून समोर पाहिल तर काय ! काही मिनिटाच्या अतरावर सेंटोसा आयलडवरील सुंदर, टुमदार, इमारत खुणावत होती, की मला भेटायला या. पाच मिनिटातच फेरीन सेंटोसा आयलंडवर पाहोचलो जवळून सेंटोसा अधिकच मोहक दिसत होतं या बेटावरची प्रशासकीय इमारत फारच आकर्षक आहे पांढरा शुभ्र रग, वरती लाल रगाची कौल, घड्याळाचा मोठा टॉवर, अनेकखणी इमारत होती जुन्या काळातील ब्रिटिश गव्हर्नराच्या बगल्याची आठवण यावी, अशी ही इमारत आहे

सेंटोसा, हे सिगापूरच सर्वांत मोठ आकर्षण समजल जात सिंगापूरच्या मुख्य भूमीपासून दक्षिणेकडे फक्त अर्धा कि मी अंतरावर हे 'सेंटोसा बेट' आहे प्रथम

मारीटाइम म्युझियम पाहिले हे सग्रहालय अतिशय पाहण्यासारख आहे अनेक कलात्मक वस्तू, पुतळे, मूर्ती, काही प्रसंग, व्यक्तिचित्र मोठ्या कौशल्यान व आकर्षकपण माडलेली आहेत. सिंगापूरचा इतिहास काही चित्रामधून व्यक्त केला आहे भारतीय मजुराच एक मूर्तिचित्र खिळवून ठेवणार आहे. चिनी व मुसलमान व्यापारी, भारतीय मजूर, इंग्रज अधिकारी याच्या छानशा मूर्ती आणि चित्रं नाजुकपण चितारली आहेत सिगापूरला वसाहत कशी स्थापन झाली व सिंगापूर आणि समुद्र यांच अतूट नात कस आहे, हे दाखविणारीही चित्रं आहेत

तेथून पुढे गेल्यावर 'सरेंडर्स चेंबर्स' च्या दालनात गेलो दुसऱ्या महायुद्धात पूर्वेकडील देशावर व प्रामुख्याने मलाया, सिगापूर या देशांवर जपाननं जे आक्रमण केल; त्याचा सपूर्ण तपशील सागणाऱ्या असख्य जिवत कलाकृती या दालनामधून ठेवल्या आहत सातव्या दालनात १९४२ मध्ये जपान्यासमोर ब्रिटिश कसे शरणागती पत्करतात, ते दाखविल आहे असे एकूण पधरा पुतळे पॉलिव्हीनीलपासून बनविले आहेत तर बाराव्या दालनात जपानी अधिकारी १२ सप्टेंबर, १९४५ लॉर्ड माउटबॅटनपुढे कशी मान वाकवून, नामुष्की स्वीकारतात, हे सत्तावीस मेणाच्या पुतळ्याच्या आधारे दाखविल आहे यातील सर्व माणस अगदी खरी वाटतात सुरुवातीला क्षणभर फसायलाच होत मनुष्य स्तिमित होऊन जातो इतर दालनांमधून इतर काही महायुद्धातील दृश्य, युद्धापूर्वीचं सिगापूरमधील जीवन यांबद्दल सतत फिल्म शो दाखविला जातो त्यात हिरोशिमा, नागासाकीवर झालेल्या अणुबॉंब हल्ल्याचे व नतरच्या परिणामांचेही चित्रण केलेलं आहे. हे सग्रहालय पाहायला बरीच गर्दी होती.

तिथून बाहेर पडलो. पावसाची रिपरिप चालू होती या बेटावरच सर्वांत मोठ वैशिष्ट्य म्हणजे या बेटावरील निरनिराळी प्रेक्षणीय स्थळ पाहण्यासाठी मोनोरेलची व बसेसची उत्तम सोय आहे याच भाडही अगोदर सेंटोसा बेट पाहण्यासाठी घेतलेल्या तिकिटात अतर्भूत असत

मोनोरेल ही छोटीशी लाल पाढऱ्या रगाची गाडी, एका फूटभर रुंदीच्या लोहपट्टीवरून धावते ही गोलाकार फिरते यातून सेंटोसाचा परिसर अतिशय रम्य दिसतो गाडीत बसायलाही फार मौज वाटते अस वाटत की लहान मुलाप्रमाणं होऊन दिवसभर या गाडीतून फिरण्याचा हट्ट धरावा छोटी छोटी सहा स्टेशन आहेत समजा, आपल्याला तिथलं वॅक्स म्युझियम, किंवा तिथला किल्ला वा कोरलॅरियम बघायच असेल; वा बीचवर समुद्रस्नानासाठी किंवा सूर्यस्नानासाठी

जायचं असेल, तर त्या जवळील कुठल्याही स्टेशनावर उतरता येत व तेथून ईप्सित स्थळाकडं बसनं जाता येतं ही गाडी सतत धावतच असते, जशी मुबईला १ मर्यादित व ६६ क्रमांकाची बेस्ट बस धावते तशी

मोनोरेलमधून आम्ही कोरलॅरियमकडे निघालो. हे ठिकाण बरच लाब असून, बेटाच्या एका टोकाला - पूर्वेला आहे तिथपर्यंत मोनोरेल जात नाही एका स्टेशनवर उतरून, आम्ही बसनं कोरलॅरियमकडे गेलो इथ बसेसही सारख्या धावत असतात घाईघाईतच गेलो कारण कोरलसचे दालन सायकाळी ६ वाजता बद होत आम्ही बसमधून उतरताक्षणीच धो -धो पाऊस सुरू झाला. म्हणून बसथांब्याखाली उभे राहिलो तिथून अगदी चाळीस पावलावर कोरलदालन होते, पण पावसामुळ तिथं जाणं अशक्य होत तेवढ्यात तिकीटविक्री खिडकीवर असलेल्या सहृदय महिलेन एका पर्यटकाबरोबर आमच्यासाठी दोन छत्र्या पाठवून दिल्या तिथ गेल्यावर त्या महिलेला छत्र्या परत केल्या व तिचे मनोमन आभार मानले एवढच नव्हे, तर तिकिटाचेही पैसे तिन घेतले नाही फक्त एवढंच म्हणाली, "कोरल्स लवकर, अर्ध्या तासात बघून या, नाहीतर ते बद होईल" सदर महिला तामिळी होती ते पाहून ॲम्ब्रोज हळूच गमतीन म्हणाला की, " तुला पाहूनच एवढ औदार्य या बाईन दाखविलं."

हे कोरलदालन मन थक्क करून सोडणार आहे रगीबेरगी छोटेछोटे विविध आकारांचे मासे, इतर तत्सम जलचर प्राणी भरपूर आहेत अनेक प्रकारचे शैल्स् असून, त्याची सख्या दोन हजारच्या वर आहे पाढऱ्या रगाचे स्टार कोरल्स मला फार आवडले या सर्वांची माडणी मोठी आकर्षक आहे कोरलगृहाच्या बाहेर छानसा बगिचा, पुष्करिणी, व उच झाड व वेली होत्या गोल आकारांचे हौद असून, त्यातही वनस्पती होत्या. काही कासवही त्यात सोडली होती बदक होती वातावरण चित्त उल्हसित करणारं होते. कोरलस् बघून बसनं व नतर मोनोरेलन, प्रख्यात म्युझिकल फाउटनपाशी आलो. म्हैसूरजवळील वृदावन उद्यानाची आवर्जून आठवण व्हावी, अस हे ठिकाण आहे आपल्या पैठणलाही वृदावन उद्यानासारख उद्यान उभं करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण हे पैठण म्हणजे एक भिकार गाव आहे. अगदी अस्वच्छ व घाणीने भरलेलं आहे नाथाच पैठण म्हणण्यासारखं गावात काही नाही इतिहासाचार्य, पुरातत्त्वभूषण कै वि.का राजवाडे याच्या भाषेत बोलायच झाल्यास 'आपण फक्त टाळकुटेपणाच उचलला !' पैठणच सुदर उद्यान बघितल्यावर गाव बघताना घोर निराशा पदरी येते.

म्युझिकल फाउंटनकडं जाताना बाहेर एक सुरेख टुमदार इमारत लागते तिच्या कमानीतून आत गेलो, की मोठा बगीचा लागतो. चोहोकडे हिरवळच हिरवळ फुलराणीच त्यावर खेळत आहे की काय असं भासमान व्हावं. भरपूर दिव्याचे झोत सोडले होते. असख्य लहान लहान रगीत कारजी, पाण्याचे झरे, वेली व वृक्षाचे असंख्य प्रकार पाहिल्यावर कोंदणात हिरा बसविला आहे, अस वाटाव वेरुळच्या कलात्मकतेची आठवण यावी, इतकं हे रमणीय ठिकाण आहे कोरीव कामासारखच बागकाम होतं ते! डोळ्याचं पारण फिटणं म्हणतात; तस वाटत होतं. म्युझिकल फाउंटनची ठराविक वेळ गाठण्यासाठी पर्यटकांची नुसती धावपळ उडाली होती. उत्सुकता शिगेला पोहोचली होती. साधारणपणे फर्लांगभर त्या सळसळत्या गर्दीतून वाट काढीत गेले की समोरच म्युझिकल फौंटनचा भव्य पिसारा दिसू लागतो. चागलंच अधारून आल होत.

काही पायऱ्या चढून गेलो की हिरवळीची सपाट जागा लागते व त्या जागेलाच खाली सिमेंटच्या पायऱ्या करून सोडल्या आहेत खूप माणसाची बसायची सोय केलेली आहे. प्रत्येकालाच जागा पकडायची घाई होती. आम्ही मात्र हिरवळीवरच उभे होतो समोर अनेक पुष्करिणी होत्या त्यातून विविध प्रकारची कारजी उडत होती रगीत दिव्याचा झोत त्यांवर सोडला होता बरीच तरुण युगुले एकमेकाना खेटून बसली होती, तर काही एकमेकाच्या कमरेत हात घालून हलक्याशा प्रणयचेष्टा करीत होती. चिन्यांचे डोळे बारीक असल्यान त्याना एकमेकाच्या डोळ्यांत डोळे मिसळून पाहता येते की नाही शका आहे त्यामुळे 'आज तू डोळ्यात माझ्या' सारखी गाणी चिनी सकल्पनेत निश्चितच नसणार

बरोबर ७ ४५ वा सायंकाळी म्युझिकल फाउटनचा कार्यक्रम सुरू होणार होता गर्दी तोबातोबा म्हणायला लावीत होती मात्र या गर्दीत गोंगाट, गोंधळ अजिबात नव्हता. अगदी वेळ आली, तेव्हा बरीच गर्दी झाली लोकानी आपापले कॅमेरे फ्लॅशसह सज्ज ठेवले होते बार झाल्यावर धावपटू जसे एकदम सुसाटत सुटतात, तसे यांचे कॅमेरेही विद्युतवेगाने धावणार होते

लवकरच कार्यक्रम सुरू होईल, व कोणीही फोटो काढताना फ्लॅश वापरू नयेत, अशीही सूचना दिली गेली, पण लोकांनी ऐकलं तर काय हवं! घोडे फुरफुरतात तसे लोकांचे कॅमेरे, फ्लॅश फुरफुरत होते इतक्यात बरोबर रात्री पावणे आठ वाजता, मुख्य कारंजं व त्या भोवतालची इतर कारंजी सगीताच्या तालावर थुईथुई नाचू लागली आणि दिव्यांच्या झोतानी त्यावर आपलं इद्रधनुषी जाळं

टाकल. अन् काय विचारता, पर्यटकाच्या डोळ्याना भिडलेल्या कॅमेऱ्याची एकच क्लिकरघाईची कडाड उडाली लोकाचा धुदफुद जल्लोष चालू झाला केवळ वर्णनातीत! लोकाना खरा निखळ आनद मिळाला जडाच अस्तित्व विसरलो होतो, पण लगेच भानावर आलो मुबईकडील जीवनाची सवय असल्यान लोकल, एस्.टी , लवकर मिळेल की नाही ही जशी शका असते, तशीच जाणीव येथेही झाली मीच ॲम्ब्रोजला म्हटल की 'येथून लवकर नीघ, नाहीतर फेरी मिळायला वेळ लागेल ' त्यालाही ते पटलं व आम्ही घाईघाईन फेरीपाशी आलो फेरीत एका बाकावर आरामात बसलो. सहज समोरच्या बाकाच्या कठड्यावर लक्ष गेले त्यावर 'Life jackets under seats' अस वाक्य सुरक्षिततेच्या दृष्टीने लिहिल होत पण कोणीतरी चावटपणा करून, त्यातील काही शब्द खोडून, If Jack is under sea' अस मजेशीर वाक्य लिहून ठेवल होत खूप हसायला आल फेरीने पलीकडे सिंगापूरला जायला फक्त पाच मिनिट लागतात त्या अवधीत आमचे दोन भारतीय तरुण फेरीमधील एका नितांतसुदर पाश्चात्य युवतीचे तिच्या नकळत फोटो काढण्यात दग झाले होते ती बिचारी फेरी दूर असताना सेंटोसाला गुडबाय करीत होती. व अनिमिष नेत्रानी सेंटोसावरील दिव्याची रोषणाई तिच्या प्रियकराबरोबर बघत होती ही फोटो काढणारी मुलही त्याच्या चेहऱ्यावरून व बोलण्यावरून आगाऊच वाटत होती मी जरा ओशाळलोच होतो, पण ॲम्ब्रोज खवळला होता, "हे मूर्ख पहिल्यादाच पाश्चात्य युवती बघत आहेत की काय ?", असं तो सहज बोलून गेला.

फेरीचा प्रवास सपवून पुन्हा झुलता पूल पार करून बसस्थानकापाशी आलो. तेथे एका चिनी रेस्तरॉमध्ये जेवण घेतले रात्रीचे साडे आठ वाजले होते. बस पकडून ऑर्चर्ड स्ट्रीटला आलो इथ बघतो तर विजेचा झगमगाट आणि लखलखाट नुसता! जणू काही दिवाळीच फुलली आहे ख्रिसमस जवळ आला की साधारणपणे महिनाभर अगोदरच विद्युत रोषणाई केली जाते अनेक पर्यटक तर ही रोषणाई पाहायलाच केवळ बाहेर पडले होते एका डिपार्टमेंटल स्टोअरवर एका उमद्या घोड्याचं चित्र दिव्याच्या साह्याने उभे केले होते. एका स्टोअरवर FANTACY HOLIDAYS असमोठ्या अक्षरात दिव्याच्या माळेच्या साहाय्यान लिहिलंहोत लोक रसिकतेन ही रोषणाई पाहात व चहा, कॉफी, बियरचा आस्वाद घेत लहान लहान रेस्टॉरटमध्ये हिंडत होते. बँकॉक, पटायाप्रमाणे आबटशौकाचा कैफ येथे नव्हता, की बेधुदी व बेहोषपणा नव्हता तर पुण्याला गणपतीत जशी विजेची रोषणाई

असते, तसे इथे दृष्टिसुख घेण्यासाठी लोक उत्स्फूर्तपण, आनदानं बाहेर हिंडत होते निरनिराळी डिपार्टमेंटल स्टोअर्स, बँका, व्यापारी सस्था यावरील रोषणाई डोळे दिपवीत होती, सुखावीत होती. जणू काय आनंदयात्राच भरली होती परतु काही तामीळ तरुणाच एक टोळक यात मिठाचा खडा टाकू पाहत होतं हे टोळक एका हॉटेलच्या लहानशा भिंतीवर उभ राहिल होत व स्वत चे फोटो काढत होत इथपर्यंत ठीक होत पण हा फोटो काढून झाल्यावर सर्वांनी मोठ्यादा ओरडून, एकदम खाली उडी घेतली व फुटपाथवर मोठ्यांदा हसून व खिदळत बोलण चालू केल मोठ्यानं हसणं-बोलण हा जरी भारतीयाचा स्वभावविशेष असला तरी परदेशी चिनी व पाश्चात्य सामाजिक शिस्तीत व शाततेत तो भलताच कोलाहल ठरतो अनेक लोक दचकून, या गोंगाटाकडे पाहत होते अस वाटत होत की शाततात्रिय चिनीही खवळून उठतील.

या ऑर्चर्ड स्ट्रीटला काही फोटो घेतले नंतर बराच वेळ इकडे तिकडे फिरून MRT रेल्वेनं तोहपायोहला जेन्सनच्या घरी रात्री १० वाजता आलो हे कुटुंब तेव्हा टी व्ही वर एक अमेरिकन सिनेमा पाहात बसल होत. आल्यावर श्री. जेन्सन यानी मला मिलो नावाचं एक पौष्टिक पेय प्यायला दिले. या लोकाचा जाहिरातींवर बराच विश्वास दिसला. मिलो पौष्टिक का? तर म्हणे, त्याची जाहिरात तशी होते ना! ॲम्ब्रोजही असाच जाहिरात वाचून, औषधे खरेदी करीत असे दमल्यामुळे लवकर झोपी गेलो

सकाळी लवकर आटोपून बाहेर पडलो बरच चालत चालत व एकेक भाग निरखीत, रॅफल्स लँडिंग या भागाच्या दिशेने गेलो

सिंगापूरचं हे दर्शन मोठ विलोभनीय होत कितीतरी उत्तुंग व अप्रतिम वास्तुशिल्पाच्या प्रचड इमारती पाहिल्या, याला सीमा नाही रस्त्यावर फारशी गर्दी नव्हती मात्र काही ठिकाणी एम आर टी च्या पाट्या दिसल्या आणीबाणीत वा युद्धकाळात याचा उपयोग सुरक्षितता म्हणून लपण्यासाठी होतो. रस्त्यावरून भुयारी मार्गाकड जाता येत

चालता चालता रॅफल्स लॅडिंगजवळील एका बंदरावर आलो. इथून सिगापूर दर्शनच्या फेरी सुटतात. मात्र दर फार असल्याने फेरीचा विचार सोडला इथून सिंगापूरच खर स्वरूप दिसून येतं रॅफल्स लॅडिंग, क्लिफर्ड पीअर, मेरलायन इथ उत्तमोत्तम इमारती आहेत कोणत्या इमारतीचा फोटो घ्यावा व घेऊ नये, याचा सभ्रम पडतो

आम्ही रस्त्यानेच भटकायचे ठरविले होते किनाऱ्याकिनाऱ्याने चालत चालत व शहर बघत 'मरीना मडारीन' या अतिभव्य व वास्तुशिल्पाच्या दृष्टीने अत्यंत सुरेख अशा इमारतीपाशी आलो. इथ एक मोठ पचतारांकित हॉटेल व डिपार्टमेंटल स्टोअर्स आहे हे डिपार्टमेंटल स्टोअर्स पाहिले तिथले काही कॉम्प्यूटर खेळ पाहिले. अर्थात मला यात काही रस नव्हता पचताराकित जग या परदेशप्रवासात पहिल्यादाच अनुभवीत होतो एरवी आम्हाला उडप्याच्या साध्या हॉटेलात जाऊन भजी व शेवगाठी आणि चहा प्यायची सवय आहे. इथं कॅमेऱ्यात एक नवीन रोल भरला व पुन्हा हिंडण्यास सुरुवात केली ही इमारत फारच आवडली

तिथून अँडरसन ब्रिजवरून मेरलायन इथ गेलो हे सिंगापूरचं राष्ट्रीय स्मारक आहे एका मोठ्या पांढऱ्या शुभ्र सिंहाकृतीतून पाणी धो धो पडत असत हिच मुख समुद्राच्या बाजूला आहे हे ठिकाणही पाहण्यालायक आहे इथ विशेष गर्दी नव्हती. याच्या समोरच दाट झाडीत सुरेख असा गव्हर्नरचा बंगला आहे व बाजूला उंच मनोऱ्याच प्रोटेस्टट लोकांचं चर्च आहे क्लिफर्ड पीअरचा भाग बघून एका हॉटेलात जेवायला गेलो

तहान खूप लागली होती थडगार गोड बार्ली वॉटर प्यायल्यावर बर वाटल इथ थडगार बार्ली व सोयाबीन वॉटर लोकप्रिय आहे. जेवण झाल्यावर पिण्याचे पाणी मागितले, तर दोन पेनी जास्त घेतल्या. एवढा श्रीमत देश पण पिण्याच्या पाण्याचे पैसे लावतो, हे बघून जरा हसूच आल.

जेवण झाल्यावर इथलं राष्ट्रीय वस्तुसग्रहालय बघण्यासाठी कूच केल, परतु दुर्दैवान तिथ दुरुस्ती चालू असल्यान ते बद होते. तेथून Y.M C.A हॉस्टेलवर गेलो. आणि जुजबी चौकशी केली एखादी व्यक्ती जर Y.M.C.A ची सभासद असेल, तर त्या व्यक्तीला हॉस्टेलवर राहण्याच्या दरात सवलत मिळते ॲम्ब्रोज या सस्थेचा सभासद होता. Y M.C A च्या जगभर शाखा आहेत तिथच राष्ट्रीय प्राणिसग्रहालयाकडं कस जायच व कोणत्या क्रमाकाची बस पकडायची याची चौकशी केली.

येथील प्राणिसग्रहालय हे देखील सिंगापूरच्या लोकाच गर्वाच स्थान आहे. हे प्राणिसग्रहालय मात्र विस्तारानं फारच मोठ आहे अनेक प्राणी नैसर्गिक वातावरण निर्माण करून त्यात ठेवले आहेत झाडझाडोरा भरपूर आहे. वाघ, सिंह, चित्ते, बिबटे, काळे वाघ, गेंडा, हत्ती, जिराफ, काळविट, भेकरं, झेब्रे, साप, अजगर, मगरी असे अनेक प्राणी असून खास आकर्षण म्हणजे ओरांगउटाग माकडे आणि

सी लायन पाढरी शुभ्र पोलर अस्वलही आहेत कोणता प्राणी नाही, ते विचारा याही प्राणिसंग्रहालयात ज्युरॉंग बर्ड पार्कप्रमाणे ट्रॅमन फेरफटका मारता येतो. येथील ओरागउटाग माकडाची जात फारच वैशिष्ट्यपूर्ण आहे हत्ती, सी लायन, पोलर अस्वल यांचेही पाण्यातील विविध खेळ पाहिले हे खेळ पाहायला पर्यटकाची खूपच गर्दी असते विशेषत. सी लायन, पोलर, अस्वल याचे खेळ फारच प्रेक्षणीय होते मात्र यांना प्रत्येक खेळ करून दाखविण्याअगोदर एखाद्या मोठ्या माशाची लालूच दाखवावी लागते. तरच ते काम साध्य होत गेंडा खूप जवळून पाहायला मिळाला. मात्र तो भीतिदायक वाटला असं वाटल की चिडला तर अगावर येऊन धडकेल. लहान गॅलरीत उभे राहून गेंड्याला तेथील मनुष्य डिवचताना बघत होतो फिरून अनेक प्राणी बघता येतात. सायकाळी पावसाचा एक फटकारा आलाच तिथल्या एका हॉटेलात चहा घेतला व परतीच्या मार्गाला लागलो प्राणिसग्रहालय सायकाळी सहा वाजता बद होतं बसच्या रागेत उभे राहिलो येताना १७१ क्रमाकाच्या बसन आलो व जाताना क्रमाकाच्या १३७ बसन जात होतो ती बस तोहपायोह बस आगारापर्यंत जाते वाटेत सिगापूरचा काही जुना भाग पाहायला मिळाला तो भारतीय वातावरणाशी काही नात सागणारा वाटला मला तर खरोखरीच नागपूरमधील धतोलीत असल्याचा भास झाला.

तोहपायोह बस आगार, तेथील एम.आर टी रेल्वे स्थानकाजवळच आहे भुयारी मार्गान पलीकडे व पुढील रस्त्याला येऊन, जेन्सन याच्या घरी पोहोचलो. सायकाळचे सात वाजले होते प्रथम हात, पाय, तोंड धुऊन टी व्ही पाहात बसलो छोट्या ऑड्रीशी गप्पा मारीत होतो जेन्सन कुटुबातर्फे रात्रीचा खाना एका चिनी हॉटेलात आयोजित केला होता आठ वाजता बसन त्या हॉटेलकडे गेलो श्रीयुत जेन्सन ऑफिसमधून तिकडे परस्पर येणार होते ॲम्ब्रोज, त्याचा आणखी एक भाऊ - फ्रान्सिस - जो मलेशियात इपोह येथे राहतो तो, बहीण मेरी, मुलगी इर्वीन व ऑड्री हे सर्वजण आले होते चिनी मनुष्य चिनी हॉटेलातच जेवणार या न्यायानच तिकड गेलो होतो. हॉटेलात तशी बरीच गर्दी होती एका गोल टेबलाभोवती सर्वजण बसलो जेवणाची ऑर्डर दिली. एक म्हातारी चिनी बाई हे हॉटेल साभाळताना दिसत होती पाच मिनिटात एका मुलीने थाळ्या आणून दिल्या. वाडगे, काटे, चमचे, काड्या आल्या काटे, चमचे व काड्या स्वच्छ करून घ्यायला, वाडग्यात गरम पाणी दिल गेलं आणि एकीकडे कोऱ्या चहाचे ग्लासही भरले गेले जेवणात चिकन, प्रॉन्स, शेवया, भात, मासे असे

मस्त पदार्थ होते श्री. जेन्सनही जरा वेळान आले सावकाश भोजन चालू होतं जेवण झाल्यावर पायीपायीच घरी परतलो सामानाची आवराआवर करूनच झोपलो कारण दुसऱ्या दिवशी सकाळी सिंगापूर सोडून मलाक्काला परतायच होत

सकाळी ८.३० वाजता निघावयास सिद्ध झालो मेरी जेन्सन यानी भरपूर न्याहारी करून, खायला घातली त्या सहृदय जेन्सन कुटुबाचे मन पूर्वक आभार मानले जेन्सन पति -पत्नी व त्याच्या मुली या सर्वांनीच फार आपलेपणाची व आदरातिथ्याची वागणूक दिली तिथे घरपण मिळाल हे मी कधीच विसरू शकत नाही. मोठ्या जड अत करणान त्याचा निरोप घेतला

तोहपायोहहून रमतगमत पुन्हा सिंगापूरच देखण रूप बघतबघत तजोगपगार या रेल्वे जंक्शनवर आलो. येथून मलेशियाला जाणाऱ्या रेल्वे गाड्या सुटतात. सकाळी १० १५ वाजता कौलांलपूरला जाणारी रेल्वे होती आम्ही जोहोरबाहरूचे तिकीट काढले तिथ ॲम्ब्रोजची मोटार ठेवली होती तिकीट काढून प्लॅटफॉर्मवर व पुढे गाडीत चढण्यासाठी राग लावावी लागते कारण प्रवाशाचे पासपोर्ट व व्हिसा तिथ तपासले जातात व कस्टम तपासणी होते कारण ही मलेशियन रेल्वे होती सर्वच काम लवकर झाल कारण कपड्याव्यतिरिक्त काही नव्हतच सिंगापूरमध्ये एकाही डॉलरची खरेदी न करणारा बहुधा मीच पहिला मराठी पर्यटक असावा गाडीत जाऊन बसलो बसायला आरामशीर फोमच्या खुर्च्या होत्या गाडीला बरीच गर्दी होती काही प्रवासी उभेच होते अर्ध्या तासान जोहोरबाहरू हे रेल्वे स्थानक आल तिथ उतरून प्रथम एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये गेलो तिथं ॲम्ब्रोजन काही केक्स व इतर किरकोळ खरेदी केली



# परतीच्या वाटेवर

भावाचं घर जवळच होत तिथ पायी गेलो सकाळचे ११ ३० वाजले होते उन्हाचा कडाका होता सिंगापूरहूनच जोहोरबाहरूला फोन करून जेवायला येतो म्हणून कळविल होत जेवण तयारच होत. अम्ब्रोजच्या वहिनीने जेवायला वाढल. सर्वच जेवण गरमागरम स्वादिष्ट होत. स्टीम्ड फिश तर तोंडात ठेवल्यावर विरघळत होता ॲम्ब्रोजचे भाऊ कामावर गेले होते त्याची मुल घरी होती ही मुलं सिंगापूरमधील शाळात शिकायला जात जोहोरबाहरूहून अशी तीन ते साडेतीन हजार मुले सिंगापुरात शिक्षणाला येतात खास बसेस त्याच्यासाठी आहेत त्या बसेसच्या मालकानी नुकतीच बसच्या भाड्यात बरीच वाढ केल्यान, तिथं तो एक चर्चेचा विषय होता जोहोरबाहरूतील मुले सिंगापूरला शिकायला जातात, हे बऱ्याच मलेशियन लोकांना आवडत नाही

जेवण झाल्यावर त्या कुटुबाचा निरोप घेऊन ॲम्ब्रोजन आपल्या गाडीचा ताबा घेतला व गाडी वळविली, ती जोहोरबाहरूतील एका घराकड या घरात ॲम्ब्रोजची ब्याण्णव वर्षांची आजी राहते वडिलांची आई आहे ॲम्ब्रोज प्रेमाने तिला भेटला. तिथे अर्धापाऊण तास बसून व कॉफी घेऊन, गाडी मलाक्काकडे धावू लागली वाटेत एका ठिकाणी थांबलो तिथ एक चिनी मातीच्या वस्तूच दुकान होतं. एक सुबकसा जाभळ्या रगाचा नाजूक वेलबुट्टी केलेला फ्लॉवरपॉट विकत घेतला आणि पुन्हा गाडी मलाक्काच्या दिशेन भन्नाटू लागली मुआ नदी ओलाडून, मलाक्का जिल्ह्यात प्रवेश केला तेथील लाकडी उंच घर, पाम, रबर, नारळ याचे मळे पाहत पाहत दुपारी ३ ३० वाजता मलाक्कात दाखल झालो थोडी विश्राती घेऊन, सायंकाळी पुन्हा बाहेर पडलो. रोल धुवायला दिले

रात्री समोरच्या मैदानात एक दृक्श्राव्य कार्यक्रम होता, परंतु पावसाची भुरभुर असल्यान व कटाळा आल्यान गेलो नाही. टिन बियरचा आस्वाद घेत, टी व्ही.वर फुटबॉल मॅच बघत बसलो एका चॅनलवर इग्रजी बातम्या ऐकत होतो त्यातून भारतातील निवडणूक रणधुमाळीबद्दल बरंचस समजत होत कॉंग्रेसचा पराभव

होऊन विश्वनाथ प्रतापसिंग भारताचे पंतप्रधान होण्याची शक्यता आहे, असंही तिथल दूरदर्शन व वर्तमानपत्रं सूचित करीत होती त्याप्रमाणं लगेच घडून आलं भारतातील निवडणुकाच्या वेळी झालेला उत्तरेतील हिंसाचार, तसेच फिलिपाइन्समध्ये बडखोरांचा बीमोड करण्यासाठी अमेरिकेन पाठविलेल सैन्य याचीही दृश्य दूरदर्शनवर दिसत होती.

कमाही रात्री उशिरा आला. दुसऱ्या दिवशी दुपारी आम्ही पोर्ट डिक्सनला सॅम्युएलकडे जाणार होतो कमा सकाळीच त्याच्या कामधद्यानिमित्त पोर्ट डिक्सनला निघून गेला आम्ही दुपारी जेवण करून १.३० वाजता पोर्ट डिक्सनकडे गाडी घेऊन निघालो मलाक्कावरील समुद्रकिनाऱ्याला वळसा घालून तेथील बीच पाहत पाहत आमची गाडी वृक्ष, लता, वेली याच्यामधून कधी धावू लागली हे कळल नाही. आमच्या भोवतीच हिरवळीची माया पडली होती उंच डेरेदार वृक्ष साथ करीत होते हवा ढगाळ होती, सौम्य वारा सुटला होता गाडीत मुकेशची कॅसेट लावली होती व मुकेशच सदाबहार आणि मला सर्वात प्रिय असलेल 'जाने कहाँ गये वह दिन' हे गाणं मन अतर्मुख करीत होत ॲम्ब्रोजला या गाण्याचे सूर फार आवडले "या गाण्याचा अर्थ काय", असं त्यान विचारल या गाण्याचा अर्थ इग्रजीमध्ये स्पष्ट करून तुला सागण्याइतपत माझ इग्रजी चागलं नाही रे, अस मी स्पष्टीकरण केल

दुपारी तीनच्या सुमारास पोर्ट डिक्सनच्या बदरात पोहोचलो तिथे बरेच पडाव व लहान यत्रिक बोटी आळसावून सुस्त पडल्या होत्या काही मोठ्या शिडाचे पडाव उभे होते तेथून गावात आलो या सपूर्ण गावावर पोर्तुगीज छाप अजून आहे पिवळ्या रगाच्या भक्कम इमारती खूप होत्या एका दुकानातून सॅम्युएलसाठी काही केक विकत घेतले. एका केशकर्तनालयातही जाऊन आलो कारण तेथील मालक ॲम्ब्रोजच्या ओळखीचा होता व तो तमीळ होता तिथून सॅम्युएलकडे गेलो. कमाही तिथ आला होता कमा आज रात्री स्वयपाक करणार होता. तो पदार्थ उत्तम बनवितो काही वर्षांपूर्वी त्यान इग्लडला जाऊन स्वयपाक्याचा अभ्यासक्रम पुरा केला होता सॅम्युएलला भेटलो व आम्ही आल्याची वर्दी दिली लगेच त्याच्याकडून चार कि.मी. अंतरावर असलेल्या 'ला सल्ले' या शिक्षण सस्थेच्या हॉस्टेलवर गेलो आम्ही रात्री तिथंच राहणार होतो ॲम्ब्रोज ब्रदर होता, त्यामुळ हॉस्टेलवर विनाविलब जागा मिळण्यास काहीच अडचण आली नाही. या हॉस्टेलला प्रशस्त अंगण असून, तेथे अनेक प्रकारचे वृक्ष लावले आहेत

फाटकाच्या समोर मोठा डाबरी रस्ता आणि तो ओलांडून गेलो की समोरच अथाग समुद्र लागतो. आम्हांला वरच्या मजल्यावर खास ब्रदर लोकांसाठी असलेली छान आणि सर्व सुखसोयींनी युक्त अशी खोली मिळाली. आघोळ वगैरे करून कपडे बदलून बाहेर आलो दिवाणखान्यात चहा पीत बसलो होतो. तेवढ्यात दोन सिंगापुरी फादर आले. ते ॲम्ब्रोजच्या ओळखीचे होते. त्याच व त्यांचं बोलण सुरू झाल. माझी व त्या फादर लोकाची ओळख ॲम्ब्रोजनं करून दिली. या बिचाऱ्याचीही समजूत मी ख्रिश्चन आहे, अशीच झाली या वेळेपासून मी ख्रिश्चन नाही हे सागणही मी सोडून दिलं. इतका कातावलो होतो म्हटलं, आता आपला धर्म सब गोलंकार ! काही बोलायचच नाही.

या हॉस्टेलमध्ये सहलीचे लोकही येतात हॉस्टेलची इमारत मोठी सुंदर, भव्य, व स्वच्छ आहे समोरच विस्तीर्ण पसरलेला निळाशार समुद्र असल्यानं हे ठिकाण पर्यटकांचं एक आकर्षण बनलं आहे. सिंगापूरहूनही इथ बरेच पर्यटक येतात. या पोर्ट डिक्सनच्या समुद्रकिनाऱ्यावर उच वृक्षांच्या सान्निध्यात पुळणीवर टुमदार अतिथिगृह व स्नानगृह बाधली आहेत. लोकांना अस वाटाव की आणखी काही दिवस तरी मुक्काम करावा

बीचवर फेरफटका मारून पुन्हा सॅम्युएलच्या घरी गेलो अधार पडला होता. त्याच्या घरी फक्त त्याची म्हातारी आई असते. हे घरात तामीळ बोलतात या बाईला इग्रजी अजिबात येत नाही घरीही टी व्ही. वर कुठलासा शिवाजी गणेशन्चा चित्रपट चालू होता. पोर्ट डिक्सनला तामीळ लोक बरेच आहेत

कमाने जेवणाचा बेत फर्मास केला होता. मांसाहारी पदार्थांबरोबर, त्यानं दालफ्राय व चपात्याही बनविल्या होत्या. फ्रूट सॅलड, पापड इत्यादी पदार्थही होते. भरपूर आग्रहाचं जेवण झाल. "तू पोळ्या कशा लाटल्यास ?" हे विचारताना माझी फार त्रेधातिरपीटच उडाली. शेवटी त्याला हातांनी खुणावून विचारलं जेवण झाल्यावर सॅम्युएल माझ्याशी भारतविषयक काही गप्पा मारीत होता याला राजस्थाननं झपाटल होतं त्याबद्दलही चौकशी केली येथे कोणाला काश्मीर तर कोणाला मुंबई, एवढंच नव्हे तर एकाला मुंबईच्या इलेक्ट्रिक लोकलनं झपाटल होतं.

नतर एका बारमध्ये बिअर पिण्यास गेलो. येथे एका मुलीने सर्वांना बिअर आणून दिली. बिअर आणून देणारी मुलगी अशी काही होती की माझ्या पापण्या जडावल्या. व पुन्हा वर बघायची हिंमत झाली नाही. समोरच्या 'डान्स रूम'मध्ये

काही लोक नाचत होते. काही तरुणीही होत्या. अर्थात त्या नाचण्याला ना ताल, ना लय ! जेवण झाल्यावर सॅम्युएल -कमाचा निरोप घेऊन पुन्हा हॉस्टेलवर परत आलो बराच वेळ गप्पा मारून झोपी गेलो

सकाळी साडेसातलाच आम्ही बाहेर पडलो कारण शाळेत महत्त्वाची सभा असल्यानं सकाळी अकराच्या आत ॲम्ब्रोजला शाळेत पोहोचायच होतं आमच्याबरोबर ते दोन सिंगापुरी ब्रदर्स होते त्यापैकी एकाला परोठा हा प्रकार फार आवडायचा म्हणून, एका नाक्यावर मले गृहस्थाच्या हॉटेलमध्ये परोठा व दालफ्राय नाश्ता केला. हे दोन म्हातारे ब्रदर्स अख्ख जग हिंडून आले होते याचा छंद तर केवळ पर्यटन होता हे सिगापूर शहरात कोचिंग क्लासेस घेतात व सुट्टीत जगातील देश पाहण्यास निघतात खाण आटोपल्यावर मलाक्काकड वेगानं जाऊ लागलो. हे दोन ब्रदस वाटत कुठतरी एका गावी उतरल सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मलाक्कास पोहोचलो प्रथम गार पाण्याने आंघोळ केली, तरी समाधान होत नव्हतेच, इतका उकाडा होता पावसाची रिपरिप चालूच होती. आवराआवर करून ठेवली कारण दुसऱ्या दिवशी कौलालपूरला शेवटची भेट देऊन मुबईचा रस्ता धरायचा होता

दुपारी जवळच असलेल्या हाँगकाँग - शाघाय बँकेत गेलो तिथ डॉलर्स वटवायचे होते बँक खूप मोठी होती कर्मचारीवर्गही भरपूर होता तिथं पासपोर्ट व व्हिसा दाखवून शभर अमेरिकन डॉलर्सचे मलेशियन डॉलर्स घेतले या बँकेतही मी सर्व कागदपत्रांवर मराठीतच सही केली अर्थात सहीचा नमुना मराठी होता. परदेशात चिनी लोकांच्या बँकेत मराठीत सही करणारा बहुधा मी एकमेव मराठी असावा; असा अभिमान मला उगीच वाटू लागला. मात्र कागदपत्रं तपासण्यासाठी बँकेच्या एका चिनी अधिकाऱ्याकड गेलो तेव्हा अशी भीती वाटली, की हा चिनी मनुष्य आपल्या बारीक डोळ्यांनी मराठी सही निरखून बघेल; परतु त्यानं शातपणं माझे कागदपत्र पाहिल आणि पाच मिनिटात मला मलेशियन डॉलर्स मिळाले पैसे देणाऱ्या माणसान "व्ही.पी.सिग पंतप्रधान होतील काय", असा प्रश्न केला

सायकाळी ॲम्ब्रोजने गाडी काढली त्याचा एक मित्र के.मचप हा मलाक्कातील केरोह या गावी राहतो. त्यास भेटण्यासाठी गेलो वाटेत एके ठिकाणी एका धनाढ्य चिनी सरकारी अधिकाऱ्याकडे गेलो. तो बराच वरच्या दर्जाचा अधिकारी असावा. त्याची व ॲम्ब्रोजची ओळख होती या अधिकाऱ्याची मुलही ॲम्ब्रोजच्या शाळेत होती त्याचा अतिशय देखणा व श्रीमती बंगला होता समोरच भरपूर हिरवळीच

लॉन असून त्यावर काळ्या रंगाची लाबलचक, चकचकीत टोयोटा उभी होती मला भीती वाटली की याच्या मागून त्याचा एखादा दाडगा अल्सेशियन किंवा नाजूक पमेरियन कुत्रा येतोय की काय ? पण सुदैवान कुत्रा नव्हता बंगला, लॉन, गाडी आणि कुत्रा ही मला वाटतं आजच्या काळातील चतु सूत्री असावी या बंगल्याच्या लॉनवर तुळशी वृदावनासारखा पण उच लाकडी देव्हारा असून त्यात एका देवतेच चित्र होते बहुधा बुद्धाच असावं आम्ही आलो तेव्हा हा गृहस्थ लॉनवरच उभा होता. त्यान आमच हसून स्वागत केलं. आणि त्याच्या दिवाणखान्यात नेऊन बसविल दिवाणखान्याला भारी मार्बल वापरलं होतं पायाखाली जाड गालिचा होता कोच, सोफा एवढे मऊ की मनुष्य बसला की तो फूटभर आत जायचा उची झुबरातून दिवे सोडले होते अस वाटत होत की एखादा हिंदी सिनेमाचा सेटच पाहत आहोत

बायकोला कॉफी करायला सागितली आणि आमच्याशी बोलत बसला ॲम्ब्रोजच काही कामही त्याच्याकडे होत व मी एकटक या माणसाच्या घरी असलेल्या आणि मोठ्ठा हार घातलेल्या सत्य साईबाबाच्या फोटोकडे बघत बसलो होतो म्हटल बघू या ! आपणास निदान भारतात नाही, परतु परदेशी तरी एका चिनी माणसाच्या घरात आध्यात्मिक अनुभूती येते काय ? पण कसलं काय ! श्रद्धा असेल तरच अनुभूती येणार ना ! हे असल जर तर. तत्त्वज्ञान आमची श्रद्धाळू माणस माडीत असल्यान मला कसलीच अनुभूती आली नाही मात्र सत्य साईबाबाचा फोटो पाहून अधश्रद्धा धर्म, जात, देश हे भेद न मानता साता समुद्रापलीकड कशी पोहोचते याच उत्तम उदाहरण अनुभवास आल.

त्याच्या लठ्ठ बायकोन कॉफी आणून ठेवली तिच्याशी त्यान ओळख करून दिली या गृहस्थाला मुबई, मद्रास, कलकत्ता या शहराबद्दल माहिती होती तसेच महाराष्ट्रात सहकार क्षेत्र खूप फोफावल आहे याचीही थोडीशी माहिती होती. हा मनुष्य मला कॉफी पिण्याचा फार आग्रह करीत होता. सपल्यावर पुन्हा ओतीत होता. त्याच्याकडून जरा वेळाने निघालो.

एका गाववजा खेड्यात राहत असलेल्या व पाम मळ्याच्या सान्निध्यात घर असलेल्या के मचपकडे आलो. के. मचप मूळचा तामिळी हिंदू आहे हा हॉकीपटू होता व पेशाने शिक्षक आहे. याने बऱ्याच वर्षांपूर्वी एका मले म्हणजे मुसलमान युवतीशी प्रेमविवाह केला. जर परधर्मीयाने एखाद्या मुसलमान बाईशी लग्न केले तर त्याला मलेशियन कायद्याप्रमाणे मुसलमान धर्म स्वीकारावा लागतो. म्हणून

काही लोक नाचत होते. काही तरुणीही होत्या. अर्थात त्या नाचण्याला ना ताल, ना लय ! जेवण झाल्यावर सॅम्युएल -कमाचा निरोप घेऊन पुन्हा हॉस्टेलवर परत आलो. बराच वेळ गप्पा मारून झोपी गेलो

सकाळी साडेसातलाच आम्ही बाहेर पडलो कारण शाळेत महत्त्वाची सभा असल्यान सकाळी अकराच्या आत ॲम्ब्रोजला शाळेत पोहोचायच होतं आमच्याबरोबर ते दोन सिंगापुरी ब्रदर्स होते त्यापैकी एकाला परोठा हा प्रकार फार आवडायचा म्हणून, एका नाक्यावर मले गृहस्थाच्या हॉटेलमध्ये परोठा व दालफ्राय नाश्ता केला हे दोन म्हातारे ब्रदर्स अख्ख जग हिंडून आले होते याचा छंद तर केवळ पर्यटन होता हे सिंगापूर शहरात कोचिंग क्लासेस घेतात व सुट्टीत जगातील देश पाहण्यास निघतात खाणं आटोपल्यावर मलाक्काकड वेगान जाऊ लागलो हे दोन ब्रदर्स वाटेत कुठतरी एका गावी उतरले सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मलाक्कास पोहोचलो. प्रथम गार पाण्याने आघोळ केली, तरी समाधान होत नव्हतेच, इतका उकाडा होता पावसाची रिपरिप चालूच होती. आवराआवर करून ठेवली कारण दुसऱ्या दिवशी कौलालपूरला शेवटची भेट देऊन मुंबईचा रस्ता धरायचा होता

दुपारी जवळच असलेल्या हाँगकाँग - शांघाय बँकेत गेलो तिथ डॉलर्स वटवायचे होते बँक खूप मोठी होती कर्मचारीवर्गही भरपूर होता तिथ पासपोर्ट व व्हिसा दाखवून शभर अमेरिकन डॉलर्सचे मलेशियन डॉलर्स घेतले. या बँकेतही मी सर्व कागदपत्रांवर मराठीतच सही केली अर्थात सहीचा नमुना मराठी होता. परदेशात चिनी लोकांच्या बँकेत मराठीत सही करणारा बहुधा मी एकमेव मराठी असावा, असा अभिमान मला उगीच वाटू लागला मात्र कागदपत्र तपासण्यासाठी बँकेच्या एका चिनी अधिकाऱ्याकडं गेलो. तेव्हा अशी भीती वाटली, की हा चिनी मनुष्य आपल्या बारीक डोळ्यानी मराठी सही निरखून बघेल, परतु त्यान शांतपण माझे कागदपत्र पाहिल आणि पाच मिनिटांत मला मलेशियन डॉलर्स मिळाले पैसे देणाऱ्या माणसान ''व्ही पी सिंग पतप्रधान होतील काय'', असा प्रश्न केला

सायकाळी ॲम्ब्रोजने गाडी काढली त्याचा एक मित्र के.मचप हा मलाक्कातील केरोह या गावी राहतो त्यास भेटण्यासाठी गेलो वाटेत एके ठिकाणी एका धनाढ्य चिनी सरकारी अधिकाऱ्याकडे गेलो. तो बराच वरच्या दर्जाचा अधिकारी असावा त्याची व ॲम्ब्रोजची ओळख होती. या अधिकाऱ्याची मुलही ॲम्ब्रोजच्या शाळेत होती त्याचा अतिशय देखणा व श्रीमती बगला होता. समोरच भरपूर हिरवळीच

लॉन असून त्यावर काळ्या रंगाची लाबलचक, चकचकीत टोयोटा उभी होती मला भीती वाटली की याच्या मागून त्याचा एखादा दाडगा अल्सेशियन किंवा नाजूक पमेरियन कुत्रा येतोय की काय ? पण सुदैवान कुत्रा नव्हता बगला, लॉन, गाडी आणि कुत्रा ही मला वाटत आजच्या काळातील चतु सूत्री असावी या बगल्याच्या लॉनवर तुळशी वृंदावनासारखा पण उच लाकडी देव्हारा असून त्यात एका देवतेच चित्र होते बहुधा बुद्धाच असाव आम्ही आलो तेव्हा हा गृहस्थ लॉनवरच उभा होता. त्यानं आमच हसून स्वागत केल आणि त्याच्या दिवाणखान्यात नेऊन बसविल दिवाणखान्याला भारी मार्बल वापरल होतं पायाखाली जाड गालिचा होता कोच, सोफा एवढे मऊ की मनुष्य बसला की तो फूटभर आत जायचा उची झुबरातून दिवे सोडले होते अस वाटत होत की एखादा हिंदी सिनेमाचा सेटच पाहत आहोत

बायकोला कॉफी करायला सांगितली आणि आमच्याशी बोलत बसला ॲम्ब्रोजचं काही कामही त्याच्याकडे होत व मी एकटक या माणसाच्या घरी असलेल्या आणि मोठ्ठा हार घातलेल्या सत्य साईबाबाच्या फोटोकडे बघत बसलो होतो म्हटल बघू या! आपणास निदान भारतात नाही, परंतु परदेशी तरी एका चिनी माणसाच्या घरात आध्यात्मिक अनुभूती येते काय ? पण कसल काय! श्रद्धा असेल तरच अनुभूती येणार ना! हे असल जर तर तत्त्वज्ञान आमची श्रद्धाळू माणस माडीत असल्यान मला कसलीच अनुभूती आली नाही. मात्र सत्य साईबाबाचा फोटो पाहून अधश्रद्धा धर्म, जात, देश हे भेद न मानता साता समुद्रापलीकड कशी पोहोचते याच उत्तम उदाहरण अनुभवास आलं

त्याच्या लठ्ठ बायकोन कॉफी आणून ठेवली तिच्याशी त्यान ओळख करून दिली या गृहस्थाला मुंबई, मद्रास, कलकत्ता या शहराबद्दल माहिती होती तसेच महाराष्ट्रात सहकार क्षेत्र खूप फोफावल आहे याचीही थोडीशी माहिती होती. हा मनुष्य मला कॉफी पिण्याचा फार आग्रह करीत होता सपल्यावर पुन्हा ओतीत होता. त्याच्याकडून जरा वेळाने निघालो

एका गाववजा खेड्यात राहत असलेल्या व पाम मळ्याच्या सान्निध्यात घर असलेल्या के.मचपकडे आलो के मचप मूळचा तामिळी हिंदू आहे हा हॉकीपटू होता व पेशाने शिक्षक आहे. याने बऱ्याच वर्षांपूर्वी एका मले म्हणजे मुसलमान युवतीशी प्रेमविवाह केला. जर परधर्मीयाने एखाद्या मुसलमान बाईशी लग्न केले तर त्याला मलेशियन कायद्याप्रमाणे मुसलमान धर्म स्वीकारावा लागतो. म्हणून

मचपलाही मुसलमान व्हावे लागले मात्र त्याला यामुळे फायदा होऊन कायद्यानुसार काही सवलती मिळाल्या अल्प दराने काही बिघे जमीनही मिळाली 'मले' स्त्रीशी विवाह करायचा असेल तर सक्तीने इस्लाम धर्म स्वीकारावा लागतो नाहीतर हे लग्न कायदेशीर होत नाही

हे नवरा -बायको घरी तामिळी भाषा बोलतात याच्या बायकोनं मला नवीन असलेला पदार्थ केळीच्या पानावर आणून दिला नाव सागितल होतं, पण विसरलो हा पदार्थ तादुळापासून बनविलेला असून त्यात खोबऱ्याचाही उपयोग केला होता गोड वड्याप्रमाणे हा पदार्थ होता याम पासून बनविलेली साखर वापरली होती हा मनुष्य फारच सज्जन व हसतमुख होता. त्या दांपत्याचा निरोप घेऊन बाहेर पडलो बरीच सध्याकाळ झाली होती वाटेत एक सुरेख मशीद गाडीतूनच पाहिली या मशिदीला अनेक गोल घुमट व मनोरे असून ती तपकिरी रगाची होती दृष्टीला सुख देणाऱ्या अनेक मशिदी इथ आहेत.

गावात आल्यावर किल्ल्यासमोरील समुद्रावर फेरफटका मारून सेंट फ्रान्सिसमध्ये परत आलो भूक नसल्यान जेवणही उशिरा घेतले. रात्री कमा आला त्याच्याबरोबर मला तो त्याच्या खेडेगावाला नेणार होता. मी मनोमन खूश झालो खेडेगावातल मोकळं व शात आणि निरामय वातावरण मला नेहमीच आवडतं 'खेड्यामधले घर कौलारू' हे गोड गीत आठवल्यावाचून राहिले नाही.

सकाळीच आम्ही त्याच्या मर्सिडिज व्हॅनन निघालो एका गावाशी गाडी थाबवली व चहा आणि न्याहारी झाली मले भाषेत चहाला तेह म्हणतात तसंच गुरू, पुत्र, पुस्तक असेही काही संस्कृत, प्राकृत शब्द मले भाषेत आहेत. आगीच्या बबाला बाबा म्हणतात कमा जवळच्या मार्केटमधून [illegible] आला एक इडोनेशियन सिगारेटच पाकीट घेतल. यातील सिगारेटना लवगाप्रमाणे उग्र वास येत होता त्यामुळ ती आवडली नाही. सुमारे तासाभरान कमाच्या खेडेगावाला पोहोचलो. प्रथम त्याच्या बहिणीकडे गेलो. कमाच्या व्हॅनच्या मागे बरीच मोकळी जागा सामानसुमान ठेवण्यासाठी होती. त्या जागेत कमानं आपलं विश्व भरल होत. कपडे, चपला, चित्रं, हँगर्स, प्लॅस्टिक, इतर वस्तू, एक तंबूही होता. हा किरकोळ व्यापार करीत असे आमची व्हॅन दाराशी थाबताच आजूबाजूच्या साळकाया माळकाया, पोरंटोर यानी व्हॅनभोवती गराडा घातला कोणता माल आहे, ते पाहू लागले. चपला व तयार कपडे बरेच जण हात लावून बघत होते. खेडेगाव असल्यानं माणस भराभर जमली तिथून जरा वेळान कमाच्या घरी गेलो

हे खेडेगाव अगदी निसर्गरम्य होतं कोकणातील किंवा भीमाशंकर डोंगराच्या कुशीत जशी खेडेगावं असतात; तसं होतं. बक्कळ झाडी आणि उंच लाकडी घर आणखीनच शोभा वाढवीत होती हिरव्या मखमलीवर आणि ताडामाडांच्या संगतीत ही घरं उभी होती. कमाच्या घरापुढे मोठं व फुलझाडांनी भरलेलं अंगण होतं. काही रंगीबेरंगी ऑर्किडस् होती. घर लाकडी, उंच खांबांवर बांधलेलं पण मजबूत होतं बाहेर एक लहानसा व्हराडा होता तिथ आरामखुर्ची व झोपायला एक पलंग होता घर आतून खूप मोठ व अनेक खोल्यांचं आहे या घराला सिमेंटचा एकही डागसुद्धा लागला नव्हता. माजघर, ओसरी, मधली खोली असे सर्व प्रकार होते घराच्या खिडक्याही खूप मोठ्या व त्यांना छान विणलेले पडदे लावलेले होते अंगणात बांबूचं मांडव होते व त्यावर वेली वेढलेल्या होत्या. कोंबड्या व त्यांच्या पिल्लांची माळ मधूनच तुरूतुरू चालत जाई. मी बेहद्द खूश झालो कोकणात मी बरेच वेळा जातो, त्यामुळे हे सर्व वातावरण पाहून कोकणची तीव्रतेनं आठवण झाली. शहरात हिंडताना स्वत-च 'मी' पण जागृत ठेवून, सावधतेने आपण हिंडतो, पण इथ निसर्ग सर्व विसरायला लावून मानवाला आपल्याकडे आपोआप खेचून घेतो

जरा वेळानं कमाचे वडील बाहेर येऊन बसले ते बरेच स्थूल होते. कमानं माझी व त्याची ओळख करून दिली त्यांना इंग्रजी अजिबात येत नसल्यान, बोलण्याचा प्रश्नच नव्हता फक्त हसून हात मिळवले मले मुसलमान स्त्रिया, पुरुषी वर्चस्वामुळे म्हणा किंवा धार्मिक व सामाजिक बंधनामुळे म्हणा, परपुरुषासमोर एकदम येत नाहीत त्यामुळे त्याची आई एकदम पुढे आली नाही. आम्ही परत निघते वेळी ती समोर आली त्याची बहीण बाहेरून येत होती. मला बघून कोणी अगदीच परका इसम बसला आहे, असं बघून एकदम शेजारच्या घरात पळाली मात्र या बायका पडदा पद्धती पाळत नाहीत शहरातल्या काही बायका डोक्यावरून पदर घ्यावा तस एक वस्त्र घेतात. बुरखा अगदी क्वचित आढळला तेही बहुधा भारतीय किंवा पाकिस्तानी मुसलमान महिला असाव्यात. मले मुसलमानाचा व भारतीय लोकांचा रंग बरंच साधर्म्य दाखवितो शरीरयष्टी व चेहरेपट्टीतही मला बरंच साम्य आढळलं. चिनी मिश्रणही बरंच झालं आहे

कमा घरच्याशी जरा वेळ बोलला व त्यानं आणलेले खाद्यपदार्थ आईकडं दिले व लगेच आम्ही 'असहान' या अत्यंत निसर्गरम्य तलावाकडे भरधाव निघालो रस्ता नागमोडी व नारळ, पाम, रबर मळ्यांच्या सोबतीने जाणारा होता रस्त्यावर

वाहतूक अगदीच तुरळक होती. अर्ध्या तासान या 'असाहान' तलावाशी पोहोचलो बघतो तर, निसर्गाने मुक्त उधळण केली होती काळसर छटा असलेल्या हिरव्याकच डोंगराच्या कुशीत शात व अथाग जलाशय पसरलेला पाहताच, निरातिशय आनद झाला. ढगही खालपर्यंत रेंगाळत येऊन, त्या शात तलावाशी गुजगोष्टी करीत होते अग मोहरून टाकणार धुद वातावरण होत वेळ फार नव्हता तेथे काही फोटो घेऊन जड पावलानीच मागे पुन्हा पुन्हा बघत कमाच्या घराकडे निघालो. वाटेत एका गावात तामिळींची बहुसख्य वस्ती होती, तेथे फेरफटका मारून आलो

कमाच्या घरी आलो. व लगेच जेवायला बसलो जेवणात स्टीम्ड् व फ्राय फिश असे पदार्थ होते. जेवण झाल्यावर अत्यंत मधुर असा मस्कती खजूर खाल्ला. नतर बाहेरच्या व्हराड्यात येऊन आरामखुर्चीत आराम करीत बसलो आरामखुर्ची जुन्या फल्लेवाल्या आरामखुर्च्यांसारखी होती फार वेळ नसल्याने लगेच निघाव लागल कमाच्या घरी कोंबड तर होतच. शिवाय बकरेही होते. त्याच्या आई-वडिलाचा निरोप घेऊन आम्ही मलाक्काचा रस्ता धरला कमाने मला मलेशियाचा रोड मॅप व मुलींसाठी काही कपडे भेट म्हणून दिले या कमाचे कितीही आभार मानले, तरी कमीच पडावेत मनाने हा गृहस्थ एकदम मोकळा आहे त्याच्या जिवलग मित्राचा - ॲम्ब्रोजचा मी मित्र म्हणून त्यानेही माझी उत्तम बडदास्त केली अशी माणस फार विरळाच भेटतात पण भटकती केल्याशिवाय अशी माणस व अनुभव दुर्मिळ असतात

दुपारी १२ वाजता सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूशनला पोहोचलो. सर्व सामान घेतल आहे की नाही व बाधल आहे की नाही याची खात्री करून घेतली आणि कौलालपूरला जाण्यास सिद्ध झालो. रात्री २ ३० वाजता एअर इडियाची दिल्लीमार्गे फ्लाइट होती सध्याकाळी कौलालपूरमध्ये महत्त्वाची खरेदी करावयाची होती श्री गोखल्याना लक्ष्मी टेक्सटाइल मिल्स, सेंबिलान इथ फोन करून, तुम्हांला भेटायला येईन अस कळविल दुपारी एक वाजता सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूशनला गुडबाय करून बाहेर पडलो वाटेत नेचर वॉचिंगसाठी केलेली, एक बाग ॲम्ब्रोजने तेवढ्यात दाखविली सुमारे एक तासान लक्ष्मी टेक्सटाइल मिलमध्ये गेलो श्री.गोखल्याची चौकशी केली ते जेवायला गेले होते आम्ही परत फिरलो, तेवढ्यात गोखले आले त्याच्याशी पाच मिनिटे बोलून, सरळ कौलालपूरचा रस्ता पकडला. चार वाजता कौलालपूरला पोहोचलो.

आमच तेथील राष्ट्रीय स्मारक बघायच राहिल होत. ते प्रथम पाहायला गेलो.

मलेशियाच्या प्रख्यात वस्तुसग्रहालयाजवळच राष्ट्रीय स्मारक आहे. थोड्या उचावर एका सपाट मैदानावर हे स्मारक आहे. प्रथम पाढरे पट्टे असलेली एक विस्तीर्ण फरसबदी लागते तेथे एक स्तभ आहे. कम्युनिस्टाविरुद्ध लढताना जे लोक धारातीर्थी पडले, त्याच्या स्मरणार्थ हा स्तभ उभा केला आहे. पूर्वी मलेशियन व कम्युनिस्टात मोठा सघर्ष झाला होता या देशात साम्यवादाला कडवा विरोध आहे या देशाचे व चीनचे राजनैतिक सबध आहेत की नाहीत, इथपासून शका आहे

या स्तभासमोरच राष्ट्रीय स्मारक आहे काही बदुकधारी सैनिक या स्मारकात दाखविले आहेत. त्यांच्याकड ध्वजही दाखविला आहे, व त्यांच्या पायाशी काही सैनिक पडलेले दिसतात ध्वजाच्या वरच्या बाजूस चद्र, सूर्य आहेत हे स्मारक एका उच चबुतऱ्यावर आहे चबुतऱ्यावर समोरील बाजूस दोन सिंह ध्वज घेऊन उभे आहेत, असे दिसते हे स्मारक उच व भव्य असून, याच्यावर ऑस्ट्रेलियन छाप आहे. या स्मारकाचा शिल्पकार ऑस्ट्रेलियन असल्यान, त्यावर गोरी छाप पडली स्मारकाच्या चोहोबाजूला प्रशस्त व स्वच्छ गुलाबी रगाची लादी असून, स्मारकावर फ्लड लाइटस् सोडण्याचीही सोय केली आहे स्मारक ब्रॉझ धातूपासून बनवलं आहे आजूबाजूला भरपूर झाडी व हिरवळ आहे. स्मारकाच्या समोर पाण्याचा मोठा चौकोनी हौद आहे. मागील बाजूस पुष्करिणी व कारजी आहेत भिंतींना तुर्की पद्धतीच्या कमानी व बारीक जाळी आहे येथून जरा दूरवर असलेली पार्लमेंटची पाढरी शुभ्र मोहक इमारत स्पष्टपणे दिसते

या स्मारकाखाली एक मोठी बाग आहे. या देशात बगीचे व हिरवळीला तोटा नाही बागही खूप फुलानी, रोपाच्या विविध आकारानी व पांढऱ्या पत्थराच्या कलाकृतींनी नटलेली आहे इथं काही फोटो घेऊन, मुख्य रस्त्याला आलो. तेथील उच्च न्यायालय, महानगरपालिका याच्या राजवाडेसदृश मनोहारी इमारती पाहून तृप्त झालो त्याचेही फोटो काढले

शेवटी महत्त्वाचा भाग उरकायचा होता व तो म्हणजे खरेदीचा होय आत्तापर्यंत खरेदी अशी काहीच केली नव्हती एक तर डॉलर्स कमी मिळाले होते. अम्ब्रोजला जास्त खर्चात टाकण्याची इच्छा नव्हती त्याचप्रमाण मला स्वत-ला मोठ्या खरेदीच फारसं आकर्षण नाही. तसंच ॲम्ब्रोजन प्रवासाच्या शेवटच्या दिवसात काही खरेदी कर, असा पोक्त सल्ला दिला होता म्हणून काही साधी दुकान व डिपार्टमेंटल स्टोअर्समधून खरेदी करावयाचे ठरविले पत्त्यांचे कॅटस्, बॅग्ज, घड्याळ, टी शर्टस् रस्त्यावरील दुकानातून खरेदी केले तिथून एका प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये

गेलो, परतु पूर आला म्हणजे नद्या जशा दुथडी भरून वाहतात; तसं हे डिपार्टमेंटल स्टाअस वाहत हात. आत जायला व बाहेर यायलाही रांग होती. खिसेकापूंपासून सावध राहावे', अशाही पाट्या ठिकठिकाणी लिहिल्या होत्या म्हणून दुसऱ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये गेलो इथं गर्दी कमी होती सर्व मुली व बायकांचाच कारभार होता. प्रथम मी रडणारी व हसणारी बाहुली घेतली एक गोड सगीतावर डोलणारी बाहुली होती, ती विकत घेतली. माझ्या मुलींना मी तुमच्यासाठी खास बाहुल्या आणीन, अस वचन दिलं होत त्याशिवाय मी माझ्या घरात पाऊलही टाकू शकत नव्हतो. बाहुल्या घेतल्यावर एक मानसिक दडपण दूर झाल आणखी काही खेळणी घेतली. काही शालोपयोगी व रगकलेचे साहित्य घेतल. पोस्टाचे निरनिराळे स्टॅम्पस् घेतले. लायटर्स व काही शोभेच्या वस्तू घेतल्या व शेवटी तोशिबा कंपनीचा छानसा वॉकमन घेतला बायको बरोबर नसल्यानं खरेदी विद्युत्वेगाने झाली कॅमेरा ॲम्ब्रोजने दिला होता, तो घ्यायचा प्रश्न नव्हता वेळ कमी होता व भूकही लागली होती कमाच्या ब्लॉकवर आलो दाढी, आंघोळ करून कपडे बदलल्यावर बर वाटल खालती येऊन, फ्रॉन्सच मलेशियातील शेवटचं जेवण घेतल तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. पहाटे २ ३० वाजता कौलालपूर -दिल्ली व सकाळी ११ वाजता दिल्ली -नेरोबी व्हाया मुबई अशी फ्लाइट होती तासभर आराम केला घरी पोहोचायचे वेध लागले होते

मी व अॅम्ब्रोज अस्वस्थ मनान बसला होतो १८ दिवसाचा आमचा निकटचा सहवास सपणार होता. उत्तरेला बँकॉक - पटायापासून ते दक्षिणेला सिंगापूरपर्यंत मोठ्या हसतमुखान, सच्च्या दिलानं व औदार्यान त्यान मला साथ केली. सावलीप्रमाणे तो माझ्याबरोबर राहायचा मला काय हवं, नको, काय आवडत यावर लक्ष ठेवून असायचा त्याची एकंदर विचार करण्याची पद्धत, वागण, बोलण यांपासून मला बरच काही शिकता आल त्याच्यामुळेच मला परदेशप्रवासाची सधी मिळू शकली. एका पैचाही खर्च त्याने मला करू दिला नाही मी त्याला वडीलभावाप्रमाणे मानतो. अशी नाती का व कशी निर्माण होतात. ते समजत

[illegible] असत हे पण कबूल करावयास हव. जग हे केवळ दुःखी व दुष्ट शक्तींनी भरलेलं आहे, अस म्हणणं वेडेपणाच होईल.

मी सायकाळी घेतलेल्या वस्तू तो माझ्या सामानात व्यवस्थित लावीत होता. रात्री अकरा वाजता आम्ही कौलालंपूरच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर जाण्यासाठी

सिद्ध झालो त्यान मला जवळ घेतल व प्रेमान विचारल की, ''पुन्हा केव्हा येणार ?'' मी काही बोलू शकलो नाही किती वर्षांनी पुन्हा येणार, हेही सांगता येण्यासारख नव्हतं. कारण भारतातून परदेशप्रवास करण दिवसेंदिवस महागड होत चालल आहे. मीच त्याला भारतात येण्याच निमत्रण दिल. जड श्वास टाकत, आम्ही सामान उचलल आणि विमानतळाचा रस्ता पकडला जाताना पुन्हा एकदा सुंदर व चकाकणारं कौलालंपूर डोळे भरून पाहण्याचा प्रयत्न करीत होतो

कौलालंपूर हे एखाद्या नटलेल्या नववधूसारखं वाटल तर पिनाग हे एखाद्या राजबिंड्या राजपुत्रासारख भासमान झालं. बँकॉक चागल-वाईट पाहणाऱ्या स्थितप्रज्ञ बुद्धाप्रमाणे भासलं; तर शुभ्र वेश परिधान केलेल्या आणि हातात छडी घेतलेल्या करड्या पतोजीप्रमाणे सिगापूर वाटल सिगापुरी कायद्याचा बडगाच तसा आहे

रात्रौ ११ ३० वाजता विमानतळावर पाहोचलो बरीच गर्दी होती ११ ३० ला रिपोर्ट करायला सागितलं होतं. पण प्रत्यक्षात १२.३० पर्यंत फ्लाइट काउटरशी कोणीही नव्हत. बरेच तामिळी व शीख प्रवासी होते रात्रौ १२ ३० ला तेथील कर्मचारी आले पासपोर्ट, व्हिसा तपासला, तिकीट पाहिले व बॅगाचे वजन करून, त्याना टॅग लावले. विमान एक तास उशिरान उडणार होत. कँटीनमध्ये आम्ही कॉफी घेतली रात्री दीड वाजता गेटकड जाण्याची सूचना मिळाली ॲम्ब्रोजचा भावपूर्ण निरोप घेतला. पुन्हा एकदा पासपोर्ट व व्हिसाची तपासणी झाली व त्यावर शिक्का पडताच, मी ॲम्ब्रोजला टाटा केले. तोपर्यंत तो उभा राहून, काचेतून बघत होता. खात्री होताच बायबाय करून, निघून गेला मी विमान सुटण्याच्या जवळील दालनात येऊन बसलो. अजून वेळ भरपूर होता. विमानतळावरील काही विविध वस्तुभाडारं बघितली, पण किमती फार होत्या. एका सिगारेटच्या दुकानातून बेन्सन ॲन्ड हेजेस सिगारेटच कार्टन घेतल. मद्यविक्री दुकानातून एकापेक्षा एक सुदर आकाराच्या दारूच्या बाटल्या ठेवल्या होत्या मोह अनावर झाला होता; पण तो टाळला. मद्यबाटलीसाठी दुर्मिळ डॉलर्स खर्च करण माझ्या जिवावर आल होत पुन्हा दालनात येऊन बसलो व मागील दोन दिवसात आपण काय केल व काय पाहिल, अनुभवलं याची नोंद करू लागलो

पहाटे पावणेतीनला एअर इंडियाच्या 'साबरमती' या विमानात जाऊन बसण्याची सूचना मिळाली. पख्याखाली खिडकीजवळ जागा मिळाली होती हवाईसुदरीने प्रत्येकाला सिंगापूर टाइम्स वाचायला दिला; पण झोप अनावर झाली होती.

पहाटे ३ ३० वाजता विमान मद्रासच्या दिशेन झेपावल अन् गाढ झोप लागली विमान मद्रास विमानतळावर टेकल्यावरच जाग आली अंधार होता पावसाची रिमझिम सुरू होती एक सिंगापूर एअरवेजचं पांढर शुभ्र लाल पट्टेवाल विमान मुकाट उभ होत त्या धूसर वातावरणात ते मोठ छान दिसत होत. मद्रासला विमान रिकामं होईल, असं वाटलं होत, पण ते पुन्हा तुडुंब भरल.

माझ्या बाजूला एक काश्मिरी मनुष्य बसला होता तो न्यूझीलंडहून आला होता मद्रास सोडल्यानतर तो बराच मोकळेपणी बोलू लागला. या महाभागाने सिंगापूरला जाऊनही सेंटोसा आयलड न पाहण्याचा करंटेपणा केला होता या माणसाला मुबईबद्दलही फारशी माहिती नव्हती. बँकॉकप्रमाणेच मुबई आहे काय ? असा प्रश्न त्यान विचारला म्हटल, "मुंबई व बँकॉकची तुलना कशी होईल आमच मुबई बँकॉकपेक्षा कैकपटीन चागल आहे "

सकाळी ८ १५ वाजता दिल्लीच्या आतरराष्ट्रीय विमानतळावर उतरलो सहार विमानतळाची सर याला येत नाही रन् वे मात्र खूप मोठा आहे ट्रांझिट कक्ष कुठे आहे अस विचारल तर तिथले अधिकारी उत्तर देण्याच्या मन स्थितीत नव्हते शेवटी एका बदुकधाऱ्या पोलिसान ते कुठ आहे ते सागितलं तिथं ट्रांझिटचा फलक वगैरे काहीच नव्हता. त्यामुळे सर्व गर्दी एकाच वेळी तिकडे धावली कोणाला मुबईला, तर कोणाला नैरोबी, जिनिव्हा, फ्रँकफुर्ट, रोम, इकड जायच होत तेवढ्यात एक आसामहून कॉलेज विद्यार्थ्यांची फुटबॉल टीम आली त्यांचीही गर्दी वाढली ट्रान्झिटला गर्दी खूप व तिथं काम करणारी माणसे कमी होती काही परदेशी लोकांच्या बोर्डिंग पासवर गेट क्रमांक लिहिला गेला नव्हता, त्यामुळं सर्वत्र फिरून, ते पुन्हा तणतणत ट्रान्झिटमध्ये आले माझा सुमारे दीड तास या ट्रान्झिटच्या गर्दीमुळे व घोळामुळे वाया गेला विमान अकराचं असल्यानं घाई नव्हती; पण झाल्या प्रकारामुळे धाकधूक होती शेवटी मलाही बोर्डिंग पास दिला मात्र सामानाला नवीन टॅग लावलाच नाही कर्मचारी नवीन होते म्हणाले की काही आवश्यकता नाही तुमचं सामान आपोआप मुबईच्या फ्लाइटमध्ये जाईल. पहिला सामानाचा टॅग क्वालालपूर -दिल्ली असा होता. माझं समाधान होत नव्हतं माझ्याप्रमाणच परिस्थिती आणखी एकाची झाली होती त्यान बराच प्रवास केला होता, त्यामुळं अनुभवी होता. पुन्हा चौकशी करून; त्यान त्या महिला कर्मचाऱ्यांकडून त्याच्या व माझ्या सामानावर टॅग लावून घेतला तेव्हा जिवात जीव आला मी दोघांचेही आभार मानले या सर्व घालमेलीत दोन तास वाया

गेले. व त्यामुळ चहा, पाणी काहीच झाल नव्हतं. विमानतळाच्या आत एक कॅफेटरीएट होते. पण कॉफीच्या एका कपासाठी एक डॉलर मोजावा लागत होता. त्यामुळे तसाच बसून राहिलो. तेवढ्यात एक पाटी वाचली. हॅन्डबॅगमध्ये कोणत्याही प्रकारचे बॅटरी सेल्स ठेवू नयेत. माझ्या हॅन्डबॅगमध्ये कॅमेरा व वॉकमनमध्ये सेल होते तसच आणखी काही नवीन खरेदी केलेले पेन्सिल सेल होते त्याचं काय करावं, ही पचाईत पडली. तेवढ्यात विमानात जाऊन बसण्याची सूचना मिळाली कस्टम तपासणीच्या वेळी माझ्याकडील सर्व पेन्सिल सेल काढून घेण्यात आले व ते मुबईला उतरल्यावर मिळतील, अस सागण्यात आलं

विमानात जाऊन बसलो हे विमान मुबईमार्गे नैरोबीला जाणार होतं. बरेच निग्रो, गुजराथी, बोहरी अशी मंडळी विमानात होती सकाळी ११ ३० वा 'इद्रवर्मन' हे विमान मुबईच्या दिशेनं उड्डाण करू लागल. दिल्ली –मुबई हवाई अंतर १२०० कि मी असून सुमारे दोन तासांत मुबईस पोहोचता येत.

विमानात बसल्यावर मला माझ्या घराची व गावाची तीव्रतेनं आठवण झाली. विमानवेगापेक्षाही दुप्पट वेगान माझ मन घराकडं व गावाकडे झेपावत होतं

दुपारी एकच्या सुमारास मुबई जवळ येत आहे, अस सागण्यात आल बरोबर १ ३५ ला विमान मुबईला स्थिरावलं एस् टी तून उतरताना जशी आपण घाई करतो, तशी घाई मला झाली होती विमानतळावरील सरकत्या पट्ट्यावरून सामान उचलल व धावतच सुटलो; पण कस्टम तपासणीच्या ठिकाणी अडवला गेलो. आमच्या अगोदरच्या फ्लाइटने एक शीख बाई व तिची मुलगी आली होती, त्याच्या सामानाचा पत्ताच नव्हता ते बहुधा दिल्लीला राहिल त्या मला विचारायला लागल्या की, "सामानाच काय करायच ?" म्हटलं, "अहो ! मला काय विचारता ! तुम्ही विमानतळ अधिकाऱ्यांना भेटा." त्या बायकानी सामानावर व तिकिटावर टॅग लावून घेतला नव्हता. तेही कौलालंपूरपासूनच आले होते

माझं सामान कस्टम तपासणीसाठी ठेवलं गेल अर्थात मी विशेष महाग व भरमसाठ वस्तू बरोबर आणल्या नव्हत्या त्यामुळ सामान बॅगा उघडून दाखवायची वेळ आली नाही. तिथले कस्टम अधिकारी श्री.कुलकर्णी हे खरोखरंच सद्गृहस्थ होते उलट त्यांनी माझी आस्थेन चौकशी केली त्याचे आभार मानून बाहेर पडलो.


मला नेण्यासाठी पत्नी नूतन, भाऊ संजय, त्याची पत्नी सौ.नीलिमा व माझ्या मुली केतकी व कल्याणी एवढे सर्वजण आले होते. भिवंडीस जाताजाता सर्वांना

प्रवासातील मौजेच्या , अनुभवाच्या गोष्टी सागत होतो माझ भिवडी गाव कधी आल ते कळल नाही घरात व गावात आल्यावर प्रवासाचा शीण कुठल्याकुठे पळाला सर्वांच्याच चेहऱ्यावर समाधान व आनद दिसत होता.

*यावे जन्मा ज्या भूमीवर*
*त्या भूमीवर प्रेम करावे !*

या काव्यपंक्तींची जाणीव झाल्याशिवाय राहात नाही

■ ■ ■




सा. क्र. २८३५८